सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ३१ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ८४ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# ‘या’ प्रश्नी तक्रार आल्यास अधिकाऱ्यांची गय नाही!

## पालकमंत्री गोरे यांचा अधिकाऱ्यांना इशारा

### शेतकरी, पिण्याचे पाणी, वाळू अन् आरोग्य विषयावर पालकमंत्री गंभीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

जिल्ह्यातील शेतकरी बांधवांचे प्रश्न, शहरातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि वाळू तस्करी व आरोग्यविषयक प्रश्नी जिल्ह्यातील शासकीय अधिकाऱ्यांनी कर्तव्यात हयगय केली तर त्यांची गय करणार नाही, असा सज्जड दम ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी गुरुवारी डीपीसी बैठकीतून दिला असून, वाळू तस्करांवरही कडक कारवाई करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डीपीसी बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत गोरे यांनी आपल्या कामाची भूमिका मांडली. या पत्रकार परिषदेस माजी सहकार मंत्री तथा आ. सुभाष देशमुख, आ. समाधान आवताडे, आ. सचिन कल्याणशेट्टी,



जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल उगले तेली आदींची उपस्थिती होती. पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, माझी ही पहिलीच डीपीसीची बैठक होती. या बैठकीत जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत सर्वसाधारण योजना ८३ टक्के, अनुसूचित जाती उपयोजना ५१ टक्के व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना २७% असा एकूण ७८ टक्के निधी २० जानेवारीपर्यंत खर्च झालेला आहे. तरी उर्वरित मंजूर निधी माहे मार्च २०२५ अखेर पर्यंत खर्च करण्याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखाची असून, त्यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे, अशा सुचना दिल्या आहेत. तर जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ च्या १ हजार १९ कोटी ३३ लाखाच्या विकास आराखड्यास नियोजन समितीची मान्यता, २०० कोटीचे आर्थिक वाढीव मागणी करण्यात आलेली आहे.

या निधीतून जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी ट्रान्सफॉर्मर वाढीवर भर दिला जाणार आहे. डीपीसी बैठकीत आरोग्याबाबत गंभीर तक्रारी प्राप्त झाल्या आहेत आणि बेकायदेशीर वाळू उपशाबाबतही तक्रारी आल्याने या दोन्ही गंभीर प्रकारावर जिल्हा प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी, अन्यथा माझ्या स्टाईलमध्ये कारवाई करणार असल्याचा त्यांनी इशारा दिला. इतकेच नाहीतर आपण वाळू तस्करांचा अहवालही मागविला असल्याचीही माहिती यावेळी पालकमंत्री गोरे यांनी दिली.

सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दुहेरी पाईलाईनसाठीही आपण सहकार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यात वावरणारा वाघ आणि त्यांच्या दोन बछड्याबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारल्यावर याबाबत आपण वनविभागाशी बोलून त्याचा बंदोबस्त करायला लावतो, असा जिल्हावासियांना शब्द दिला. दरम्यान, जिल्हा प्रशासन आणि पक्षातील जुन्या सहकार्यांना घेवून सोलापूर जिल्ह्याचा कायापालट करणार असल्याचा आत्मविश्वासही पालकमंत्री गोरे यांनी व्यक्त केला.

**पोलिस अन् प्रशासनातील अधिकाऱ्यांशिवाय वाळू उपसा शक्य नाही!**

सोलापूर जिल्ह्यातही अनेक वाळू माफीया असून, काही वाळू माफियांनी अधिकाऱ्यांच्या अंगावर वाहनेही घालण्याचे प्रकार केले आहेत. शासकीय धोरणानुसार प्रशासनानेच अधिकृत ठेकेदारांना वाळू उपसा करून देण्याचे धोरण ठरले असताना इतर वाळू तस्कर वाळू तस्करी कशी करतात? अशा अवैध वाळू उपसा करणाऱ्यांना पोलिस यंत्रणा किंवा प्रशासनातील अधिकाऱ्यांची साथ असते असा आरोपही यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केला. इतकेच नाहीतर पोलिस किंवा स्थानिक प्रशासकीय यंत्रणा सोबत असल्याशिवाय अवैध वाळू उपसा करण्याचे धाडस कोणी करत नाहीत. यामुळे आता प्रशासनाने अशा वाळू तस्करांवर कारवाईस टाळाटाळ केली तर सहन करणार नाही; असा इशारा दिला.

# संसदेचे आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन

▸▸उद्या सादर होणार अर्थसंकल्प

**नवी दिल्ली, ३० जानेवारी**

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन शुक्रवारपासून सुरू होत आहे. शनिवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् संसदेत अर्थसंकल्प सादर करतील.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू शुक्रवारी सकाळी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठक़ीला संबोधित करतील. मुर्मू यांच्या अभिभाषणाने अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा प्रारंभ होईल. अभिभाषणानंतर आर्थिक सर्वेक्षण संसदेच्या दोन्ही सभागृहात सादर केले जाईल.

शनिवारी अर्थमंत्री लोकसभेत अर्थसंकल्प सादर करतील. केंद्र सरकारच्या शिफारसीनुसार राष्ट्रपती मुर्मू यांनी ३१ जानेवारीला संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन बोलवायला मंजुरी दिली असून, ४ एप्रिलपर्यंत हे अधिवेशन चालणार असल्याचे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी एक्सवर टि?ट करीत सांगितले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात दोन्ही सभागृहांच्या २७ बैठका होणार आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशन दोन टप्प्यांत होत असते. अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारीला संपणार असून, दुसरा टप्पा १० मार्चपासून सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात दोन्ही सभागृहांच्या ९ बैठका होणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात विविध मंत्रालयाच्या तसेच विभागाच्या पुरवणी मागण्यांवर संसदेत चर्चा होणार आहे.

अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर दोन्ही सभागृहात चर्चा होणार आहे. दोन्ही सभागृहातील या चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उत्तर देतील.



**निर्मला सीतारामन् घडवणार इतिहास**

निर्मला सीतारामन् सलग आठवा अर्थसंकल्प सादर करून इतिहास घडवणार आहेत. सीतारामन् माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी वेगवेगळ्या काळात सादर केलेल्या १० अर्थसंकल्पांच्या विक्रमाच्या जवळ जातील. केंद्रीय अर्थमंत्री असताना मोरारजी देसाई यांनी १९५९ ते १९६४ या कालावधीत सहा अर्थसंकल्प सादर केले होते, तर १९६७ ते १९६९ या कालावधीत त्यांनी चार अर्थसंकल्प सादर केले. वेगवेगळ्या पंतप्रधानांच्या नेतृत्वात पी. चिदम्बरम् आणि प्रणव मुखर्जी यांनी अनुक्रमे नऊ तसेच आठ अर्थसंकल्प सादर केले आहेत. असे असले तरी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सीतारामन् यांच्याकडे सलग आठ अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम कायम राहील.

**आर्थिक सर्वेक्षण अहवाल आज सादर होणार**

अर्थमंत्री सीतारामन् १ फेब्रुवारी रोजी संसदेत २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. तत्पूर्वी ३१ जानेवारी रोजी संसदेच्या पटलावर आर्थिक सर्वेक्षण अहवाल ठेवला जाणार आहे.

# मनोज जरांगेंचे उपोषण स्थगित; मुंबईत आंदोलनाचा इशारा

‘त्या’ मागण्या आम्ही मान्य करू; उपोषण स्थगित केल्यानंतर फडणवीसांची प्रतिक्रिया

**मुंबई, दि. ३० जानेवारी-**


मराठा आरक्षणासाठी गेल्या काही महिन्यांपासून लढा देत असलेले नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज आपले उपोषण मागे घेतले आहे. भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी त्यांना ज्यूस देऊन हे उपोषण सोडवले. यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे यांचे आंदोलन आणि त्यांच्या मागण्यांसंबंधी प्रतिक्रिया दिली आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडले याचा आनंद आहे असे फडणवीस म्हणाले. आम्ही



मराठा समाजाच्या संदर्भात जे काही निर्णय घेतले आहेत ते महायुतीच्या सरकारनेच घेतले आहेत. हे सगळे निर्माण झालेले प्रश्न कायद्याच्या चौकटीत सोडवणं ही आमची जबाबदारी आहे, आम्ही तो प्रयत्न करतोय. कायद्याच्या चौकटीतील ज्या ज्या मागण्या ते करतील किंवा कोणीही करेल त्या मागण्या आम्ही निश्चित मान्य करू. पण आमचं म्हणणे एवढेच आहे की, भारताचे संविधान आणि कायदा यांच्या चौकटीतील मागण्या असल्या पाहिजेत. त्या असल्या तर योग्य प्रतिसाद सरकारकडून मिळेल. दरम्यान मनोज जरांगे-पाटील यांनी त्यांचे उपोषण स्थगित केले असले तरी त्यांनी पुढे मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा यावेळी सरकारला दिला आहे. सग्यासोयऱ्यांची अंमलबजावणी पाहिजेच आहे. ती झाली नाही तर आता लवकरच मुंबईतल्या आंदोलनाची तारीख जाहीर करणार असल्याचंही मनोज जरांगे म्हणाले. मुंबईत जर आंदोलन सुरु केले तर तिथून काही माघार घेणार नाही. आपल्याला मुंबईला पोलिसांनी मारले तरीही पोलिसांना बोट लावायचं नाही. पण, मंत्र्यांना आणि त्यांच्या पोरांना धरायचे आणि हाणायचे, असा इशाराच मनोज जरांगेंनी दिला. या जागेवर सभामंडप करायचा आहे. यापुढे शक्यतो आता उपोषण करायचं नाही, समोरासमोर लढायचं आहे, असेही मनोज जरांगे-पाटील यांनी आंदोलन स्थगित करताना बोलताना म्हणाले आहेत.

**विनम्र अभिवादन**



रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या यांचा आज तिथीनुसार जन्मदिन

**महत्त्वाचे**

## अधिवेशन सुरळीत चालण्यासाठी सहकार्य करा : रिजिजू

**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आज सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या बैठकीला ३६ राजकीय पक्षांचे ५२ नेते उपस्थित होते. अधिवेशन सुरळीत चालवण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केले. आजची सर्वपक्षीय बैठक समाधानकारक झाली. विरोधी पक्षांनी काही मुद्यांवर अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चा घेण्याची मागणी केली. कोणत्या मुद्यावर किती वेळ चर्चा करायची, याचा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतला जाणार आहे. महाकुंभ, वक्फ दुरुस्ती विधेयक, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या मुद्यावर सरकारने चर्चा करावी, असा आमचा आग्रह राहणार असल्याचे काँग्रेसचे प्रमोद तिवारी यांनी सांगितले. या बैठकीत सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, काँग्रेसतर्फे जयराम रमेश, गौरव गोगोई, द्रमुकचे टी. आर. बालू, तृणमूल काँग्रेसचे सुदीप बंदोपाध्याय, डेरेक ओ ब्रायन, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव यांच्यासह अनेक नेते सहभागी झाले होते.

## नऊ जहाल नक्षल्यांची शरणागती

**सुकमा :** छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यात गुरुवारी सुरक्षा दलासमोर नऊ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यात बहुतांश महिलांचा समावेश असून, त्यांच्या शिरावर ५२ लाख रुपयांचे एकत्रित बक्षीस होते. महत्त्वाचे म्हणजे, एक कोटी रुपयाचे बक्षीस असलेल्या हिडमा आणि देवाच्या टोळीतील दाम्पत्यानेही शरणागती पत्करली आहे. कलमू मांगडू, त्याची पत्नी माडवी बुधरी, मिदियम सुक्का, त्याची पत्नी रजनी आणि महिला कॅडर शांती कावासी, मडकम सोमडी, नुप्पो नरसी, मडकम हिडमे आणि नुप्पो हुंगी यांनी शरणागती पत्करली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. २०२० मध्ये मोठ्या चकमकीत सहभागी असलेला मंगडू हा प्रतिबंधित कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) अंतर्गत कार्यरत असलेल्या पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी (पीएलजीए) बटालियन क्रमांक एकचा डेप्युटी कमांडर म्हणून सक्रिय होता.

## महाकुंभात पुन्हा आग, अनेक तंबू जळून खाक

**प्रयागराज :** प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभात गुरुवारी दुपारी पुन्हा एकदा भीषण आग लागली. छतनाग घाट नागेश्वर घाट सेक्टर २२ मध्ये लागलेल्या आगीत अनेक तंबू जळून खाक झाले. आग विझवण्यात आली आणि या घटनेत कोणतीही जीवितहानी नाही, अशी माहिती अग्निशमन विभागाने दिली. छतनाग घाट नागेश्वर घाट सेक्टर २२ जवळ आज दुपारी एका खाजगी कंपनीने उभारलेल्या वैदिक टेंट सिटीमध्ये आग लागली आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. आगीचे कारण अद्याप कळलेले नाही. यापूर्वी १९ जानेवारी रोजी गोरखपूरमधील गीता प्रेस कॅम्पमध्ये आग लागली होती. त्यानंतर अधिक तंबू जळून खाक झाले होते. उत्तरप्रदेशाचे मुख्य सचिव मनोज कुमार सिंह आणि पोलिस महासंचालक प्रशांतकुमार यांनी दुर्घटनेचा आढावा घेतला.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## प्रजासत्ताक दिन उत्साहात



### बुर्ला महिला महाविद्यालय

ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे माजी अध्यक्ष पांडुरंग दिड्डी यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी संस्थेचे विश्वस्त हरिदास पोटबत्ती व मधुकर कट्टा यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सूत्रसंचालन डॉ. शंकर राजे यांनी केले.

### विचारक्रांती बहुउद्देशीय संस्था

विचारक्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे सिद्धार्थ नगर सोलापूर येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सदर बझार पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजितजी लकडे यांच्या हस्ते करण्यात आले व ध्वज फडकविण्यात आला. यावेळी व्यासपीठावर आत्माराम चंदनशिवे, गौतम जगधने, मिलिंद कांबळे, अनिल बंगाळे, विश्वनाथ गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर शिरसे, अतुल कांबळे, मनीष शिवशरण, नागसेन बंगाळे, पृथ्वीराज शिरसे, राहुल शिवशरण, शुभम गायकवाड, तुषार साबळे, रोहित दावणे, रितेश गायकवाड, शशिकांत चंदनशिवे, आयुष गाडे, वैभव शिंदे, राज गाडे, विजय माने, विवेक चंदनशिवे, सचिन कांबळे, अक्षय सोनवणे, शुभम बनसोडे उपस्थित होते. सूत्रसंचालन विजय कांबळे, आभार संस्थापक सुरज जगधने यांनी मानले.

### ओम सच्चिदानंद वाचनालय

बाळीवेस येथील ओम सच्चिदानंद व श्री राजस्थानी विकास मंडळाच्यावतीने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी पत्रकार सुभाष सुराणा हे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमासाठी लाभले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. वाचनालयाचे अध्यक्ष शरद कालानी यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी विजय जाजू, कमलेश झंवर, लक्ष्मीकांत खडलोया, प्रविण चंडक, मीनाक्षी बजाज, अशोक गौड, गोपाल मंत्री, संतोष काबरा, अजय पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष काबरा यांनी केले तर आभार कमलेश झंवर यांनी मानले.

### मोहिते-पाटील विद्यालय, केगांव

स.म.शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय, केगांव येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी शरद गुळवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रणजित पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन कोष्टी यांनी केले. यावेळी शाहू भोसले, इंद्रजित कांबळे, नागनाथ भोसले, अमोल इगवे उपस्थित होते.

### विद्यानिकेतन, हिंगुलांबिका शाळा

विद्यानिकेतर हायस्कूल व हिंगुलांबिका प्राथमिक शाळा व बालक मंदिर येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब ढगे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून हभप. डॉ. जयंत करंदीकर होते. मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांनी प्रास्ताविक केले. लिपीक सतीश हंचाटे, हभप.डॉ. जयंत करंदीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमात उत्कृष्ट भाषण, वर्गसजावट, फलक लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली. सूत्रसंचालन प्रसाद वाले यांनी केले. माधवी खमितकर यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला तर आभार बीना बुगले यांनी मानले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते मुलांना खाऊ वाटप करण्यात आला.

### आशाताई अंबादास सरगम सेंट्रल स्कूल

पदमशाली शिक्षण संस्थेच्या आशाताई सरगम सेंट्रल स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन संस्थेचे उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, विश्वस्त रमेश बोद्दूल, निलेश सरगम, मुख्याध्यापिका रसिका किल्लेदार यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर भाषणे केली. देशभक्तीपर गाण्यांवर नृत्य सादर करून त्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थी प्रतिनिधी क्रिश तल्लापल्ली व प्रसन्ना कोडम यांनी सूत्रसंचालन केले. नीता पुठा यांनी आभार मानले.

### राष्ट्रसंत शाळा, विश्वभूषण विद्यालय

अक्कलकोट रोडवरील सद्संकल्प शिक्षण समुहाच्या राष्ट्रसंत प्राथमिक शाळा व विश्वभूषण विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक सचिव समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापिका मंजुश्री भालशंकर, मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे उपस्थित होते. प्रास्ताविक रामचंद्र व्हनकडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण पाटील यांनी केले तर आभार दिनेश भालशंकर यांनी मानले. वंदे मातरम् नी कार्यक्रमाची सांगता केली.



### महाएकता बहुउद्देशीय संस्था

महाएकता बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने बुबणे चाळ येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. नागेश खरात यांनी राष्ट्रध्वज फडकाविला. यावेळी जावेद डिग्गे, औदुंबर काळे, चंदू निमगल, अक्षय रामदुर्ग, देवा लाड, राहुल साळुंखे, उत्तम लाड, प्रशांत तोरवी, प्रणव घोडके उपस्थित होते.

# आरोग्य अन् क्रीडाधिकारी पालकमंत्र्यांच्या आले रडारवर

## ● एसटी विभाग नियंत्रकांना नोटीस बजावण्याचे आदेश!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी-**

गुरूवारी पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार समाधान अवताडे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्यावर टक्केवारीचा तर जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांच्यावर निष्क्रियतेचा आरोप केल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या दोन्ही अधिकाऱ्यांच्या कारभाराचे पोस्टमार्टेम करून त्यांना कडक शब्दात सुनावले. दुसरीकडे माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी होत एसटी महामंडळाच्या कारभारावर बोट दाखविले असता एसटी महामंडळाचे विभागीय नियंत्रक बैठकीत अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश पालकमंत्री गोरे यांनी जिल्हाधिकार्यांना दिले.

पालकमंत्री गोरे यांनी पहिल्याच नियोजन समितीच्या बैठकीत आपल्या कामाची कार्यशैली व आक्रमकता दाखवून दिली. आरोग्य विभागात टक्केवारी दिल्याशिवाय कामेच होत नसल्याची तक्रार आमदार आवताडे यांनी केली. शिवाय डॉक्टरांच्या भरतीत जिल्हा आरोग्य अधिकार्यांनी एक एक लाख रुपये घेतल्याचा आरोपही अवताडे यांनी केला. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकाऱ्यांना प्रश्नांची



सरबत्ती करीत पालकमंत्री गोरे यांनी त्यांच्या कारभाराचे वाभाडेच काढले.

आरोग्य विभागाबाबत आमदार व खासदारांकडून आलेल्या तक्रारीनंतर जिल्हा आरोग्य अधिकार्यांवर पालकमंत्र्यांनी कारवाई प्रस्तावित केली. आरोग्याधिकाऱ्यांनी या वर्षात दुरुस्तीसाठी एक रुपयांचा निधी डीपीसीमधून दिला नाही. कोणत्याही लोकप्रतिनिधीची शिफारस नसताना स्वत: परस्पर निधीची वाट लावली. ११ कोटी तरतूद होती. त्यातील साडे दहा कोटींची पाच कामे स्वत:च्या मर्जीने मंजूर केली आहेत. यात काही तरी गोलमाल आहे. ती कामे कुणाच्या शिफारशीने मंजूर केली, असा सवाल आमदार आवताडे यांनी उपस्थित केला. यावर पालकमंत्री गोरे यांनी विचारले की, त्या कामांना डीपीसीची शिफारस आहे का? तुमच्या मर्जीने ही कामे केली आहेत का? अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती करून हा प्रकार गंभीर असल्याचे सांगत याची चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश पालकमंत्र्यांनी दिले. जिल्हा क्रीडा अधिकारी पवार यांच्या कारभारावरही तक्रारी आल्या. क्रीडाधिकारी दाद देत नाहीत, त्यांना कडक शब्दात सूचना देण्याची मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व आमदार समाधान अवताडे यांनी केली. पालकमंत्री गोरे यांनी चौकशी केली असता परस्पर निधी खर्च केल्याचे क्रीडाधिकारी पवार यांनी बैठकीतच कबूल केले. त्यावेळी सभागृह आश्चर्यचकीत झाले. यावेळी पालकमंत्र्यांनी क्रीडाधिकाऱ्यांची तर लाज काढली.

**सभेत मोबाईलवर बोलल्याने डॉ. नवलेंची कानउघाडणी**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले यांच्या विभागावर करण्यात आलेल्या तक्रारींची चर्चा झाल्यानंतर डॉ.नवले हे मोबाइलवर बोलत असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या निदर्शनास आले. त्याचवेळी पालकमंत्र्यांनी त्यांना उभे करून यापुढे बैठकीत मोबाईलवर बोललेले चालणार नाही, अशी सक्त ताकीद दिली. दुसरीकडे क्रीडाधिकारी म्हणून काम करताना शरम वाटली पाहिजे, असा पानउतारा करीत जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनाही कडक शब्दात सुनावले.



# श्री रूक्मिणी स्वयंवर कथेला प्रारंभ

- श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा
- भागवताचार्य साध्वी अनुराधादीदी शेटे यांचे निरूपण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० जानेवारी-**

श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा माघ शुध्द १ ते ५ या कालावधीत संपन्न होत असून, मुख्य दिवस वसंत पंचमी म्हणजे २ फेब्रुवारी रोजी आहे. त्या निमित्ताने श्री विठ्ठल सभामंडप येथे दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत श्री रूक्मिणी स्वयंवर कथेचे आयोजन करण्यात आले असून, त्याचे निरूपण श्री क्षेत्र पंढरपूर येथील प्रख्यात श्रीमद् भागवताचार्य साध्वी अनुराधादीदी राजेंद्र शेटे यांचे सुमधूर व रसाळ वाणीने करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री रूक्मिणी स्वयंवर कथा ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी या दरम्यान होणार आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी मंदिर समितीने केली असून, परंपरेनुसार वसंत पंचमी दिवशी स.१० ते १२ या वेळेत श्री विठ्ठल-रूक्मिणीम ातेचा विवाह सोहळा होत आहे. त्या दिवशी येणाऱ्या भाविकांना अन्नछत्रात विशेष भोजनाची व्यवस्था, मंदिर समितीचे संकेतस्थळ, फेसबुक, युट्यबवरून थेट प्रेक्षपण, मंदिर परिसरात एलईडी स्क्रिन, स्वच्छता, मंडप, मंदिरात आकर्षक फुलांची सजावट, सुरक्षारक्षक नियुक्ती तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. विवाह सोहळा झाल्यानंतर दुपारी प्रदक्षिणा मार्गावर शोभायात्रा काढण्यात येणार असल्याचेही मंदिर समितीचे व्यवस्थापक श्रोत्री यांनी सांगितले.

# चौधरी फाउंडेशनतर्फे आज कवी संमेलनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

चौधरी फाउंडेशन व संतोषी माता महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी कवी कट्ट्यातील कवींचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती चेतन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळील दोंदे नगर येथील मारुती मंदिरात हे संमेलन होणार आहे.




कवी संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ कवी माधव पवार हे भूषविणार आहेत. स्वागताध्यक्ष चेतन चौधरी हे आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बाळासाहेब पाटील हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी डी. एन. जमादार, प्रा. अंजना गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सूत्रसंचालन राजश्री जाधव हे करणार आहेत. एकूण ३० कवींचा यामध्ये सहभागी होणार आहेत. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य माधव पवार यांचाही गौरव करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस संध्या धर्माधिकारी, राजश्री जाधव, दत्तात्रय इंगळे, रामप्रभू माने आधी उपस्थित होते.

# कंत्राटी विद्युत मीटर रीडर कामगारांना समान वेतन लागू करण्याची मागणी

**शनिवारपासून कामबंद आंदोलनाचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

एम.एस.ई.डी.सी.एल. मीटर रीडर कंत्राटी कामगार संघटनेच्या विविध प्रलंबित मागण्यांवर कार्यवाही झाली नाही. त्यावर तातडीने निर्णय घेऊन परिपत्रक काढावे अन्यथा येत्या शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ पासून राज्यभरात मीटर रिडींग घेणे व विज बिल वाटप करण्याचे काम बंद करण्यात येईल, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष अ.रजाक पटेल यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. केंद्र सरकार राज्य शासन आणि महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील सव्वा दोन ते अडीच कोटी ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्यात येणार आहे.

यामुळे १८ ते २० वर्षापासून मीटर रिडींग चे काम करून आपला उत्तरनिर्वाह करणाऱ्या महावितरण कंपनीच्या १५ ते २० हजार म ीटर रीडर कामगारांवर बेरोजगार होण्याची वेळ आली आहे. या संदर्भात वेळोवेळी पाठपुरावा केला मात्र कार्यवाही करण्यात आली नाही. कंत्राटी विद्युत म ीटर रीडर कामगारांना वयाच्या सेवानिवृत्तीपर्यंत रोजगार देण्यात यावा. कंत्राटी विद्युत मीटर रीडर कामगारांना समान वेतन लागू करावे. किमान वेतन कायद्याअंतर्गत मीटर रीडर कामगारांना वेतन मिळावे. राज्य शासनाने इतर देय भत्ते आणि वैद्यकीय सुविधा लागू कराव्यात. मीटर रीडर हे पद कंत्राटी आऊट सोर्सिंग कामगार म्हणून समाविष्ट करावे आदी मागण्यांचा तातडीने विचार करावा अन्यथा येत्या १ फेब्रुवारीपासून काम बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या पत्रकार परिषदेस लक्ष्मीकांत चालवादी, राम चव्हाण, पारस जमखंडे, श्रीनिवास चन्नाप्पागोलू, प्रभाकर सरवदे आदी उपस्थित होते.

# पैशाच्या कारणाने तरुणास फरशीने मारहाण

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

शहरातील बुधवार बाजार परिसरातील रंगा चौकाजवळ पैशाच्या कारणाने तरूणास फरशीने मारहाण करण्यात आली. साहिल नासिर किलीकर (वय २१, रा. नविन विडी घरकुल, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३० जानेवारी रोजी दुपारी दोनच्या सुमारास रंगा चौकाजवळ पैशाच्या कारणाने जुनेद डालारे याने फरशीने व लाथाबुक्क्याने साहिल किलीकर यास मारहाण केली. यामध्ये साहिल याच्या सर्वांगास मार लागल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# शिवजयंतीनिमित्त दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन शिबीर

**संभाजी आरमार शिक्षक संघटनेचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती केवळ उत्सव न होता लोकाभिमुख होण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून अनेकविध लोकोपयोगी उपक्रम संभाजी आम र्च्यावतीने राबविले जात आहेत. यंदाच्या वर्षी देखील सामूहिक विवाह सोहळा, आरोग्य शिबीर, वेगवेगळ्या स्पर्धा, १९ फेब्रुवारी रोजी शाही पालखी सोहळा असे कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

मात्र यावर्षी विद्या-दानाचा अनोखा ज्ञानयज्ञ संभाजी आरम ार करणार आहे. दहावीमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांचे मार्गदर्शन शिबीर रविवार २ फेब्रुवारी ते शनिवार ८ फेब्रुवारी या कालावधीत रोज सायंकाळी ६ ते ७ या वेळेमध्ये शालीवाहन सभागृह, पद्मशाली चौक, सोलापूर येथे होणार आहे. २ फेब्रुवारी रोजी संभाजी कदम (गणेश विद्यालय बीबी दारफळ) हिंदी, ३ फेब्रुवारी चेतन देडे (निळकंठेश्वर प्रशाला) मराठी, ४ फेब्रुवारी शहाजी नीळ (सोमनाग प्रशाला) आणि प्रमिला आखाडे-इंग्रजी, ५ फेब्रुवारी युवराज चव्हाण (थोबडे प्रशाला) गणित भाग-१, ६ फेब्रुवारी दिगंबर लोखंडे (झ. ड. इंग्लिश स्कूल, सोलापूर) गणित भाग-२, ७ फेब्रुवारी श्रीकांत कदम (वसंतराव नाईक हायस्कूल, सोलापूर) विज्ञान, ८ फेब्रुवारी गणेश राठोड (वसंतराव नाईक हायस्कूल) समाजशास्त्र आणि यशवंत बिराजदार हे परीक्षेची भिती कशाला? या विषयावर म ार्गदर्शन करणार आहेत. शिकवणी लावणे आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही. अशा विद्यार्थ्यांना हे शिबीर फायदेशीर ठरणार आहे. यात सहभागी व्हावे असे आवाहन संभाजी आरमार शिक्षक-शिक्षकेतर संघटनेचे जिल्हाअध्यक्ष अजिंक्य पाटील, जिल्हा संपर्क प्रमुख राजाभाऊ आखाडे, शहराध्यक्ष शिवानंद कटके, शहरउपाध्यक्ष राहुल काशीद यांनी केले आहे.

# श्रीक्षेत्र इंचगेरी मठ येथे उद्या संत समागम संमेलनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

श्रीक्षेत्र इंचगेरीमठ (गिरीराज मंदिर) येथे नेहरू नगर येथे श्री. स.स. भाऊसाहेब महाराज व श्री. स.स. गिरीमल्लेश्वर महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी ''संत समागम सम्मेलना''चे आयोजन करण्यात आहे, अशी माहिती मठाधीश पुष्पलता पाटील महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत पुष्पवृष्टी व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. व सकाळी ११ वाजल्यापासून उपस्थित मान्यवर, धर्माचार्य व मातोश्रींचे मानवी जीवनाचे उद्दिष्ट या विषयावर प्रवचन होणार आहे. येथे गुरुमाऊलींचा पुण्यआराधना सोहळा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता श्रीमद् दासबोध ग्रंथाचे पुजन, नेमाचे भजन आरती, सकाळी ११ वाजता संत समागम संमेलन होणार आहे. यावेळी माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, ह.भ.प. श्री. लक्ष्मण महाराज चव्हाण, संपर्क सहप्रमुख नागनाथ बोंगरगे, ह.भ.प.दादा म हाराज (सांगली), प.पू.शुभांगी बुवा माई, परमपूज्य श्री.श्री. १००८ महामंडलेश्वर धर्माचार्य आनंद काडसिध्देश्वर महाराज (कोल्हापुर कण्हेरी मठ), ह.भ.प.श्री. मारुती महाराज तुणतुने, ह.भ.प.शाम जोशी महाराज, प्रजापिता बी. के. सोमप्रभा बहन, योगाचार्य सुधा अळ्ळीमोरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.दरम्यान, दुपारी १ वाजता पुष्पवृष्टी, हळदी कुंकू आणि तिळगुळ कार्यक्रम होणार आहेत. गोरक्षक वैशाली कुलकर्णी यांच्या मंडळातर्फे विष्णु सहस्त्रनाम पठण होणार आहे.दुपारी २ वाजता महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. माधुरी पारपल्लीवार, आकाश शिरटे, प्रविण जिला आदी उपस्थित होते.




# भावसार व्हिजनचा शपथविधी सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

२६ जानेवारी २०२५ रोजी सोलापूर येथे भावसार व्हिजन इंडिया सोलापूर सेंट्रल क्लबचा शपथविधी सोहळा आय एम ए हॉल येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीने विशेष महत्त्व प्राप्त झाले.

कार्यक्रमाला भावसार व्हिजन राष्ट्रीय अध्यक्ष श्री जे. आर. बाळकृष्ण क्षीरसागर, राष्ट्रीय सचिव श्री योगेशजी साखरे, एरिया गव्हर्नर-१०५ श्री श्रीकांत रंगदळ, हिंगुला बिका देवी देवालंय ट्रस्टचे अध्यक्ष श्री किशोरजी कटारे साहेब, तसेच भावसार समाज सोलापूरचे अध्यक्ष श्री राजकुमार हंचाटे साहेब राष्ट्रीय संचालक श्री अश्विन डोईजोडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गायत्री मंत्र सौ अनिता भांबुरे आणि सौ पूनम पुकाळे यांनी म्हणाले. मावळते अध्यक्ष लक्ष्मीकांत मुसळे(२०२४) यांनी प्रमुख पाहुण्याचे स्वागत मनोगत दिले व मावळते सचिव माधव वळसे (२०२४) आणि मागील वर्षीचा सचिव अहवाल सादर केला. या सोहळ्यात नूतन अध्यक्ष म्हणून श्री रविकिरण वायचळ आणि नूतन सचिव म्हणून डॉ. केशव वळसे सर व सर्व संचालक मंडळाने शपथ घेतली.तसेच युवा अध्यक्ष श्री निखिल सुहास क्षीरसागर व युवा सचिव श्री सोहम श्रीकांत रंगदळ यांच्या त्यांच्यासह संचालक मंडळाने शपथ घेतली याच कार्यक्रमात भावसार व्हिजन सेंट्रल या क्लब मध्ये नव्याने सामील ३७ सदस्यचा शपथविधी कार्यक्रम सुद्धा सपन्न झाला. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्री प्रभाकर जवळकर ,संजय पतंगे, सुहास क्षीरसागर, श्री दीपक आकुडे,सिद्राम हंचाटे सर, श्री किरणकुमार मुसळे ,श्री गणेश दंतकाळे श्री प्रभाकर कुसुमकर श्री मनोज क्षीरसागर,श्री सागर पुकाळे ,सौ नंदा क्षीरसागर,सौ सुषमा डोईजोडे सौ पूनम पुकाळे सौ ज्योती क्षीरसागर,सौ किरण रणसुभे, सौ आरती खमीतकर व सर्व संचालक मंडळानी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्र संचलन श्री सुधीर क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री डॉ केशव वळसे सर यांनी केले.हा सोहळा समाजबांधवांमध्ये नवीन ऊर्जा निर्माण करणारा आणि एकत्रित उपक्रमांना चालना देणारा ठरला.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते डॉ. मनोज देवकर यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज समिती कॅबिनेट मंत्री व सोलापूर जिल्हा पालकमंत्री श्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या उपस्थितीत पर्यावरण संवर्धनासाठी गौरव पत्र देण्यात आले.



डॉ मनोज देवकर यांना २०२५ चा प्रजासत्ताक दिनाचा पर्यावरण दूत पुरस्कार जाहीर झाला होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले होते.

आज पालकमंत्र्यांनी या कार्याचे गौरव करून गौरव पत्र दिले व पुढील कार्यास शुभेच्छा दिले व साथ ही असेल असे आश्वासन दिले. डॉ. मनोज देवकर यांना यापूर्वीही वनश्री तसेच शासनाचे विविध पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहे . शासनाच्या सर्व विभागांना घेऊन सर्व पर्यावरण मित्रांना घेऊन तसेच लोकप्रतिनिधी व अनेकांना एकत्रित करून ही चळवळ सातत्याने कार्यरत आहे. त्याच्या याच कार्याचा गौरव म्हणून २०२५ चा पुनश्च पर्यावरण दूत पुरस्कार त्यांना देण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### कलेक्टर बंगल्यासमोरील अपघातातील वृध्द महिलेच्या मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

शहरातील रंगभवन चौकाजवळील कलेक्टर बंगल्यासमोर झालेल्या अपघातातील वृध्द महिलेच्या मृत्यूप्रकरणी कारचालकाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रफुल्ल भालचंद्र दळवी (वय ७२, रा. संजोद बंगला, दत्त नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन किरण कांबळे याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पल्लवी प्रफुल्ल दळवी (वय ६९) असे मृत महिलेचे नाव आहे. १२ जानेवारी रोजी सायंकाळी प्रफुल्ल दळवी व त्यांची पत्नी पल्लवी या एमएच १३ सीएफ ७२९४ क्रमांकाच्या दुचाकीवरून रंगभवन चौकाकडून माणिक चौकाच्या दिशेने जात होते. त्यावेळी कलेक्टर बंगल्यासमोर एमएच १२ एचझेड ७४05 क्रमांकाच्या कारचा चालक किरण कांबळे याने त्याच्या ताब्यातील कार भरधाव व निष्काळजीपणे चालवून दळवी यांच्या दुचाकील मागून जोरदार धडक दिली. या अपघातात पल्लवी दळवी या गंभीर जखमी होऊन मरण पावल्या. त्यामुळे याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक जगताप पुढील तपास करीत आहेत.

### नवऱ्यासोबत तक्रार झाल्याने विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

नवऱ्यासोबत तक्रार झाल्याने विवाहितेने आडजुन्या गोळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. दिदी फातिमा रफिक शेख (वय ३०, रा. व्यंकटेश नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. ३० जानेवारी रोजी पहाटे तीनच्या सुमारास राहत्या घरी नवऱ्यासोबत तक्रार झाल्याने त्या रागाच्या भरात दिदी फातिमा शेख या महिलेने घरातील आडजुन्या ६ गोळ्या खाल्या. त्यामुहे त्यांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### आजारास कंटाळून ब्लेडने मनगट कापून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

आजारास कंटाळून मनगट ब्लेडने कापून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. राजेंद्र आनंद गुंजेटी (वय ५१, रा. जूना विडी घरकुल, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २९ जानेवारी रेजी रात्री आकराच्या सुमारास राहत्या घरात राजेंद्र गुंजेटी यांनी आजारास कंटाळून डाव्या हाताच्या मनगटावर ब्लेडने कापून घेतल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### दुचाकीला वाचविताना चारचाकी खड्ड्यात जाऊन दोघे जखमी

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

दुचाकीला वाचविताना चारचाकी खड्ड्यात जाऊन दोघे जखमी झाले. श्रीदेवी रामण्णा पी व्ही (वय ५४) आणि चंद्रम्मा कृष्णमूर्ती निम्मनपल्ली (वय ६५, रा. हिंदूपूर, आंध्र प्रदेश) अशी जखमींची नावे आहेत. ३० जानेवारी रोजी सकाळी १० च्या सुमारास श्रीदेवी व चंद्रम्मा या दोघी गाणगापूर येथून चारचाकी वाहनाने अक्कलकोटकडे येत होत्या. मैंदर्गी रोड येथे समोरील दुचाकीस वाचविताना चारचाकी वाहनावरील ताबा सुटल्याने वाहन रस्त्याच्या कडेला खड्ड्यात आदळल्याने दोघी जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरून मॉटी मार्तंड शिनगारे (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जून २०२१ पासून मॉटी शिनगारे याने पिडीतचा वारंवार पाठलाग करून तिच्या इच्छेविरूध्द शारीरीक लगट करण्याचा प्रयत्न करून तिचा मानसिक छळ केला. तसेच पिडीतेचे जमलेले लग्न मोडून तिच्याशी अश्लिल कृत्य केले. म्हणून शिनगारे याच्याविरुध्द पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक जगताप पुढील तपास करीत आहेत.

### महिलेच्या विनयभंगप्रकरणी दोघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी दोघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन अजित नवनाथ राठोड (रा. सेवाभावी तांडा, सोलापूर) आणि आकाश मधुकर चव्हाण (रा. वरळेगाव तांडा, ता. दक्षिण सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीतेच्या घरी येऊन ८ जानेवारी रोजी रात्री अजित राठोड व आकाश चव्हाण यांनी पिडीतेला अश्लिल बोलून तिला ओढाओढी करून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून विनयभंग केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार विधाते पुढील तपास करीत आहेत.

### विवाहितेचा विनयभंग; दोघांविरूध्द गुन्हा

**मंगळवेढा, दि. ३० जानेवारी-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात एक तीस वर्षीय विवाहिता शेतात बांधलेली जनावरे आणण्यास गेल्यावर एकटीला पाहून वाईट वासनेने तिच्या शरीराशी झोंबाझोंबी करून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी गणेश दगडू बिचुकले, नारायण गंगाधर बिचुकले (रा. तळसंगी) या दोघाविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी ही तीस वर्षीय असून, २९ जानेवारी रोजी ४.३० वा. तिचे पती गावातील दूध गोळा करण्याकरीता गेल्याने सायंकाळी ५.३० वा. फिर्यादी ही शेतात बांधलेली जनावरे आणण्यासाठी एकटीच गेली होती. यावेळी फिर्यादी हे जनावरे बांधण्यासाठी मारलेली लोखंडी खुंटी उपसून जनावरे घेऊन घराकडे जात असताना आरोपीने येऊन पिडीतेच्या अंगाला झोंबाझोंबी करून अंगावर ओढून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले. यावेळी फिर्यादीने मदतीसाठी आरडाओरडा केली. दोघेजण तेथून निघून गेले. फिर्यादी जनावरे घेऊन घरी आल्यानंतर तिने घडला प्रकार पतीला सांगून गुन्हा दाखल केला आहे.

# दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ : मुख्यमंत्री

## ९८ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते उद्घाटन

**नवी दिल्ली, दि. ३० जानेवारी-**

राजधानी दिल्लीमध्ये २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान सरहद, पुणे आयोजित ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनाच्या दिल्ली कार्यालयाचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज पार पडले. यावेळी संमेलनाला राज्य सरकार सर्वतोपरी पाठबळ देईल आणि साहित्य संमेलन यशस्वी होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हे संमेलन दिल्लीत होणार असल्याने या संमेलनाला विशेष महत्व आहे, हे संमेलन कुण्या एका व्यक्तीचे किंवा संस्थेचे नसून महाराष्ट्रासह जगाच्या पाठीवर असलेल्या सर्व मराठीजणांचे आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज मला या कार्यालयाचे उद्घाटन करताना अतिशय आनंद होत



आहे. दिल्लीत होणारे हे साहित्य संमेलन निश्चितच भव्य होईल. हे संमेलन देशातील नव्हे तर जगभरातील मराठी माणसांसाठी अभिमानास्पद ठरेल. साहित्य संमेलनाचे आयोजन यशस्वी व्हावे यासाठी विविध यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत. महाराष्ट्र शासनही पुर्ण ताकदीने संमेलनाच्या पाठीशी आहे. राजधानीत होणारे हे साहित्य संमेलन विचारप्रवर्तक ठरेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

सरहद, पुणे संस्थेच्या वतीने या संमेलनाचे आयोजन केले जात आहे. देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी साहित्य संमेलनाचे उद्घाटक आहेत तर ज्येष्ठ नेते मा. श्री. शरद पवार साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. दिल्लीतील जुन्या महाराष्ट्र सदनात हेमंत कक्षात साहित्य संमेलनाचे कार्यालय उभारण्यात आले. या कार्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केले.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री तथा संमेलनाचे सरकार्यवाह मा. श्री. मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र सदनचे निवासी आयुक्त नीवा जैन मॅडम, उपयुक्त राजेश आडपवार सर, सहसंयोजक लेशपाल जवळगे, अतुल जैन, आनंद रेखी, प्रदीप पाटील, निवेदिता वैशंपायन, सचिन इटकर, शरद देशमुख आदी उपस्थित होते.

### मुजावर जमात संघाची रविवारी तातडीची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

मुजावर जमात संघाची तातडीची बैठक रविवार, २ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता श्री सिध्देश्वर मंदिरा शेजारील शाहजहूर दर्गा येथे होणार आहे. महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष नजीरअहमद एम. मुजावर यांच्या अध्यक्षतेखाली व उपाध्यक्ष सिकंदर तैय्यबअली मुजावरआणि सचिव महिबूब मुजावर यांच्या उपस्थितेखाली होणार आहे. मुजावर, खादीम, खुद्दाम, मुश्रीफ, पिरजादे, शरिके मसलत, कादरी या सर्व जमातीच्या सर्वांनी या बैठकीस उपस्थित रहावे. महाराष्ट्र राज्य मुजावर जमात संघ सोलापूर शहर व जिल्ह्याच्या नवीन कार्यकारणीची निवड या बैठकीत होणार आहे. जिल्ह्यातील तालुका निहाय जमातीचे पदाधिकारी व जमातीच्या सर्व सदस्यांनी बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन मुजावर जमात संघाने केले आहे.

# मिळकत कर थकबाकीपोटी शांतिनिकेतन शाळेचे कार्यालय सील

### बुधवार पेठ परिसरातील दोन गाळेही केले सील

### पालिका मिळकत कर संकलन विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

मिळकत कराच्या थकित वसुलीसाठी गुरुवारी पाच्छापेठेतील शांती निकेतन शाळेचे कार्यालय सील करण्यात आले तर बुधवार पेठ परिसरातील दोन दुकान गाळे देखील सील करण्यात आले आहेत.

महापालिका प्रशासनाने मार्च अखेरपर्यंत मालमत्ता कर विभागाला २०० कोटी रुपयांच्या थकीत वसुलीचे उद्दिष्ट दिले आहेत. यामुळे शहरातील हद्द वाढ भागासह विविध ५० पेठांमध्ये वसुली आणि कारवाई मोहीम सुरू आहे. कारवाई सुरू केल्यानंतर या मोहिम दरम्यान महापालिकेच्या तिजोरीत दहा कोटीवर थकीत वसुली जमा झाली आहे. गेल्या आठवड्याभरात वसुली पुन्हा थंडावल्याने तसेच नागरिकांकडून स्वतः येऊन भरण्याचा प्रतिसाद कमी मिळत असल्याने आज पासून पुन्हा कारवाई मोहीम तीव्र करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सुरू आहे. मिळकत कराच्या थकित वसुलीसाठी पुन्हा एकदा महापालिका मालमत्ता कर विभागाच्या विशेष पथकाकडून कारवाई मोहीम सुरू करण्यात आली आहे.

यानुसार गुरुवारी पाच्छापेठ आणि बुधवार पेठ परिसराकडे आपला मोर्चा वळविला. पाश्चापेठ परिसरातील शांतिनिकेतन शिक्षण संस्थेकडे मालमत्ता कराची १ लाख ७ हजार ३५३ रुपयांची थकीत वसुलीसाठी पथक गेल्यानंतर संस्थेने असमर्थता दाखविली. यावरून पथकाने संस्थेचे कार्यालय सील केले. तसेच याच परिसरातील मिळकतदार सिद्राम हणमंतअप्पा भिमनपल्ली यांच्याकडील मिळकत कराची १ लाख ५७ हजार ८१५ रुपयांच्या थकीत भरणा न केल्याने त्यांच्या मिळकतीतील नळ जोड तोडून पाणीपुरवठा खंडित करण्यात आला.




बुधवार पेठ परिसरात देखील कारवाईची मोहीम राबविण्यात आली. या ठिकाणी अनेकां कडून थकीत मिळकत कर जमा करण्यात आला अनेकांनी धनादेश दिले. परिसरातील शंकर रेवप्पा हिरेमठ यांची १ लाख ६३ हजार ४०७ रुपयांच्या थकबाकी पोटी त्यांचा एक दुकान गाळा सील करण्यात आला तर बुधवार पेठ परिसरातीलच बसवराज वस्वामीप्पा स्वामी यांच्या १ लाख ९ हजार १२१ रुपयांच्या थकबाकी पोटी त्यांचाही मिळकतीतील दुकान गळा सील करण्यात आला आहे. गुरुवारी दिवसभरात साठ लाखावर वसुली झाली. ही कारवाई यापुढे आणखी तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती विभागाचे अधिक्षक युवराज गाडेकर यांनी दिली.

# सामान्य नागरिकांनी तृतीयपंथीयांना स्वीकारून आपल्यात सामावून घ्यावे!



### सोलापूर विद्यापीठात तृतीयपंथीयांच्या परिषदेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

तृतीयपंथीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाकडून अपेक्षित प्रयत्न होताना दिसून येत आहे. समाज माध्यमातून तृतीयपंथीयांविषयी सकारात्मक जनजागृती आवश्यक आहे. सामान्य नागरिकांनी देखील तृतीयपंथीयांना चांगली वागणूक द्यावी, त्यांना स्वीकारावे आणि त्यांना आपल्यात सामावून घ्यावे, असे आवाहन तोसवान विद्यापीठ, अमेरिका येथील तज्ञ डॉ. पल्लवी गुहा यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुल आणि समाजसेवक ब्रिजमोहन फोफलीया यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात आयोजित दोन दिवसीय तृतीयपंथीयांची आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. पल्लवी गुहा यांच्या हस्ते ऑनलाइन माध्यमाद्वारे झाले. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे होते. यावेळी समाजसेवक ब्रिजमोहन फोफलीया, डॉ. सानवी जेठवाणी, सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत कौशल्य विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनीकेले. मान्यवरांचा परिचय डॉ. अंबादास भासके यांनी करून दिला.

डॉ. पल्लवी गुहा यांनी सरकार, संशोधक व अभ्यासक तृतीयपंथीयांचे जीवनमान बदलू शकतात. तसे प्रयत्न होताना दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने तृतीयपंथीयांच्या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले, ही खूप कौतुकाची गोष्ट असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. कुलगुरू प्रा. महानवर, ब्रिजमोहन फोफलीया यांनी मनोगत व्यक्त केले. या परिषदेत डॉ. सानवी जेठवाणी, सचिन वायकुळे, तृतीयपंथी पहिले सरपंच ज्ञानेश्वर कांबळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर ११० संशोधक, विद्यार्थी शोधनिबंध सादर केले आहेत. एकूण २५० जणांचा यामध्ये सहभाग आहे. या कार्यक्रमासाठी तृतीयपंथी तसेच संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले तर आभार प्रा. तारीक तांबोळी यांनी मानले.

# डब्ल्यूआयटी स्मार्ट स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४ मध्ये देश पातळीवर अव्वल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने राष्ट्रीय स्तरावर गौरवास्पद कामगिरी करत स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४ स्पर्धेत तीन विभागांत प्रथम क्रमांक पटकाविला.

'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन'चा उदय नवोन्मेषाचे चिन्ह म्हणून होत असून, त्यामध्ये जगातील समस्या सोडविण्यासाठी देशातील हुशार व्यक्ती एकत्र येत आहेत. देशभरात अत्यंत प्रतिष्ठेची असलेल्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेची अंतिम फेरी देशभरातील ५१ नोडल केंद्रांवर पार पडली. या स्पर्धेत डब्ल्यूआयटीच्या ९ संघाना प्रतिनिधीत्व करायची संधी मिळाली होती. अंतिम फेरीसाठी निवडलेले महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे हे महाविद्यालय होते. यासाठी प्रा. वैभव कुलकर्णी हे समन्वयक होते. वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य डॉ. विजय आठवले यांनी अभिनंदन केले.

**टीम हाईव्ह**

विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल स्टडीज दिल्ली या ठिकाणी संरक्षण मंत्रालयानी दिलेल्या अर्धकच्च्या माहितीचे वर्गीकरण करून पडताळणी करण्याच्या स्पर्धेत बासित पीरमपल्ली याच्या नेतृत्वाखाली कॉम्प्युटर सायन्स विभागातील योगेश कुलकर्णी, इरफान शेख, गौरव कुलकर्णी, निखिल जैन आणि अर्चिता यादव यांनी प्रा. अनिल चिंचवाडे व यश शेकदार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयांचे पारितोषिक विभागून.

**टीम ब्लॅकवेल**

स्वयंचलित कीटकनाशक फवारणी रोबोट शिक्षण मंत्रालयांने यासाठी मंत्रालयांतर्गत अर्थसाहाय्य केलेले हुबळी येथील के. एल. ई. टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीतील स्पर्धेत ईशान उमरजीकरच्या नेतृत्वाखाली वरूण दोरनाल, ऋग्वेदी पाटील, प्रांजल अलगूर, रितेश पाटील, शंतनू मस्के या संघाने प्रा. दिपाली वाडकर व आदित्य छत्रे तसेच अंतिम वर्षाचा स्टुडन्ट मेंटर नितीन माचरलाचा समावेश. विभागून प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयांचे पारितोषिक विभागून.

**टीम जर्नी मेकर्स**


भूजल संवर्धन आणि व्यवस्थापनावर शैक्षणिक खेळ (वेब-आधारित आणि मोबाइल-आधारित) विकसित करणे या जलशक्ती मंत्रालयाने दिलेल्या या समस्येवर विराग नांदगावकर यांच्या नेतृत्वाखाली श्रेया चोपडा, आयुष्य शहरकर, येशा बाफना, वेदांत नवले, वरद निरगुडे या संघाने प्रा. दिपाली अवसेकर व डॉ. सतीश काशीद तसेच जलसंधारण विभागाचे डॉ. मुस्ताक शेख यांच्या मार्गदर्शनाखाली बेंगळूरू येथील न्यू. होरायझन इंजीनियरिंग कॉलेजमध्ये स्पर्धा झाली. या संघाने प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयांचे पारितोषिक विभागून.

# बार्शीत आजपासून प्रेरणादायी समाजदिन महोत्सव

### कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जानेवारी-**

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रेरणास्त्रोत व समाजभूषण कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्ताने शुक्रवारी ३१ जानेवारी ते ५ फेब्रुवारीदरम्यान विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रेरणादायी समाजदिन महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांनी दिली.



शुक्रवारी ३१ रोजी सकाळी ९ वा. संस्थेच्या जिजाऊ, सावित्री, रमाई महिला बळ विकास समितीमधील महिला कार्यकर्त्यांच्यावतीने महिलांची मोटारसायकल रॅली काढण्यात येणार आहे. शनिवारी १ फेब्रवारी रोजी सकाळी ११ वाजता प्रा. वसंत हंकारे यांचे 'बाप समजून घेताना' व्याख्यान, रविवारी २ दुपारी १ वा. महिला मेळावा होणार आहे. त्यात बार्शीतील महिला बचतगटाच्यावतीने गृहोपयोगी साधनांची विविध दालने उभारण्यात येणार आहेत आणि महिलांसाठी मानिनी फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. भारती चव्हाण यांचे महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रेरक व्याख्यान होणार आहे. सोमवारी ३ रोजी सकाळी १०.३० वा. संस्थेतील गुणवंत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. त्याच दिवशी दुपारी ३ वा. संस्थेच्या विविध शाखांच्या गुणदर्शनाचा कार्यक्रम होणार आहे. मंगळवारी ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता बार्शी शहरात समाज जनजागरण फेरी व समाजदिनाचा मुख्य कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, (कोल्हापूर) हे असून सुप्रसिध्द साहित्यिक व प्रकाशक बाबा भांड (छत्रपती संभाजीनगर) हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी वीर माता, वीर पत्नी यांचा सन्मान होणार आहे.

### रघुनाथ माशेलकर, अनिल काकोडकर यांना पुरस्कार

बुधवारी ५ रोजी सकाळी १० वा. विख्यात शास्त्रज्ञ, पद्मविभूषण प्रा. रघुनाथ माशेलकर व पद्मविभूषण प्रा. अनिल काकोडकर यांना कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे समाज परिवर्तन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे असतील. हे सर्व कार्यक्रम बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहेत. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे. सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार तथा सांस्कृतिक विभागाचे चेअरमन जयकुमार शितोळे तसेच प्रसिध्दी विभाग प्रमुख डॉ. प्रकाश बुरगुटे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# सुख दुःख जीव भोग पावे...

पुण्य मिळविण्यासाठी प्रयत्न करणे आणि पापापासून मुक्ती मिळविण्यासाठी धडपडणे हा माणसाचा स्वभाव आहे. कारण, पाप आणि पुण्य यामधील अस्पष्ट सीमारेषांची त्याला जाणीव असते. कोणती कृत्ये पाप ठरतात आणि कोणत्या कृत्यांने पुण्य पदरात पडते, हेही त्याला माहीत असते. काळ बदलला, प्रगती होत गेली, भौतिक विकासाची सारी साधने हात जोडून समोर उभी राहिली आणि नव्या जमान्यासोबत पाप-पुण्याच्या कल्पनाही बदलत गेल्या, तरी संस्कृतीच्या संस्कारांचा आजही भारतीय मनावर पगडा कायम असल्याने काही कृत्यांमधून घडणारी पापे पुसून टाकण्यासाठी कळत-नकळत माणसाचे मन धडपडतच असते. पापाची सीमा धूसर असल्याने हातून घडणाऱ्या पापाचे प्रायश्चित्त घ्यावे आणि पुण्य पदरात पाडून घ्यावे, यासाठी अनेकजण अनेक उपाय करीत असतात. पण पुण्य मिळविणे हे पाप करण्याएवढे सोपे नसते. पाप धुतले जाणे म्हणजे पुण्य मिळविणे नव्हे, याची अनेकांना जाणीव असते. केवळ पाप पुसून टाकण्यासाठी होणारी तगमग अनेक प्रसंगांतून दिसून येत असते. १४४ वर्षांनंतर येणाऱ्या प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यात झालेली कोट्यवधींची गर्दी हा पाप पुसून पुण्य पदरात पाडून घेण्याच्या प्रयत्नांचाच प्रकार म्हणावा लागेल. अर्थात, या गर्दीला भाविकतेची किनार आहेच आणि पाप-पुण्याच्या कल्पनांवर आजही भाविकांचा विश्वास आहे, याची साक्षदेखील आहे. म्हणूनच महाकुंभाच्या पर्वणीनिमित्त मौनी अमावास्येचा मुहूर्त साधून पवित्र गंगेत डुबकी मारण्यासाठी लावली जाणारी जिवाची बाजी म्हणजे, पुण्य पदरात पडण्याच्या प्रयत्नांची पराकाष्ठाच असते.

वास्तविक जगात वावरताना संसाराच्या रगाड्यातील भौतिकाच्या गर्दीत भरडला गेला की त्यातून या आध्यात्माचे आचरण करणेही तसे सोपे नसतेच. म्हणूनच मनःशांतीच्या शोधासाठी काही सोपे मार्ग निवडणे अपरिहार्य होते आणि सहज साध्य असलेला एखादा मार्ग निवडून त्यापासून पापमुक्तीच्या भावनेचे समाधान मिळविण्याचा प्रयत्न सुरू होतो. आपण ज्याच्या शोधात आहोत, ज्यापासून मुक्ती मिळविण्याची मानसिक भावना अनावर झालेली आहे. ते सारे महाकुंभाच्या पर्वणीवर पवित्र स्नान केल्यास सहजपणे प्राप्त होईल, अशा भावना आणि भाविक भावनेतून जमलेल्या अनेक भाविकांचाही महाकुंभाच्या प्रयागराजच्या तीर्थस्थळावरील कोट्यवधींच्या गर्दीत समावेश आहेच. ज्या पुण्यप्राप्तीसाठी अनेकांनी कठोर तपःसाधना केली, असंख्य शारीरिक यातना सोसल्या, कठोर सत्त्वपरीक्षांना सामोरे जाऊन आपल्या निष्ठा सिद्ध केल्या आणि त्या सर्व कसोट्या पार करून पुण्यप्राप्तीची पात्रता सिद्ध केल्यानंतरच मानसिक समाधानाच्या शोधाचे ईप्सित साध्य झाले, ते पुण्य एका पवित्र डुबकीतून प्राप्त व्हावे, हा खरे तर भक्तिमार्गाचा जवळचा रस्ता म्हणावा लागेल. पण त्यामागेही भक्तिभाव असल्याने त्याचाही आदर करावयास हवा. म्हणूनच भाविकांची कोणतीही गैरसोय न होता त्यांच्या भक्तिभावनेस सुविधायुक्त पुण्यमार्ग दाखविण्यासाठी उत्तरप्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारने संपूर्ण पूर्वतयारी केली. भाविकांस कोणत्याही गैरसोयीचा सामना करावा लागू नये, एवढ्या प्रचंड गर्दीमुळे होणाऱ्या असंख्य अडचणींची शक्यता अगोदरच लक्षात घेऊन त्यानुसार प्रयागराजमधील कुंभनगरीची आखणी करण्यात आली. तरी सोप्या मार्गाने पुण्यप्राप्ती करतानादेखील काही कठोर सत्त्वपरीक्षा द्याव्याच लागतात आणि त्या परीक्षा पार केल्यानंतरच अल्पसे ईप्सित साध्य केल्याचे समाधान प्राप्त होते. कुंभमेळ्याच्या निमित्ताने महाकुंभाच्या पर्वणीवर कोट्यवधींच्या गर्दीतून आपला मार्ग शोधत गंगामातेच्या संगमपात्रात पवित्र स्नान करण्याची पर्वणी साधणेही तसे सोपे नव्हतेच. पापे पुसण्याच्या आणि पुण्य मिळविण्याच्या भावनेतून भाविकतेने जमलेल्या कोट्यवधींच्या गर्दीतून आपल्यासमोर उभ्या ठाकलेल्या संकटांच्या क्षणांना सामोरे जाण्याची प्रत्येकास हिंमत आणि पुण्याई पणाला लावावी तेव्हाच हे ईप्सित साध्य होते, हे याआधीही काही वेळा कुंभमेळ्यांदरम्यान स्पष्ट झाले आहे. प्रयागराजच्या महाकुंभ पर्वणीत मौनी अमावास्येच्या दिवशी झालेल्या दुर्घटनेलाही नियतीने याच कसोटीचा निकष लावला असावा. साऱ्या सज्जता असूनही आणि सुरक्षिततेच्या कडेकोट व्यवस्थांची पुरेपूर आखणी करूनही अनावर आणि काहीशा आततायी गर्दीमुळे घडलेली चेंगराचेंगरीची ही घटना दुर्दैवी आहे, यात शंकाच नाही. पण, एका डुबकीच्या सोप्या मार्गाने पुण्य पदरात पाडून घेण्याची घाई अनेकांना नडली आणि त्यातूनच अनेकांना दुर्घटनेची दुर्दैवी शिकार होण्याची वेळ आली, हे तो प्रसंग प्रत्यक्ष पाहणाऱ्यांच्या अनुभव कथनातून आता स्पष्ट होऊ लागले आहे.

जगातील सर्वात मोठा धार्मिक मेळावा असे ज्याचे वर्णन केले जाते आणि उभे जग ज्याकडे आदराच्या भावनेने पाहते, त्या महाकुंभ मेळ्यात भाविकांच्या गर्दीचे नियंत्रण करणाऱ्या यंत्रणेवर मानसिक आणि शारीरिक ताण किती असेल, याची कल्पना करणे अवघड नाही. एखाद्या छोट्या राष्ट्राच्या संपूर्ण लोकसंख्येएवढा जनसमुदाय एखाद्या निमित्ताने एखाद्या ठिकाणी एकत्र येतो, तेव्हा त्याच्या काही मानसिक अपेक्षा असणे साहजिक असते. महाकुंभ ही काही केवळ बघ्यांची गर्दी जमविणारी जत्रा नाही, तर त्याला धार्मिक महत्त्व आहे. या निमित्ताने देशातील धार्मिक पंथांचे असंख्य अनुयायी आणि सामान्य नागरिक भक्तिभावाने एकत्र येत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या दृष्टीने योगी सरकारने केलेल्या उपाययोजनांचा गेल्या काही दिवसांपासून मोठा गाजावाजा होत होता. अत्यंत चोख व्यवस्था, सुरक्षिततेची हमी आणि प्रत्येक भाविकाला या पवित्र प्रसंगी उपस्थित राहिल्याचे मानसिक समाधान मिळेल, अशी आखणी यामुळे प्रयागराज तीर्थास गेल्या काही दिवसांत सर्वत्र वाखाणले जात होते. अशा प्रसंगी, सामान्य जनतेने समंजसपणाने यंत्रणांना सहकार्य करणेही अपेक्षित असते. भाविकतेच्या भावनेला कोणत्याही उन्मादाचा रंग चढू नये, याचे तारतम्य आणि प्रसंगाचे पावित्र्य राखले जावे, अशी यंत्रणांचीही अपेक्षा असते. पण सामूहिक मानसिकतेपुढे अनेकदा व्यक्तिगत विवेकाच्या भावनेस माघार घ्यावी लागते. समूहाचे मानसशास्त्र हा बरेचदा अनाकलनीय प्रकार असतो. ते कोणत्या प्रसंगी कोणते वळण घेईल याचे आडाखे बांधणे सोपे नसते. प्रयागराज संगमावर मध्यरात्रीनंतरच्या त्या मुहूर्ताची वेळ साधण्यासाठी समूह उतावीळ झाला आणि प्रत्येकास पवित्र स्नान करण्याची आस लागली. त्यातून सारे लोंढे एका दिशेने लोटत चालले आणि सुरक्षिततेच्या भावनेने आश्वस्त असलेल्या निर्धास्त गर्दीवर या लोंढ्यांचे आक्रमण सुरू झाले. चेंगराचेंगरीची अशीच दुर्घटना यापूर्वीही महाकुंभाच्या पवित्र पर्वणीप्रसंगी झाली होती. स्वातंत्र्यानंतर प्रथमच फेब्रुवारी १९५४ मध्ये प्रयागराजच्या याच संगमावर भाविकांची गर्दी अनावर झाल्याने चेंगराचेंगरी होऊन सुमारे ८०० भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. १९८६ मधील महाकुंभ मेळ्यातही अशाच चेंगराचेंगरीच्या घटनेत सुमारे २०० भाविकांना जीव गमवावा लागला होता. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी योगी सरकारने उपाययोजनांनंतरही सुमारे ३० जण चेंगराचेंगरीत प्राणास मुकले. याआधीच्या महाकुंभ मेळ्याच्या तुलनेत यंदाची भाविकांची गर्दी विक्रमी आहे, असे म्हणता येईल. अशा गर्दीत चेंगराचेंगरीसारखी दुर्घटना घडलीच, तर काय होऊ शकते, याची कल्पना करणे कठीण नाही. तरीही, संभाव्य धोके लक्षात घेऊन केलेल्या नियोजनाच्या आखणीमुळे या दुर्घटनेचे स्वरूप पूर्वीपेक्षा काहीसे सौम्य ठरले. खरे म्हणजे, अमृतत्वाचे पुण्य पदराशी बांधण्याच्या पवित्र भावनेने जमलेल्या कोणाही जिवाचा असा दुर्दैवी रीतीने अखेर व्हावी, हे दुःख असह्य असेच आहे. म्हणूनच पवित्र प्रसंगाचे पावित्र्य राखण्याचा भक्तिविवेक प्रत्येकानेच राखला पाहिजे. आता या दुर्घटनेनंतर सुरू झालेले राजकारणही दुर्दैवी आहे. अशा प्रसंगात केवळ एकमेकांवर दोषारोप करण्याऐवजी, दुर्घटनेचा दुर्दैवी आघात सोसणाऱ्यांचे दुःख वाटून घेण्याची, त्यांच्या दुःखात सहभागी होण्याची गरज आहे. राजकारण करून एकमेकांवर कुरघोडी करण्याचे अनेक प्रसंग अन्यत्र असतात. ते करण्याची ही वेळ नाही आणि प्रयागराजसारखी पवित्र पुण्यभूमी ही राजकारणाची जागाही नाही. हा विवेक दाखवून दुःखाच्या या क्षणी दुःखितांच्या संवेदनांसोबत राहण्यातच खरी मानवता आहे. ▌

## दृष्टिकोन

# ...तर लोकशाही अधिक प्रगल्भ होईल

**अभिजित वर्तक**

राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे आणि आपल्या संसदेची शानही आहे. त्यामुळे राज्यसभेचे वेगळे महत्त्वही आहे. राज्यसभेला वरिष्ठ सभागृहाचा दर्जा मिळाला आहे. तो घटनात्मक आहे. राज्यसभेत थेट जनतेतून निवडून आलेले सदस्य नसतात. ते आमदार आणि खासदारांकडून निवडले जातात तसेच काही सदस्यांची नियुक्ती ही राष्ट्रपतींकडून केली जाते. राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह असले, तरी त्यात सगळेच ज्येष्ठ नागरिक असतात, असे समजण्याचे कारण नाही. पण, जे सदस्य राज्यसभेवर निवडून येतात वा नियुक्त केले जातात, ते अनुभवी असतात, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ असतात. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा नेहमीच संसदेला, पर्यायाने देशाला होत असतो. ही बाब लक्षात घेतली तर राज्यसभेचे अस्तित्व किती महत्त्वाचे आहे, हे आपल्या लक्षात येईल. लोकसभेच्या तुलनेत राज्यसभेला असलेले अधिकार काही बाबतीत कमी आहेत, ही बाब मान्य करूनही राज्यसभेचे महत्त्व काही कमी होत नाही. मात्र, गतकाळात संसदेच्या अनेक अधिवेशनांमध्ये विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांविरोधात गोंधळ घालत कामकाज हाणून पाडल्यामुळे अनेकदा असा प्रश्न निर्माण झाला होता की, राज्यसभा बरखास्त का केली जाऊ नये. राज्यसभेमुळे महत्त्वाची विधेयकंच पारित होणार नसतील आणि त्यामुळे देशाचे नुकसान होणार असेल तर राज्यसभा ठेवायचीच कशाला, हा प्रश्न बराच काळ चर्चिला गेला. पण, सुदैवाने तसा कुठलाही प्रस्ताव संसदेच्या विचारासाठी कधी आला नाही आणि आजही राज्यसभा दिमाखात काम करते आहे, हे आपल्या लोकशाहीचे ठोस वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. आजचे सत्ताधारी जेव्हा विरोधात होते तेव्हा त्यांनी राज्यसभेत गोंधळ घालून कामकाज हाणून पाडले होते, तर तेव्हाचे सत्ताधारी आता विरोधात बसून कामकाज होऊ देत नाहीत. त्यामुळे संसदेच्या कामकाजाचे असंख्य महत्त्वाचे तास वाया जातात आणि त्याचा फटका सरतेशेवटी जनतेलाच बसतो. जनतेच्या हितासाठी आणि देशाचे कामकाज सुरळीत चालविण्यासाठी कायदे तयार करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर गोंधळामुळे ती जबाबदारी पार पाडू शकणार नसतील तर राज्यसभा ठेवून करायचे तरी काय, असा उद्वेगजनक सवाल अनेकांनी मधल्या काळात उपस्थित केला होता. त्या वेळी तो योग्यही होता. पण, सुदैवाने राज्यसभा कायम आहे.

गतकाळात राज्यसभेचे २५० वे अधिवेशन संपन्न झाले. त्या अधिवेशनाच्या विशेष सत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे मनोगत व्यक्त केले होते, ते अतिशय महत्त्वपूर्ण होते. सरकारला निरंकुश होण्यापासून राज्यसभेने रोखले, हे पंतप्रधान मोदी यांचे विधान महत्त्वपूर्ण होते. कारण संसदीय लोकशाहीचा आत्मा म्हणून राज्यसभेला ओळख प्राप्त झाली आहे. या वरिष्ठ सभागृहाने देशाला दृष्टी देण्याचे काम केले आहे. खरेच, पंतप्रधान म्हणाले होते त्याप्रमाणे राज्यसभेचा २५० व्या अधिवेशनापर्यंत प्रवास हा असाच झालेला नव्हता. या प्रवासाला एक गौरवशाली परंपरा, इतिहास लाभला आहे. हा प्रवास म्हणजे एक विचारयात्रा आहे, या पंतप्रधानांच्या म्हणण्याला निश्चितच काही अर्थ होता. लोकसभेने पारित केलेल्या विधेयकावर राज्यसभेतील अनुभवी आणि तज्ज्ञ सदस्यांकडून जेव्हा विचारमंथन होते, प्रत्येक पैलूवर सविस्तर चर्चा होते आणि त्यानंतरच ते विधेयक पारित होते. त्यामुळे राज्यसभेचा हा प्रवास म्हणजे एक विचारयात्रा आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह आहे म्हणजे ते ज्येष्ठांचे आहे, असे सरसकट विधान करणे चुकीचे असले, तरी राज्यसभेतील सदस्यांचे सरासरी वयोमान तपासले तर ते पूर्णपणे चुकीचे आहे, असेही म्हणता यायचे नाही. त्यामुळे ज्येष्ठ सभागृहातील ज्येष्ठांनी म्हणजेच राज्यसभेने देशाला दूरदृष्टी देण्याचेही काम केले आहे. दूरदृष्टी देण्याची क्षमताही राज्यसभेत आहे. या क्षमतेचा उपयोग सकारात्मकरीतीने करवून घेतला जाण्याची गरज आहे. गोंधळ घालणारे सभागृह अशी राज्यसभेची ओळख होता कामा नये. राज्यसभेत जर विविध क्षेत्रातील तसेच राजकारणातील ज्येष्ठ-श्रेष्ठांचा समावेश असतो तर मग हे ज्येष्ठ-श्रेष्ठ गोंधळ का घालतात, हा सामान्य माणसाला सतावणारा प्रश्न आहे. याचे उत्तर देण्याची जबाबदारी म्हणूनच राज्यसभेची आहे. राज्यसभेत कुणीही गोंधळ घालू नये. एखादा मुद्दा चर्चेला येतो, तेव्हा त्यावर सांगोपांग चर्चा घडवून आणली जाऊ शकते. प्रत्येक पैलूवर चर्चा केली जाऊ शकते, युक्तिवाद केला जाऊ शकतो. पण, याउलट होणार असेल तर त्यामुळे संसदेच्या कामकाजाचा महत्त्वपूर्ण वेळ वाया जाणार असेल तर राज्यसभेच्या अस्तित्वावर प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहणार नाही. राज्यसभेची सदस्यसंख्या ही लोकसभेच्या सदस्य संख्येपेक्षा अर्धीही नाही. असे असतानाही लोकसभेत होतो त्यापेक्षा अधिक गोंधळ राज्यसभेत होत असेल, सदस्य अध्यक्षांच्या आसनापुढील मोकळ्या जागेत जमून घोषणाबाजी करत कामकाजात व्यत्यय आणत असतील तर या सभागृहाला ज्येष्ठत्वाचा दर्जा द्यायचा तरी कशासाठी? राज्यसभेचे जे ज्येष्ठत्व घटनेनेच मान्य केले आहे. त्याचा सन्मान राखणं हे राजकीय पक्ष आणि त्यांच्या सभागृहातील सदस्यांचं कर्तव्य आहे. ज्या कुणा सदस्याला वा सदस्यांना आपली बाजू मांडायची असते, ती जागेवर उभे राहूनही त्यांना मांडता येते. त्यासाठी अध्यक्षांपुढील मोकळ्या जागेत जाऊन गोंधळ घालण्याची आवश्यकता नाही. हीच आवश्यकता पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या भाषणात अधोरेखित केली होती, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. ही बाब अधोरेखित करताना पंतप्रधानांनी शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि नवीन पटनायक यांच्या बिजू जनता दलाची प्रशंसा केली होती. तीसुद्धा समयोचित आणि योग्यच होती. कारण या दोन्ही पक्षांच्या राज्यसभेतील सदस्यांनी मोकळ्या जागेत जाऊन गोंधळ न घालण्याचे बंधन स्वतःहून लादून घेतले होते. लोकशाहीत यापेक्षा आनंदाची बाब दुसरी कोणती असू शकेल? २५० पेक्षा जास्त अधिवेशनं पाहणाऱ्या राज्यसभेने तीन तलाकविरोधी विधेयक पारित करविले आहे, जम्मू-काश्मीरला विनाकारण लागू होते ते कलम ३७० रद्द करण्यासाठी मदत केली आहे, नवीन मोटार वाहन कायदा पारित करण्यात मोलाचा सहभाग नोंदविला आहे. अनेक ऐतिहासिक घटनांची साक्षीदार असलेली राज्यसभा ही संसदेचे अभिन्न असे अंग आहे आणि ती काळाची गरजही आहे. त्यामुळे राज्यसभेत येणाऱ्या कोणत्याही पक्षाच्या सदस्याने गोंधळ न घालण्याचे बंधन स्वतःला घालूनच वरिष्ठ सभागृहात प्रवेश केला पाहिजे. प्रत्यक्ष कृतीतून आपण ज्येष्ठ असल्याची प्रचीती देशाला घडविली पाहिजे. विरोधकांनी गोंधळ घालू नये एवढेच पंतप्रधानांनी म्हटलेले नाही तर माझ्या पक्षाच्या सदस्यांनाही हे बंधन लागू पडते, असेही त्यांनी म्हटले होते; हेही लक्षात घेतले पाहिजे आणि म्हणूनच सत्ताधारी भाजपाचेही सदस्य भविष्यात राज्यसभेत कसे वागतील, याचे स्पष्ट संकेत मोदी यांनी आधीच दिले आहेत. गतकाळात भाजपाच्या सदस्यांनी गोंधळ घातला होता म्हणून आता विरोधी पक्षांच्या सदस्यांनी बदला घेत गोंधळ घालायचा, ही पद्धत लोकशाहीला न मानवणारी आहे. त्यामुळे ज्येष्ठांनी समाजात जसे वागायचे असते तसेच राज्यसभेतील सदस्यांनी संसदेच्या अधिवेशनात कर्तव्य पार पाडायचे असते, हे लक्षात घेतले तर सर्वकाही सुरळीत होईल आणि जगातली सगळ्यात मोठी लोकशाही अधिक बळकट, प्रगल्भ आणि परिपक्व होईल, यात शंका नाही. ▌

९४२२९२३२०१

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# या देवळीत माझ्या...!

ना. नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांनी विदर्भाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी कामांचा धडाका लावला. गडचिरोली विकासाचे प्रवेशद्वार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. या दोन विदर्भपुत्रांची स्वतंत्र ओळख आहे. यांच्या पाठोपाठ माजी वनमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार आणि आता विद्यमान राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचेही नाव घ्यावे लागेल. या पाठोपाठ विदर्भात माजी खासदार दत्ता मेघे यांचे शिष्य असलेले एक व्यक्तिमत्त्व आहे. दोन वेळा सलग लोकसभेचा आखाडा मारणारे मल्ल माजी खासदार रामदास तडस यांच्याही नावाचा उल्लेख करावा लागेल. नंदूरबार येथील काँग्रेसचे नेते माणिकराव गावीत यांचे अत्यल्प शिक्षण असताना रेल्वे मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली होती. त्यामुळे राजकारण आणि शिक्षण याचा सुतराम संबंध नाही. ज्याला गवसले तो दीर्घकाळ नेता राहतो. वर्धा लोकसभा मतदार संघातील माजी खासदार रामदास तडस यांच्या विषयीही तसेच म्हणावे लागले. माणिकराव गावीत यांच्या पेक्षा थोडे जास्त शिकलेले तडस यांचाही राजकीय प्रवास मनोरंजक आहे. देवळीसारख्या गावातून नगराध्यक्ष ते खासदार असा प्रवास करणारे रामदास तडस हे मल्ल म्हणून राज्यात ओळखले जातात. त्यांनी विदर्भ केसरी हा कुस्तीतला किताब चार वेळा पटकावला आहे. कुस्तीत चित करणाऱ्या रामदास तडस यांनी राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी एसटी थांब्यांसाठी केलेले आंदोलन हे आजही अनेकांच्या स्मरणात आहे. राजकारण हा त्यांचा आवडीचा विषय असला, तरी कुस्तीवर त्यांचे प्रचंड प्रेम आहे. राजकारणात वावरताना इतर पक्षातील नेत्यांसोबत त्यांचे तेवढेच आपुलकीचे संबंध आहेत. राजकारणात अतिशय शांत राहून अनेक गोष्टी ते खेळाडू वृत्तीने स्वीकारतात. याच खेळाडू वृत्तीने त्यांनी महानगरांना लाजवेल, मोठमोठ्या खेळाडूंना भुरळ घालेल अशा भव्य इनडोअर स्टेडियमची निर्मिती देवळीसारख्या छोट्या तालुक्याच्या स्थानावर केली आहे. राज्य सरकारच्या नगरविकास वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून १२ कोटी रुपयांचे ५ हजार प्रेक्षक बसू शकतील असे भव्य स्टेडियम उभारले. 'क' वर्ग नगरपालिका असलेल्या गावातील हे स्टेडियम राज्यात पहिलेच ठरले आहे. गेल्या आठवड्यात त्याच स्टेडियमवर विदर्भात पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर संघाच्या वतीने महिलांसाठीच्या कुस्ती स्पर्धा आटोपल्या. ते स्टेडियम पाहून येथे आलेल्या महिला खेळाडू गदगद झाल्या. आगामी एक वर्षात राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा घेण्यासाठीची निरीक्षकांनी मान्यता दिली. या स्टेडियमवर आता महसूल, पोलिस विभागाच्या ऐटीत स्पर्धा होऊ शकतात. खेळाडू हा विषयच माजी खासदार रामदास तडस यांचा जिव्हाळ्याचा असल्याने त्यांनी आपल्या छोट्या गावात ॲकॅडमीची निर्मिती केली. त्या माध्यमातून देवळीत कबड्डी, कुस्ती, फुटबॉल, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन आणि टेनिसचे प्रशिक्षण दिले जात आहे. विशेष म्हणजे खासदारकीची मिळणारी ३५ हजार रुपये पेन्शनही खेळाडूंना प्रशिक्षणासाठी ते देत आहेत. कुस्तीपटू ऑलिम्पिकमध्ये पोहोचविण्याचा ध्यास त्यांनी घेतला आहे. येथे प्रशिक्षणासाठी येणाऱ्या प्रशिक्षणार्थींसाठी होस्टेल शासनाने द्यावे यासाठी त्यांनी पाठपुरावा सुरू केला आहे. वर्धेसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणावर नाट्यगृहाची वाट असताना रामदास तडस यांनी देवळीत राजे छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाची निर्मिती केली. ७०० नाट्यप्रेमी बसतील एवढी क्षमता त्या नाट्यगृहाची आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात प्रवेश घेऊन तडस खासदार झाले. सलग दोन वेळा खासदार राहिलेले तडस सहज उपलब्ध होतात, अशी त्यांची ओळख होती. लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. परंतु, तो पराभव त्यांनी खेळाडू वृत्तीने स्वीकारला. निकालानंतर आठवड्यातच पुन्हा ते जनतेच्या सेवेत रुजू झाले. विद्यमान खासदार अमर काळे यांच्या वर्धेतील जनसंपर्क कार्यालयात काम घेऊन येणाऱ्या गरजूंपेक्षा जास्त लोकं आजही तडस यांच्या कार्यालयात कामं घेऊन येतात आणि आजही ते संबंधित अधिकाऱ्याला फोन करून, पत्र देऊन येणाऱ्याचे समाधान करतात. खेळ हा श्वास असल्यागत रामदास तडस यांचे काम अव्याहतपणे सुरू आहे. खेळाडूंसाठी स्वतःची पेन्शन देणारे तडस अपवादच म्हणावे लागतील. गडकरी व फडणवीस यांनी विदर्भाची वेगळी ओळख निर्माण केली असताना वर्धा जिल्ह्यातील देवळी कुस्तीचे माहेरघर होऊ पाहत असल्याने खेळायचे असेल तर या 'देवळीत माझ्या' असेच म्हणावे लागेल. प्रत्येक लोकप्रतिनिधींसाठी तडस यांचे छोट्या गावातील स्टेडियम व नाट्यगृह निर्मितीचे कार्य पथदर्शीच ठरावे. ▌



९८८१९०३७६५

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# रुसवेफुगवे; तरीही महायुती सरकार भक्कम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारला सत्तेत येऊन दोन महिने उलटले आहेत. या दोन महिन्यात या सरकारने अनेक चांगल्या गोष्टी केल्या. सर्वात महत्त्वाचे सांगण्यासारखे म्हणजे दावोस परिषदेला जाऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी १५ लाख कोटी गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. यातले सारेच उद्योग लगेच येतील अशातला भाग नाही. पण मोठी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी चांगले वातावरण आहे हा संदेश जगभर गेला, ही मोठी गोष्ट झाली. फडणवीस सरकार मोठी झेप घेऊ शकते. एवढ्यात मोठ्या निवडणुका नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयात दोन वर्षांपासून रखडल्या आहेत. परवाच्या सुनावणीत सरकारने याबाबत स्पष्ट भूमिका मांडली. मुंबईसह राज्यातील २३ महापालिका, २५ जिल्हा परिषद, २०७ नगरपालिका आणि २८४ नगर पंचायतींमध्ये सध्या प्रशासकाची राजवट आहे. मामला कोर्टात असल्याने सारेच हतबल आहेत. सरकारच्या भूमिकेने या रखडलेल्या निवडणुका लवकरच होतील, अशी आशा करायला हरकत नाही. सांगायचं हेतू हा की, सरकार जिव्हाळ्याच्या विषयांवर गंभीर आहे. पण वृत्तवाहिन्या आणि वर्तमानपत्रे पाहिली तर सरकारमध्ये सारे आलबेल नाही, असे कोणाचेही मत होऊ शकते. मात्र त्यावर विश्वास ठेवण्याचे कारण नाही. उलट उद्धव सेनेचे खासदार संजय राऊत आणि त्यांचे 'आका' यांनी आपले आमदार कसे सांभाळायचे, याची चिंता करावी. महापालिका निवडणुका लांबल्या आहेत. पाच महिने 'उपाशी' राहण्याची कळ उबाठा सोसू शकेल? तुम्ही लिहून ठेवा, निवडणुका लागतील तोपर्यंत ठाकरेंची उबाठा रिकामी झालेली असेल.

आता राज्यात तीन पक्षांच्या महायुतीचे सरकार आहे. रुसवेफुगवे, धुसफूस, थोडी वादावादी आहे आणि ती चालणारच. मीडियावाले त्या बातम्या मीठ-मसाला लावून रंगवत आहेत. राजकारणी आहेत. साधुसंत नाहीत. पण आम्ही तिघे कुठलाही निर्णय एकत्र बसून घेतो हे महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी वारंवार सांगितले आहे. परवा अजितदादांनी त्याची पुन्हा ग्वाही दिली. पण विरोधकांना हे पाहवत नाही. त्यामुळे ते वावड्या उठवणारच. त्यात दम नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरे म्हणजे 'शिल्लक ठाकरे सेने'ने विधानसभेच्या ९६ जागा लढवल्या अन् अवघ्या २० जागा जिंकता आल्या. हे २० आमदारही तिकडे किती टिकतील याचा भरवसा नाही. मात्र, संजय राऊत भलत्याच आवेशात बोलतात. ती त्यांची सवय आहे. अनेकदा तोंडावर पडूनही ती खोड जात नाही. मात्र मीडियाला मसाला हवा असतो. त्यामुळे संजय राऊत यांच्या वायफळ बडबडीलाही प्रसिद्धी मिळते. राजकारण म्हटलं की, राजी-नाराजी आलीच. राजकारण म्हटलं, की धुसफूस, अंतर्गत चढाओढ चालणारच. प्रत्येक राजकीय पक्षाला आपला पक्ष वाढवण्याचा हक्क आहे. त्या हिशोबाने स्पर्धा होते. मात्र म्हणून सारे एक आहेत. महाआघाडी सरकार आणि महायुती सरकार यांच्यातला हा मूलभूत फरक लक्षात घेतला पाहिजे. मंत्रिपद मिळाले नाही म्हणून अजितदादांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ म्हणाले होते, 'जहाँ नाही चैना, वहां नही रहना.' पण भुजबळ आहे तिथेच चैन शोधत आहेत. जातील कुठे? तरीही पतंगबाजी होते. महायुतीच्या बैठकीला दांडी मारून एकनाथ शिंदे गावाला गेले तेव्हा 'शिंदे नाराज' अशा बातम्या रंगवून सांगितल्या गेल्या. पण 'मी मात्र शपथ घेणार' असे अजितदादांनी मीडियाला सांगितले तेव्हा दोन तास आधी का होईना शिंदे शपथविधीला आले. सत्ता कोणाला नको असते? सत्ता सोडणेही सोपे नसते. लोकांच्या सेवेसाठी आम्ही राजकारण करतो असे म्हणायला सोपे आहे; पण व्यवहारात जेव्हा घरी बसायचा निरोप येतो तेव्हा चेहरा पडतो. एक लक्षात घ्या, 'देवेंद्र फडणवीस एकच असतो.' एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रिपद देण्याचे भाजपाने ठरवले तेव्हा फडणवीसांनी संघटनेत काम करायची इच्छा जाहीर केली. मात्र पक्षाचा आदेश आला तेव्हा पदावनती घेऊन उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले. नुसते स्वीकारले नाही तर एकनाथ शिंदे यांच्यासोबत मिळून काम केले. पुढे अजितदादांना घेऊन महायुतीचा रथ पुढे नेला. ते पाहूनच जनतेने पुन्हा एकदा या त्रिमूर्तीकडे राज्याचा कारभार दिला. महायुतीच्या साऱ्याच आमदारांनी हे लक्षात घेतले पाहिजे.

आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे . फडणवीस कुठलाही निर्णय एकट्याने घेत नाहीत. शिंदे आणि अजितदादा यांच्याशी चर्चा करूनच फडणवीसांनी पालकमंत्र्यांची यादी फायनल केली. तरीही पालकमंत्री वाटपावरून रायगड आणि नाशिकमध्ये तिढा निर्माण झालेला दिसतो. शिंदे सेनेचे भरतशेठ गोगावले रायगडसाठी तर दादा भुसे नाशिकसाठी हट्टाला पेटले आहेत. तिकडे अजितदादांच्या माणिकराव कोकाटे यांनीही कल्ला चालवला आहे. रायगडचा पालक बदलला तर अजितदादा नाराज होणार. नाशिकचा पालक तर भाजपाचाच आहे. कोणालाही हलवले तरी नाराजी असणार. फडणवीस हा गुंता कसा सोडवतात ते पाहायचे. तसे पाहिले तर शिंदे आणि अजितदादांनीच आपल्या आमदारांना फटकारले पाहिजे. हे का ढील देत आहेत? मंत्रिपद मिळाले असताना या तिघांना ही काय अवदसा आठवली? मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाला कोणी मंत्री कसे आव्हान देऊ शकतो? उद्धव ठाकरे यांच्या महाआघाडी सरकारने अडीच वर्षात केलेली घाण निस्तरून महाराष्ट्राला पुन्हा प्रगतीच्या रुळावर आणायचे आहे. चांगला कारभार द्यायचा आहे. महाआघाडीच्या नेत्यांसारखेच तुम्हीही भांडाल तर मग जनतेने दाखवलेल्या विश्वासाचे काय? जनतेच्या मतांशी तो दगा होईल. उद्धव ठाकरे असेच वागले तेव्हा जनतेने त्यांना जन्मभर आठवेल अशी अद्दल घडवली. अलिकडे मतदार हुशार झाला आहे. लोकसभेत भाजपाला 'शिक्षा' देणाऱ्या मतदारांनी विधानसभेला महायुतीला डोक्यावर घेतले, यावरून काय ते ओळखा. दबाव आणला तर फडणवीस दबतील अशा मस्तीत कुणी राहू नये. फडणवीसांचे एक विशेष आहे. ते समोरच्याला चुका करू देतात, पण त्यांच्याकडे चुकीला माफी नसते.


माझा मुद्दा याहून वेगळा आहे. फडणवीस यांच्या रूपाने राज्याला एक व्हिजनरी मुख्यमंत्री मिळाला आहे. फडणवीस कामाला वाघ आहेत. १८-१८ तास काम करतात. रिझल्ट देऊ शकतात. त्यांना 'फाईल' कळते, प्रशासनावर पक्की मांड आहे. त्यांना महाराष्ट्र खूप पुढे न्यायचा आहे. दिल्लीतली हायकमांड त्यांच्या पाठीशी आहे. फडणवीसांना काम करू द्या. त्यांनी मित्रपक्षांची भांडणं सोडवावी यासाठी त्यांना खपवू नका. मतदारांचा विश्वास गमावाल तर महापालिकेच्या निवडणुकांमध्ये जनता ठोकून काढेल. गेल्या निवडणुकीत युतीत ५६ जागा मिळाल्या असताना ठाकरे शरद पवारांच्या नादी लागले. त्यांना मुख्यमंत्री व्हायचे होते. त्या मोहात त्यांनी जनमताचा कौल लाथाडला. त्याची किंमत आज उद्धव मोजत आहेत. उद्धव ठाकरे यांच्या नादी आता शरद पवारच काय सोनिया गांधीही लागणार नाहीत. बळ नसताना उद्धव ठाकरेंनी स्वबळाची भाषा चालवली आहे. त्यांच्याकडे बळ आहे कुठे? देण्यासारखे काहीही नसताना ठाकरे-राऊत फुकटच्या डरकाळ्या फोडत आहेत. महापालिका निवडणूक जाहीर होऊ द्या. उद्धव यांच्यासोबत शिवसैनिक तर सोडा, संजय राऊतही नसतील. नियती उधारी ठेवत नाही. या जन्मीचे याच जन्मी भोगावे लागते. ▌

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## भक्ती, प्रार्थना आणि दृढभाव

ईश्वरी नामाचा जप करून जीवनात तृप्ती मिळते आणि शरणागती म्हणजेच नामाचा जप असतो . मानवाचे शरीर हे कायम भाड्याच्या घरात रहाते. ईश्वर जिथे राहातो तेच मानवाचे घर असते म्हणूनच तो आनंद वेगळा असतो आणि तसाच आनंद देह सोडताना जर वाटला तरच परमेश्वराच्या ठिकाणी असलेला दृढभाव जागृत होतो. यासाठी जिवंतपणी वृत्ती भगवंताच्या ठिकाणी चिकटली पाहिजे . 'मना एवं मानव्यं करणम् बंधन मोक्षयो' देवाच्या इच्छेप्रमाणे वागले पाहिजे तरच अपेक्षेपेक्षा अद्भुत घडते. प्रपंचातली खरी विश्रांती म्हणजे नामस्मरण. यासाठीच चांगले कर्म करणारा प्रत्येक माणूस हा देव असतो .सत्कृत्यात देव आहे. एकाग्रतेतच आध्यात्मिकतेचा प्रवास सुखकारक होतो. माझे हृदय हेच परमेश्वर मानले तर त्यासारखा जीवनात आनंदच नसतो. मूल्य आणि संस्काररूपी दोरी सुटली की जीवनाचा पतंग खाली येतो हा निसर्गनियम आहे. यासाठी दृढभाव जागृत असावा.



**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

## एक सुखद अनुभव


मोहिनी मिशन विश्व मांगल्य फाऊंडेशन गांधीनगर येथे मी व विनया फडणवीस गेलो होतो. ही संस्था किन्नर म्हणजे तृतीयपंथी लोकांची आहे. कोरोनाच्या काळात श्रद्धा जोशी यांच्या सहकार्याने स्थापन झाली. मोहिनी पीआरओ आहेत. त्यांनी भारतात मिनिस्ट्री मिलिस्ट्री ऑफ कल्चर गव्हर्मेंट कार्यक्रम घेतले आहे. त्यांनीच प्रथम तृतीयपंथी कार्यक्रम संपूर्ण भारतात घेतले. सनातन धर्माचा हाच मुख्य उद्देश. मोहिनी यांचे बोलणे अत्यंत नम्रतेचे व त्या सौंदर्याची खान आहे. या संस्थेतील काही किन्नर शिकलेले असून नोकरी करतात. श्रेया खरे उच्च पदावर आहेत. शिक्षण घेताना त्यांना खूपच त्रास झाला. म्हणून बहुतांशी किन्नर शाळेत जात नाही. त्यांना पैसे मागायला आवडत नाही. समाजात तुमच्या घरी कामे करण्याची त्यांची तयारी आहे. परंतु समाज त्यांना घेत नाही. हळदी-कुंकू कार्यक्रमात नीरा जोगती व सोनी जोगती यांनी हृदयस्पर्शी गाणे म्हटले. जोगवा वाढा किंवा नाही! निंदा जोगवाची करू नका, त्यांना मन-भावना आहेत, परंतु समाजाची साथ नाही. हळद-कुंकू नंतर सुंदर जेवण व वाण म्हणून त्यांनीच विणलेले पाय-पुसणे दिले. त्यांचा स्वयंनिर्मित व्यवसाय म्हणून कमी किमतीत ते विणून विकतात. सर्वांनी त्यांचा फायदा घ्यावा. मला बोलाविले. हळदी-कुंकू वाण दिले हे माझे भाग्य.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

## वाचक पत्रे

## मन गंगेसारखं निर्मळ हवे

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी महाकुंभात गंगेत डुबकी लावल्याने देशाची गरिबी दूर होईल काय? अशी टीका केल्याचे वाचले. गेल्या ५० वर्षांपासून काँग्रेसचा नारा होता 'गरिबी हटाव - देश बचाव' किती गरिबी हटली हे सांगा. आज कुंभमेळ्यामुळे किती लोकांना रोजगार मिळाला आहे. किती लोकं कुंभमेळ्यामुळे पोट भरत आहेत. बस-ट्रॅव्हल्सवाले, पूजेचे साहित्य विकणारे, फूलवाले, मालावाले, न्हावी, नावाडी, रिक्षावाले, पुजारी जवळपास सर्वच समाजाच्या लोकांना कुंभमेळ्यामुळे रोजगार मिळतो आहे. एवढंच काय विमान सेवा, रेल्वे, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय सेवेमुळे देशाची आर्थिक प्रगती होण्यासाठीसुद्धा हातभार लागतो आहे. हा विचार ज्येष्ठ काँग्रेस अध्यक्षांनी बोलताना करायला हवा होता. नंतर त्यांनी माफी मागितली, याला काहीच अर्थ नाही. आज कितीतरी काँग्रेस नेते पक्षाच्या नावाखाली नाही तर वैयक्तिकदृष्ट्या कुंभस्नान करीत आहेत. शेवटी एकच सांगायचं आहे. गंगेत स्नान केल्यावर गरिबी दूर होते का? किंवा गंगेत स्नान केल्यावर पाप धुतले जात का हा प्रश्नच करायला नको. एवढाच विचार करावा, आज गंगा आमच्याच देशात आहे आणि ती पवित्र आहे आणि राहतेसुद्धा. माझ्याकडे २५ वर्षांपासून गंगा आहे. तिला वास नाही किंवा घाण नाही, त्यात अळ्या नाही, म्हणून खडगेजी कुंभमेळ्यामुळे भलेही गरिबी तुमच्या दृष्टीने दूर नसेल होणार, पण रोजगार तर नक्कीच मिळतो आहे आणि लोक कुंभमेळ्याच्या पावन पर्वाचा आनंद घेत आहेत. चुकीची व्यक्तव्य करायची आणि माफी मागायची याला काहीच अर्थ नाही. गंगेबद्दल आणि पवित्र कुंभमेळ्याबद्दल आपल्या भावना किती संकुचित आहे, हे दिसून आले आहे. गंगेचे पवित्र्य आणि कुंभमेळ्याचे पावित्र्य समजायला मन गंगेसारखं निर्मळ हवे असते. ▌



**शिरीष पटवर्धन**/९४२२११००१५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### ६ लाखाला महिलेला गंडविले; एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

पोलिसांची भिती घालून महिलेला ६० रूपये देण्यास भाग पाडून फसवणुक करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कविता श्रीशैल भंडारी (वय ३२, रा. दाजी पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन अनिलकुमार बालाजी कोंडूर (रा. न्यु पाच्छा पेठ, विजय नगर, सोलापूर) याच्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कविता भंडारी यांचे उपेंद्र नारायण नंदाल याच्याकडे ६ लाख ५० हजार रुपये इतकी रक्कम येणेबाकी असल्यामुळे कविता भंडारी यांनी नंदाल याच्याकडे वेळोवेळी पैशाची मागणी केली. त्यावेळी नंदाल याने आजतागायत कविता भंडारी यांना पैसे दिले नाहीत. तेंव्हा अनिल कोंडूर याने कविता भंडारी यांना भेटून तुमचे पैसे मी परत मिळवून देतो, त्यासाठी पुढे मला एक लाख रूपये द्यावे लागतील, तेंव्हा तुम्ही मला एक लाख रूपये द्या, मी तुमचे अडकलेले पैसे काढून देतो, नाही तर तुमचे पैसे गेले म्हणून समजा असे म्हणाला. त्यामुळे कविता भंडारी यांनी त्यांच्याकडील सोने मोडून ३० हजार रुपये व बचत गटाकडून ३० हजार रुपये असे ६० हजार रुपये जमवून अनिल कोंडूर यास ३० जुलै २०२४ रोजी दिले. पैसे घेऊनदेखील अनिल कोंडूर याने कविता भंडारी यांना पोलिसांची भिती दाखवून भंडारी यांनाच दमदाटी करून त्यांची फसवणुक केली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक बिराजदार पुढील तपास करीत आहेत.




### रिक्षातील सहप्रवासी महिलेने चोरले दीड लाखांचे दागिने

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

रिक्षातून प्रवास करणाऱ्या सहप्रवासी महिलेने १ लाख ४७ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याबाबत राधा एकनाथ चौधरी (वय ५१, रा. यशराज नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राधा चौधरी या २८ जानेवारी रोजी दुपारी त्यांचे घर ते मंगळवार पेठ या मार्गाने रिक्षात बसून मंगळवार पेठेत आल्या. या प्रवासादरम्यान रिक्षात त्यांच्यासोबत बसलेल्या महिला प्रवाशाने चौधरी यांची नजर चुकवून त्यांच्या पर्समध्ये असलेली सोन्याचे दागिने ठेवलेली डबी चोरून नेली. या डबीमध्ये ४५ ग्रॅमचे सोन्याचे गंठण व ४ ग्रॅमचे सोन्याचे कानाजील टॉप्स असा १ लाख ४७ हजारांचा ऐवज होता. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.

### दक्षिण कसब्यातून डॉक्टराची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

शहरातील दत्त चौक परिसरातील दक्षिण कसब्यातून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची वृध्द डॉक्टराची दुचाकी चोरून नेली. याबाबत डॉ. अशोक महादेव पटवर्धन (वय ७२, रा. दक्षिण कसबा, दत्त चौक, नवी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास चोरट्याने डॉ. अशोक पटवर्धन यांनी त्यांच्या घरासमोर लावलेली त्यांची २० हजार रुपये किंमतीची एमएच १३ एएस ३५४३ क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक तोडून चोरून नेली. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक कामुर्ती पुढील तपास करीत आहेत.

# मावा, गुटख्यासाठी प्लास्टिक वापरणाऱ्या पान टपऱ्यांवर होणार कारवाई

**महापालिकेतील चर्चासत्रात अतिरिक्त आयुक्त पवार यांची माहिती**

**प्लास्टिक कप वापरणाऱ्या हॉटेल व्यवसायिकांवर कारवाईची मोहीम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३० जानेवारी -**

शहरात मावा, गुटख्यासाठी प्लास्टिक पाऊच वापरणाऱ्या पान टपऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. प्लास्टिक कप वापरल्याने कॅन्सरचा धोका होतो. त्यामुळे प्लास्टिकचे कप वापरणाऱ्या कॅन्टीन आणि हॉटेल व्यवसायिकांवरही कारवाईची मोहीम राबविण्यात येईल, असे महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी स्पष्ट केले.

सोलापूर महापालिकेच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात सोलापूर शहर स्वच्छतेसंदर्भात पत्रकारांसमवेत चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चा सत्रामध्ये अतिरिक्त आयुक्त रवि पवार, उपायुक्त तैमूर मुलाणी, सहायक आयुक्त शशिकांत भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. या चर्चासत्रात पत्रकारांनी विविध सूचना मांडल्या. शहरातील स्वच्छता आणि जीवनमान सुधारले पाहिजे यासंदर्भात यावेळी सविस्तर चर्चा झाली. सोलापूर शहरात छोटे डस्टबिन, आवश्यकतेनुसार घंटागाड्या पोहोचवणे, ई टॉयलेट ऐवजी साधारण स्वच्छतागृह, मुताऱ्या उपलब्ध कराव्यात, प्रत्येक दुकानात कापडीसह नियमानुसार वापरता येणाऱ्या पिशव्या उपलब्ध व्हाव्यात यासह विविध सूचना मांडण्यात आल्या. लोक सहभागातून स्वच्छतेचे उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. स्वच्छता आणि प्लास्टिक बंदी संदर्भात लोक जागृती करण्यात येईल. शहरातील प्लास्टिक निम ूलनासाठी विविध पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल. लोकांनी प्लास्टिक पिशव्या ऐवजी कापडी व ज्यूटच्या पिशव्या वापरण्यासंदर्भात जनजागृती करण्यात येणार आहे. फुटपाथ व रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण हटवण्यासाठी उपायोजना करण्यात येणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, शहरात मावा व गुटखा विक्रीसाठी प्लास्टिक पाऊचचा वापर करण्यात येतो. तो मावा, गुटखा खाऊन संबंधित लोक रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी थुंकतात. यामुळे शहरात अस्वच्छता पसरते. त्याला निर्बंध घालण्यासाठी संबंधित पान टपऱ्यांवर कारवाईची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. धुळमुक्त शहर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही यावेळी नमूद करण्यात आले.

प्रारंभी सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. अतिरिक्त आयुक्त रवी पवार आणि उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी पुढील कार्यवाहीची माहिती दिली. याप्रसंगी मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्यासह पत्रकार व चॅनलचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांनी प्लास्टिक बंदीची शपथ घेतली.



**उघड्यावर लघुशंका करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई**

शहरात उघड्यावर लघु शंका करणाऱ्या आणि शौचास बसणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. शहरात ५०० मीटर अंतरावर अद्यावत टॉयलेट उपलब्ध केले जाईल. राईट टू पी मोहीम पुढील महिन्यात राबविण्यासाठी प्रस्ताव ठेवण्यात येणार आहे, असेही यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी सांगितले.

मनोरमा परिवार अंतर्गत

**मनोरमा स्वयंसहाय्यता महिला विकास नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

अंकुर रोपवाटीकेसमोर कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क
**श्री. भोसले अजय वसंतराव**
चेअरमन (मो.९६२३७१९३२२)
**सौ. ढोकरे मोनिका सोनूलाल**
व्यवस्थापिका (मो.९९२२०९३०९७)

### दिव्यांगांसाठी 'शॉप ऑन ई-व्हेईकल योजना'

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबनासाठी हरित उर्जेवर चालणारे पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. ही योजना दिव्यांग वित्त व विकास महामंडळातर्फे राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी दिव्यांग व्यक्तींनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दि. ६ फेब्रुवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुदत देण्यात आल्याची माहिती दिव्यांग वित्त विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी दिली आहे. गरजू दिव्यांग व्यक्तींना लाभ मिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणी व अर्ज करण्यासाठी पोर्टल सुरू करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तींना https://register.mshfdc.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येईल.

# आरोग्य विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करा



**मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे निर्देश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हा समन्वय समिती, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती, १०८ रुग्णवाहिकांच्या सेवाबाबत, एनटीसीपी समन्वयक समिती, जिल्हास्तरीय दक्षता समि ती, कृष्ठरोग शोध मोहिम आणि स्पर्श अभियान सीएस तसेच जिल्हास्तरीय स्थायी लेखापरिक्षण समिती अशा विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. प्रगतीपथावर असलेल्या विविध कामांची माहिती घेऊन संबंधित विभागाने आरोग्य विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, डीपीओ भगवान भुसारी, सहायक संचालक आरोग्य सेवा डॉ. मोहन शेगर, मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिनाक्षी बनसोडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. आनंद गोडसे, वैदकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक वैशाली थोरात, जिल्हा लेखा व्यवस्थापक वंदना शिंदे उपस्थित होते. अभियानात राज्यातील २० जिल्ह्यामध्ये सोलापूरचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील १४ दिवसाच्या अभियानासाठी ३६ लाख ५७ हजार ५९० लोकसंख्येची निवड करण्यात आली असून २७६७ शोधपथके तयार केली आहेत. शोधपथकाने शोधलेल्या प्रत्येक संशयीताची तपासणी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून करण्यात येईल. याअभियान दरम्यान तपासणी पथकास सहकार्य करावे, असे आवाहन श्री. जंगम यांनी केले.



# डॉ. बंडगर यांच्या 'विनाअनुदानित संकल्पना व स्वरूप' पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथील वरिष्ठ लिपिक डॉ. शिरीष अनिता शामराव बंडगर यांच्या ''विनाअनुदानित संकल्पना व स्वरूप'' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू प्रो. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले. यावेळी प्र कुलगुरू प्रो. डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी प्रो. डॉ. जगन कराडे सर, प्रो. डॉ. गौतम कांबळे, व्यवस्थापन परिषद सदस्ये राजाभाऊ सरवदे, प्राचार्या डॉ. मीना गायकवाड, विद्यापीठ आस्थपना विभाग प्रमुख डॉ. मलिक रोकडे, डॉ. उमराव मेटकरी, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. अभिजित जगताप, ऍड. जावेद खैरदी, आनंद पवार व सोलापूर विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुनील थोरात, उपाध्यक्ष मंगेश कुलकर्णी, कांचन आघाव, कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष रविराज शिंदे, मार्गदर्शक मालकारसिद्ध हैनाळकर, मेजर वसंत सपताळे, उपाध्यक्ष मंगल सोनकवडे आदी उपस्थित होते.

# प्रमोद गायकवाडने जामीन अर्ज मागे घेतला

**वैभव वाघे खून प्रकरण**

**बाकी दोघांच्या जामीन अर्जावर सुनावणी होणार**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी**

सिध्दार्थ हौसिंग सोसायटी येथे राहणाऱ्या वैभव वाघे याचा लोखंडी रॉड, लाकडी दंडुका, फरशी, पट्टा या प्राणघातक हत्यारासह अमानुष मारहाण करून त्याचा खून केल्याप्रकरणी तसेच पिडीत महिला, रितेश विलास गायकवाड, निलेश शिरसे, सागर शिरसे, सुमित विलास गायकवाड यांना मारहाण करून गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी प्रमोद गायकवाड, प्रसेनजीत उर्फ लकी गायकवाड, हर्षजीत गायकवाड, संजय उर्फ सोन्या देवेंद्र गायकवाड, मनोज राजू अंकुश, सनी निकंबे यांच्याविरुद्ध सदर बझार पोलीस स्टेशन येथे वैभव वाघे याचा खून व जखमी साक्षीदारांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

याची हकिकत अशी कि, दि.१ जानेवारी २५ रोजी रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास भीमा कोरेगाव पुणे येथे शौर्य दिन साजरा करण्यासाठी सिध्दार्थ हौसिंग सोसायटीतील रिंकि शिवशरण, अदित्य दावणे, पुथ्वीराज शिरसे व रितेश गायकवाड हे थांबले असताना त्यावेळी बुद्ध विहारजवळ सर्व आरोपी हे त्यांच्या कुटुंबासह थांबलेले होते. त्यावेळी सनी निकंबे हा दारु पिऊन पिडीत महिलेच्या अंगावर आला, प्रमोद गायकवाड पट्टा काढून अदित्य दावणे यास मारहाण करू लागला. त्यावेळी ऋतूज गायकवाड व रिकी शिवशरण यांनी अडविण्याचा प्रयत्न केला असता प्रमोद गायकवाड याने प्रसेनजीत उर्फ लकी, हर्षजीत उर्फ विकी व संजय उर्फ सोन्या या तिघांना आवाज देऊन ''गाडीतील रॉड काढून घेऊन या, या लोकांना माज आलेला आहे, कुठले भिकारडे येथे आलेले आहेत'', असे ओरडून शिविगाळी करून त्यांना बोलावून घेतले. सर्वजण लोखंडी रॉड घेऊन आल्यानंतर सर्वांनी मिळून पिडीत महिला, रितेश गायकवाड, सुमित गायकवाड यांना मारहाण केली, त्यावेळी कोण जर यांच्या मदतीला आले तर त्यांना देखील आम्ही सोडणार नाही असे ओरडल्याने कोणी मदतीला आले नाही. परंतु निलेश शिरसे व सागर शिरसे यांनी सोडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही सर्व आरोपींनी मारहाण केली. त्यानंतर काही वेळाने वैभव उर्फ बंटी वाघे याने भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला असता सर्व आरोपींनी मिळून त्यास मारहाण केली. त्यावेळी वैभव वाघे हा गाडीवरून निघून जाण्याचा प्रयत्न करीत असता समरसेनजीत उर्फ टिपू गायकवाड याने त्याला अडवून पाडले व रस्त्यावरून फारशी उचलून वैभव वाघे च्या डोक्यात घातली. त्यावेळी पुन्हा प्रमोद गायकवाड सह सर्व आरोपींनी मिळून लोखंडी रॉड व लाकडी दंडुकाचे सहाय्याने त्याचे सर्वांगावर मारहाण केली. प्रमोद गायकवाड याने लोखंडी रॉडने वैभव वाघे याचे हात, पाय, तोंड, व डोक्यात मारले, प्रसेनजीत गायकवाड, संजय गायकवाड, हर्षजीत गायकवाड यांनी लोखंडी रोडने त्याचे हातापायावर, डोक्यावर, पाठीवर, व शरीरावर मिळेल तिथे मारहाण केली. अजित गायकवाड व किरण अंकुश यांनी लाकडी बांबूने मारहाण केली. प्रमोद गायकवाड व सर्व आरोपींच्या दहशतीमुळे वैभव वाघे यास सोडविण्यास कोणीही पुढे आले नाही. वैभव वाघे हा मोठमोठ्याने रडत होता परंतु सर्व आरोपी त्यास अमानुषपणे मारहाण करीत राहिले. तो रक्तबंबाळ होऊन पडल्यानंतर सर्व आरोपी निघून गेले. वैभव वाघे यास सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारास दाखल केल्यानंतर दि. ६ जानेवारी २०२५ रोजी तो मरण पावला.

यातील अटकेतील आरोपी प्रमोद रामचंद्र गायकवाड व समरसेनजीत प्रमोद गायकवाड यांनी नियमित जामिनासाठी अर्ज दाखल केलेला असून अजित ईश्वर गायकवाड याने अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. यामध्ये मुळ फिर्यादीतर्फे ॲड. संतोष वि. न्हावकर यांनी हजर होऊन फिर्यादीचे प्रतिज्ञापत्र दाखल करून आरोपींना जमीन देण्यास विरोध केला असून मुख्य आरोपी प्रमोद गायकवाड याचेविरुद्ध १० गुन्हे प्रलंबित असल्याचे न्यायालयाचे निदर्शनास आणून दिलेले आहे. त्यानंतर प्रमोद गायकवाड यांचा जामीन अर्ज मागे घेण्यात आला. बाकी आरोपींच्या जामीन अर्जावर दि ३ फेब्रुवारी २५ रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

यात मुळ फिर्यादीतर्फे ॲड. संतोष वि. न्हावकर, ॲड. वैष्णवी न्हावकर, ॲड. राहुल रुपनर, ॲड. शैलेश पोटफोडे, आरोपी प्रमोद गायकवाड व समरसेनजीत गायकवाडतर्फे ॲड. शशी कुलकर्णी,ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. जे. ए. कांबळे तर आरोपी अजित गायकवाड तर्फे अँड. आर आर पाटील हे काम पाहत आहेत.

# बिअर शॉपीतून लाखांची रोकड चोरणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

रेल्वे स्टेशनजवळील गोल्डन बिअर वाईन्स या बिअर शॉपीतून ९५ हजार ५३३ रुपयांची रोकड चोरणाऱ्या दोघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अक्षयराज सतिश वखाणी (वय ३१, रा. विद्याविहार अपार्टमेंट, रेल्वे लाईन, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन योगेश मनोहर थाकवाणी (रा. गणेश नगर, आरटीओ ऑफीरजवळ, सोलापूर), समर्थ माशाळकर (रा. गुम ास्ता कॉलनी, कुमठा नाका, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षयराज वखाणी याची गोल्डन बिअर वाईन्स नावाचे बिअर शॉपी आहे. या बिअर शॉपीतून १ ऑगस्ट २०२४ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत दुकानातील नोक योगश थाकवाणी याने ९५ हजार ५३३ रुपये रोख रक्कम व वेगवेगळ्या कंपनीचे बिअर त्याचा मित्र समर्थ माशाळकर याच्या मदतीने चोरून नेली आहे. पोलिस उपनिरीक्षक बनकर तपास करीत आहेत.

**सिध्देश्वर पेठेतून दुचाकी चोरीस**

**सोलापूर :** शहरातील सिध्देश्वर पेठेतील पंचकट्टा येथून चोरट्याने वृध्दाची दुचाकी चोरून नेली. याबाबत दिलीप नरसिंह बन्ने (वय ६६, रा. उत्तर कसबा, पत्रा तालीमजवळ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दिलीप बन्ने यांनी २२ जानेवारी रोजी रात्री त्यांची एमएच १३ एडब्ल्यू ५४५८ क्रमांकाची दुचाकी ही पंचकट्टा येथे हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. महिला पोलिस हवालदार शेळके पुढील तपास करीत आहेत.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात**

**अतिक अय्युब दंडोती** - **अर्जदार**
रा. घरकुल कुभांरी, जि. सोलापूर
विरुध्द
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत कुर्डुवाडी** - **सामनेवाला**
**ता. माढा जि. सोलापूर**

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे स्वतः अतिक अय्युब दंडोती यांचा जन्म दिनांक २३/१०/१९७६ रोजी कुर्डूवाडी, ता. माढा येथे झालेला आहे. परंतु त्याचा जन्माची नोंद पुर्वीचे ग्रामपंचायत/न.पा. कुर्डुवाडी येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत/न.पा कुर्डुवाडी येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे स्वतः अतिक अय्युब दंडोती कुर्डुवाडी यांचे जन्म घटनेची नोंद धरणेकामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण झालेल्या दिवसापासून एक महिन्याच्या (३० दिवस) आत लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत/तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना वरीलप्रमाणे मागणीप्रमाणे जन्म नोंद धरुन तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल. तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही यांनी नोंद घ्यावी.

ही नोटीस आज माझी सही व शिक्यानिशी दिली.

**तहसिल कार्यालय माढा**
**क्र.२०२४/कुका(जन्म नोंद)**
**एसआर/२७५/२०२४**
**दिनांक २०/१२/२०२४**

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, माढा**

**दुधनी नगरपरिषद, दुधनी, जि. सोलापूर**

**ई-निविदा सूचना**

दुधनी नगरपरिषद बांधकाम विभागाकरिता शासनाचे सर्वसाधारण रस्ता अनुदान अंतर्गत विकासकामासाठी योग्य त्या नोंदणीकृत पात्रताधारक असलेल्या व अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणारे ठेकेदारकडून अर्ज दि. ३१/०१/२०२५ ते २४/०२/२०२५ अखेर पर्यत मागविण्यात येत आहेत. निविदेबाबत सर्व अटी, शर्ती व वेळापत्रक शासनाच्या www.mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**स्थळ : दुधनी**
**दि. ३१/०१/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**दुधनी नगरपरिषद**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender 1st Call Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000035060 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender ( Ist Call) : 19/2024-2025**, **Particulars: -** Work of Supply & Installation of passive fire protection advance cable transit system at various EHV substation under EHV O&M Division, Solapur Estimated **cost:** Rs. 67,64,252/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 67,643**/- Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 30.01.2025 to 15.02.2025 **Last Date of Submission:** 15.02.2025 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 17.02.2025 at 12:00Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in.**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर कौशल्य विकास केंद्र**

**नवीन अभ्यासक्रमासाठी संलग्निकरण करू इच्छिणाऱ्या नोंदणीकृत महाविद्यालय/संस्थासाठी**

**जाहीर निवेदन**

नोंदणीकृत महाविद्यालयांना संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून कौशल्य विकासकेंद्रांतर्गत प्रमाणपत्र पविका नवीन अभ्यासक्रम सुरू करावयाचे आहेत, अशा सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी विहीत नमुन्यात मान्यतेसाठीचे प्रस्ताव नियमित शुल्कासह ०५/०३/२०२५ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

**अभ्यासक्रम मान्यता शुल्क दर्शविणारा तक्ता**

| | नियमित शुल्क दि. ०५/०२/२०२५ ते ०५/०३/२०२५) | | विलंब शुल्क दि. ०६/०३/२०२५ ते २६/०३/२०२५) | | अतिविलंब शुल्क दि. २७/०३/२०२५ ते ११/०४/२०२५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रति अभ्यासक्रम | पॅरामेडिकल अभ्यासक्रम | इतर सर्व अभ्यासक्रम | पॅरामेडिकल अभ्यासक्रम | इतर सर्व अभ्यासक्रम | पॅरामेडिकल अभ्यासक्रम | इतर सर्व अभ्यासक्रम |
| मान्यता शुल्क | २५,०००/- + GST | १५,०००/- + GST | २६,०००/- + GST | १६,०००/- + GST | २७,०००/- + GST | १७,०००/- + GST |

* नवीन संस्था नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज https://www.sus.ac.in/sde/ या संकेतस्थळावर Downloads Forms या मथळ्यामध्ये ⟶ Affiliation & Renewal Form या शिर्षकावरुन डाऊनलोड करून प्रिंट घ्यावी.
* अर्ज स्वच्छ अक्षरात, मराठी भाषेत भरून, त्यासोबत संकेतस्थळावर मान्यता नियमावलीमध्ये नमूद कागदपत्रे जोडून पूर्ण प्रस्तावाची एक प्रत विहित नमूद दिनांकापूर्वी प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राकडे सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे व अपूर्ण प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत,
* प्रस्ताव सादर करतेवेळी कागदपत्रे हाताळणी शुल्क (प्रक्रिया शुल्क / Processing Fee) प्रती प्रस्ताव रु. १०००/-(Non-Refundable) इतके शुल्क विद्यापीठ खाते क्र. 3177057679, Central Bank of India, IFSC Code CBIN 0282815 Name of the account The Finance ccountS Officer, Punyashlok hilyadevi Holkar Solapur University येथे RTGS/NEFT/UPI ID (Google Pay/Phone Pay) द्वारे जमा करुन त्याची पावती प्रस्तावासोबत जोडावी.
* मान्यता घेवू इच्छिणाऱ्या संस्थांना कौशल्य विकास केंद्राचे सर्व नियम पाळणे बंधनकारक राहील.
* उपरोक्त संदर्भात अधिक माहितीसाठी http://www.sus.ac.in/sde/ या संकेतस्थळास भेट द्यावी अथवा 0217-2744771/72/73 या क्रमांकावर आणि sde pahsus.ac.in या मेलवर संपर्क साधावा.

**टीप:** कौशल्य विकास केंद्र अंतर्गत असणारे अभ्यासक्रम हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विविध प्राधीकरणाच्या मान्यतेने सुरु आहेत. सदरील अभ्यासक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ मार्फत स्वायत्त व स्वयंअर्थसहाय पद्धतीने चालविले जातात.

**जावक क्र.: पुअहोसोविसो/कौविकें/२०२५/१६**
**दिनांक: ३०/०१/२०२५**

**सही/- समन्वयक**
**कौशल्य विकास केंद्र**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# त्रिपुराच्या पहिल्या दिवशी ५ बाद २३० धावा

### महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा रणजी सामना

### शरथ श्रीनिवासचे नाबाद अर्धशतक तर हितेश वाळुंजचे 3 बळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

येथील इंदिरा गांधी आजपासून सुरू झालेल्या शेवटच्या रणजी सामन्यात पहिल्या दिवस अखेरीला खेळ थांबला तेंव्हा त्रिपुरा संघाने पहिल्या डावात ९० षटकात ५ बाद २३० धावा केल्या असून यष्टिरक्षक शरथ ६६ धावांवरती खेळत आहे. त्याच्या सोबतीला रजत डे नाबाद १८ वर आहे.


शरथ श्रीनिवास

सकाळी महाराष्ट्र कर्णधार अंकितने उडवलेला टॉस, नाणेफेक जिंकून त्रिपुरा कर्णधार मनदीप सिंग ने प्रथम फलंदाजी घेतली. सलामीवीर बिक्रम कुमार दास व तेजस्वी जयस्वाल यांनी १९ षटके खेळत ६८ धावा केल्या असताना तेजस्वी जयस्वाल (२३) ला सिद्धेश विरने पवन शहा करवी झेलबाद केले. त्याच्यानंतर पुढच्याच षटकात श्रिदाम पॉल (१) हितेश वाळुंज कडून त्रिफळाचीत झाला.

त्यानंतर माजी भारतीय खेळाडू असलेला कर्णधार मनदीप सिंग फलंदाजीला आला पण पुढील ४ च षटकात बिक्रम दास (३९) देखील हितेश चा शिकार ठरला, त्याचा झेल स्लीप मध्ये सिद्धेश वीर ने घेतला. जेवणाला खेळ थांबला ठेवणं १०१/३ (३४) धावसंख्या होती. पुन्हा खेळ सुरू झाल्या झाल्या ५ षटक नंतर कर्णधार मनदीप सिंग ला रामकृष्ण घोष ने वीर कडे झेल देण्यास भाग पाडले आणि मागील सामन्यात १०० हुन अधिक धावा करणाऱ्या मनदीपचा महत्त्वाचा बळी मिळविला.

चहापानाच्या वेळी खेळ थांबला तेंव्हा १५३/४ (६०) नंतर पुढील जोडी रियाझ उद्दएन (२६) व यष्टीरक्षक फलंदाज शरथ ने महाराष्ट्राची भेदक गोलंदाजी खेळून काढत ५ व्या गड्यासाठी ८२ धावांची भागीदारी केली. १८८ धावांवर रियाझ हा वाळुंज कडून बाद झाला. त्यानंतर आलेल्या रजत सोबत किल्ला लढवत शरथ ने अर्धशतक साजरे केले आणि २३०/५ (९०) धावा झाल्यावर पंचांनी पहिल्या दिवशीचा खेळ थांबवीला. उद्या आता उर्वरित ५ बळी लवकर मिळवून महाराष्ट्र फलंदाजी मध्ये धावांचा डोंगर उभारू शकतो ते उत्तम फलंदाजांची फळी असल्याने व ते पाहण्यासाठी आजच्या सारखी प्रेक्षक गर्दी करतील यात शंका नाही.

तसेच सामना पाहण्यासाठी सोलापुरातील प्रसिद्ध व्यक्ती यांना सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या विशेष व्यवस्था करण्यात आली असून आज अँड.मिलिंद थोबडे, श्री.संजय दबडे, श्री. रवी पवार (मनपा उपायुक्त), रेल्वेचे क्रीडा अधिकारी श्री.त्रिपाठी, फौजदार चावडी पोलिस स्टेशनचे गोविंद पवार, माजी सचिव मृगांक गांधी आदी मान्यवर यांनी खेळाचा आनंद घेतला.


सोलापूर : इंदिरा गांधी स्टेडियमवर गुरुवारी सकाळी महाराष्ट्रविरुध्दच्या सामन्यात पहिल्याच षटकात लेगबिफोरचे जोरदार अपील करताना त्रिपुराचे खेळाडू. (छायाचित्र : केवल तिवारी)

### महाराष्ट्रकडून किरण चोरमलेचे, त्रिपुराकडून रियाझ उद्दैन यांचे रणजी पदार्पण

महाराष्ट्राच्या १९वर्षाखालील कुच बिहार व विनुमंकड स्पर्धेतील संघाचा कर्णधार असलेला किरण चोरमले ने आज रणजी मध्ये पदार्पण केले, त्याला संघाची कॅप मुख्य प्रशिक्षक हर्षद खडीवाले कडून देण्यात आली तर त्रिपुरा संघातून रियाझ उद्दैन देखील रणजी मध्ये पदार्पण केले.

## महत्त्वाचे

### शार्दुल ठाकूरची हॅट्ट्रिक



**मुंबई** : सकाळच्या परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेत शार्दुल ठाकूरने हॅट्ट्रिक घेतली. येथे सुरु झालेल्या अखेरच्या रणजी करंडक साखळी सामन्यात मुंबईने मेघालय संघाला अवघ्या २४.३ षटकांत ८६ धावांत गुंडाळले. त्यानंतर कर्णधार अजिंक्य रहाणे आणि सिद्धेश लाडच्या अर्धशतकांच्या जोरावर मुंबईने ५९ षटकांत २ बाद २१३ धावा उभारून सामन्यावर नियंत्रण मिळवले. मेघालय संघाला झटपट गुंडाळताना शार्दुलने ४ बळी, मोहित अवस्थीने ३ बळी, सिल्व्हेस्टर डीसूझाने २ बळी, तर शम्स मुलानीने एक बळी टिपला. प्रत्युत्तर देताना मुंबईच्या अजिंक्य रहाणेने १५२ चेंडूत ९ चौकार व एका षट्कारसह नाबाद ८३ धावांची खेळ केली. हे त्याचे हंगामातील पहिले अर्धशतक ठरले. सिद्धेश लाडने १५५ चेंडूंत ११ चौकार व एका षट्कारसह नाबाद ८९ धावांची खेळी केली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी नाबाद १७० धावांची भागीदारी करत संघाची स्थिती मजबूत केली. आयुष म्हात्रे व अमोघ भटकळ हे सलामीवीर लवकरच बाद झाले. मुंबई सध्या १२७ धावांनी आघाडीवर आहे.

### झारखंड सरकारकडून दोन महिला हॉकीपटूंना भूखंड

**रांची** : हॉकीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून राज्याचे व देशाचे नाव उंचावणाऱ्या महिला खेळाडूंना झारखंडमधील हेमंत सोरेन सरकारकडून मोठे बक्षिस मिळाले आहे. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या उपस्थितीत झारखंड सचिवालयात आयोजित कार्यक्रमात ऑलिम्पिकपटू सलीमा टेटे व निक्की प्रधानला रांचीतील हरमू येथील निवासी वसाहतीत प्रत्येकी ३७५० चौरस फूट भूखंडाची (जमीन) कागदपत्रे सुपूर्द करण्यात आली. याशिवाय सरकार क्रीडा धोरणांतर्गत सलीमा व निक्की या दोन्ही खेळाडूंना त्यांच्या स्वप्नातील घर बांधण्यासाठी प्रत्येकी ३५ लाख रुपये देण्याची घोषणाही केली आहे. या घोषणेनंतर, दोन्ही स्टार हॉकी खेळाडूंनी मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि संपूर्ण सरकारचे आभार मानले. या दोन्ही स्टार हॉकी खेळाडूंना हरमू हाऊसिंग कॉलनीतील प्लॉट क्रमांक १० (ब) १० (अ) मध्ये प्रत्येकी ३७५० चौरस फूटचे भूखंड देण्यात आले. दरम्यान, झारखंडमधील सिमडेगा जिल्ह्यातील रहिवासी स्टार हॉकी खेळाडू सलीमा टेटे हिला अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच निक्की प्रधान हिचा जन्म झारखंडमधील खुंटी जिल्ह्यातील हेसल गावात झाला. निक्कीचे वडील सोमा प्रधान बिहार पोलिसात कॉन्स्टेबल होते आणि तिची आई जितन देवी गृहिणी आहे.

### लक्ष्य शेओराननने जिंकले पुरुष ट्रॅपचे सुवर्णपदक

**भोपाळ** : गुरुवारी मध्य प्रदेश अकादमीमध्ये झालेल्या तिसऱ्या दिग्विजय सिंग शॉटगन स्पर्धेत आशियाड क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या लक्ष्य शेओरनने पुरुषांच्या ट्रॅपमध्ये फहद सुलतानचा ४७-४५ असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. पात्रता फेरीत चौथ्या स्थानावर राहिल्यानंतर लक्ष्यने कौतुकास्पद कामगिरी केली. सुलेमान इलाहीने अर्जुन, ऑलिम्पिकपटू पृथ्वीराज व अर्शद खानला मागे टाकले. महिलांच्या ट्रॅपमध्ये नीरूने कीर्ती गुप्ताचा ४५-४४ असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. ऑलिम्पिकपटू राजेश्वरी कुमारीने प्रीती रजकवर मात करून कांस्यपदक जिंकले. राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक विजेती सबीरा हरिसने प्रगती दुबेचा पराभव करून पाचवे स्थान मिळवले. श्रेष्ठा सिसोदियाने शूट-ऑफमध्ये २-१ असा पराभव केल्यानंतर कनिष्ठ गटाचे रौप्यपदक जिंकले.

### राष्ट्रीय स्पर्धेसाठी राजीव देसाई लॉन टेनिस संघव्यवस्थापक

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**



डेहराडून, उत्तराखंड येथे २८ जानेवारी ते १४ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेने सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांची महाराष्ट्राच्या पुरुष संघाच्या व्यवस्थापक पदी नियुक्ती केली आहे. लॉन टेनिसच्या सांघिक व वैयक्तिक्य एकेरी व दुहेरीच्या स्पर्धा ५ ते ११ फेब्रुवारी या कालावधीत खेळवल्या जाणार आहेत. त्यांच्या या नियुक्ती बद्दल जिल्हा संघटनेचे अधक्ष राजेश दमाणी, उपाध्यक्ष दिलीप बचुवार, कोषाध्यक्ष दिलीप अत्रे, संयुक्त सचिव पंकज शहा, व्यवस्थापक संध्याराणी बंडगर यांनी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्राचा संघ ३ फेब्रुवारी रोजी उत्तराखंडला रवाना होणार आहे.

# सोलापूरच्या ईशा वाघमोडेला डायव्हिंगमध्ये रौप्य

### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : महाराष्ट्राचे पुरूष, महिला खो-खो संघ उपांत्य फेरीत

**हल्दवानी, दि. ३० जानेवारी-**

हल्दवणी, उत्तराखंड येथे सुरू असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरूष आणि महिला संघाने कर्नाटकच्या दोन्ही संघावर मात करीत उपांत्य फेरीतील प्रवेश निश्‍चित केला आहे. डायव्हिंगमध्ये सोलापूरच्या ईशा वाघमोडे हिने हायबोर्ड डायव्हिंगमध्ये रौप्य पदक पटकाविले. मनीष भावसार व हरीष अन्नलदास यांच्या मार्गदर्शनखाली घडलेली ईशा ही रेल्वेत सीसीटीसी या पदावर कार्यरत आहे.

हल्दवणी येथील क्रीडांगणावर सुरू असलेल्या स्पर्धेत महिला गटात झालेल्या चुरशीच्या सामन्यात कर्नाटक संघावर ६ गुणांनी (३२-२६) मात केली. महाराष्ट्राच्या विजयात प्रियांका इंगळे (२ मि. संरक्षण व २ गुण), संध्या सुरवसे (२ मि. व १.२० मि. संरक्षण व ४ गुण), संपदा मोरे (०.५० मि. संरक्षण व १६ गुण), गौरी शिंदे (१.३० मि., १.४० मि. संरक्षण व २ गुण), अश्‍विनी शिंदे (१.३० मि., १.३० मि. संरक्षण) यांनी मोलाची काम गिरी बजावली. तर कर्नाटकतर्फे मोनिका (१.२० मि., १.४० मि. संरक्षण व ६ गुण), चित्रा बी. (२.१० मि. संरक्षण व ४ गुण), तेजस्विनी के. आर. (१.३० मि. व १.२० मि. संरक्षण) यांनी चांगला खेळ केला. त्यांची मात्रा महाराष्ट्राच्या खेळाडूंपुढे चालली नाही.



**पुरुष गटात कर्नाटकचा धुव्वा**

पुरुष खो-खो गटात महाराष्ट्रने कर्नाटकवर एक डाव १२ गुणांनी (३४-२२) धुव्वा उडविला. विजयी संघाकडून कर्णधार गजानन शेंगाळ (२.३० मि. संरक्षण व २ गुण), शुभम थोरात (१.४० मि., २.०५ मि. संरक्षण व ६ गुण), रामजी कश्यप (१.३५ मि. संरक्षण व ६ गुण), सौरभ आडावकर (१.४५ मि. संरक्षण व २ गुण) यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. कर्नाटककडून संघाप्पा (१.१० मि. संरक्षण व २ गुण), गौतम एम. के (६ गुण) यांनी चांगला खेळ केला.

# सेंट जोसेफ स्कूलला ५० हजारांचे प्रथम पारितोषिक

### अस्मिता खेलो इंडिया फुटबॉल स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

अस्मिता खेलो इंडिया फुटबॉल स्पर्धेत पंधरा वर्षाखालील मुलींच्या गटात सेंट जोसेफ स्कूलच्या खेळाडूंनी दुसऱ्या वर्षीही पन्नास हजारचे प्रथम पारितोषिक पटकाविले.

पश्‍चिम भारत फुटबॉल संघटना व अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्यावतीने स्पर्धा वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर ही स्पर्धा झाली. या स्पर्धेमध्ये एकूण सहा संघांनी सहभाग नोंदवला. प्रत्येक संघाचे दोन सामने झाले. संघास क्रीडा शिक्षक सनी भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे फादर आनंद गायकवाड यांनी अभिनंदन केले.




**दहा सामन्यातून ७० गोल**

सेंट जोसेफ स्कूलने साखळीतील सर्व सामने जिंकले. हा सामन्यातून त्यांनी ७० गोल करत नवा उच्चांक केला आहे. त्यांचे विजय असे : पोलीस पब्लिक स्कूल १२-०, दुसऱ्या सामन्यात ११-०, विमल प्रशाला १४-०, दुसऱ्या सामन्यात १८ -०, सेंट थॉमस स्कूल ३-०, दुसऱ्या सामन्यात १-०, लिटल फ्लावर स्कूल ५-१, दुसरा सामन्यात ३-०, बटरफ्लाय स्कूल १-०, दुसऱ्या सामन्यात ३-०.

# इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग-१५ स्पर्धेस सुरवात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

श्री अरुणोदय मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. प्रायोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम रेल्वे मैदान येथे इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग सिझन-१५ चे उत्साहात सुरुवात झाली. याचे उद्घाटन भाजप शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, इंडियन मॉडेल स्कूलचे सचिव अमोल जोशी, व्यंकटेश पटवारी व स्पर्धा समितीचे अध्यक्ष शरणप्पा पासोडी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

१८ फेब्रुवारी पर्यंत ही स्पर्धा होणार असून या स्पर्धेचे हे १५ वे वर्ष असून १५ संघ १९५ पालक खेळाडू सहभागी आहेत. या स्पर्धा रात्रीच्या प्रकाश झोतात लेदर बॉलवर १२ षटकांमध्ये खेळल्या जातील. उपांत्य फेरीतील व अंतिम फेरीतील सामने १५ षटकांचे राहतील. या स्पधेचे प्रमुख आकर्षण विविध रंगातील गणवेश धारण केलेले खेळाडू, एल. ई. डी स्टॅम्प व बेल्स आधुनिक ॲपच्या माध्यमातून स्कोअरिंग ही या स्पर्धेची वैशिष्टये आहेत. स्पर्धेतील विजयी संघास रुपये १५ हजार, उपविजेत्या संघास रुपये ११ हजार पारितोषिक व चषक देण्यात येणार आहे. या स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, यष्टीरक्षक व मालिकावीर तसेच प्रत्येक सामन्यातील सामनावीरांना स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमप्रसंगी स्पर्धा आयोजन समिती उपाध्यक्ष महादेव वरळे, राजकिरण वडनाल, विशाल गायकवाड, प्रितीश कुलकर्णी, अहमद शेख, सुधांशु भालेराव, हाजी तांबोळी, डॉ. सातपुते, राघवेंद्र जोशी, गणेश जाधव , अमित काबणे, सुगंधराज कुलकर्णी, सोनू केसवाणी, अजित डोंगरकर व महादेव वरळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव वरळे व आभार प्रदर्शन राजकिरण वडनाल यांनी केले. या स्पर्धा यशस्वी करण्याकरिता सचिन ढवाण, संदेश पवार, अक्षय माने, रविकिरण आवटे, राजकुमार माने, अजय चाबुकस्वार हे परिश्रम घेत आहेत.

# समता मराठी विद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात



**सोलापूर दि. ३० जानेवारी -**

येथील मागास समाजसेवा मंडळ संचलित समता मराठी विद्यालयाच्या आंतर शालेय वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न झाला. याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण यांच्या हस्ते क्रीडांगणावर खो-खो मैदानाचे पुजन आणि शाळेच्या नावाने क्रिडा महोत्सव फलकाचे रंगीबेरंगी फुगे हवेत सोडून करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जयवंत हक्के होते.

क्रीडा विषयक शपथ घेऊन खेळायला सुरुवात केली या स्पर्धेत वैयक्तिक आणि सांघिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व विद्यार्थ्यांना खेळासाठी चारूशिला म्हमाणे, ज्योती रणसिंग, सुनिता पवार, मिनाक्षी दि राठोड, संतोप रजपूत, सुजाता डोंगरे, मिनाक्षी राठोड, कल्पना वाघमारे, समिना कौसर मुजावर, लता क्षिरसागर, अनिता शेंडगे, रामराव चव्हाण, अनिल चव्हाण आदींचे सहकार्य लाभले.

# योगसोपान व नैतिक मूल्य संवर्धन शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेत १०० शाळांचा सहभाग

### दर शनिवारी प्रशिक्षण, २६ हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

प्राथमिक शिक्षण मंडळ सोलापूर मनपा यांच्या सहकार्याने व राज्य शिक्षक महासंघाच्या सौजन्याने गीतापरिवार - सर्व कल्याण योग - स्काय आणि हेमा फाऊंडेशन मुंबई यांचे वतीने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा - आनंददायी शनिवार उपक्रम अंतर्गत शहरातील सर्व माध्यमांच्या इच्छुक शिक्षकांसाठी योगसोपान-१ ही १६ आसनांची क्रमबद्ध श्रृंखला तसेच लघुपटांसहित नैतिक मूल्य संवर्धन या संदर्भात शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा एन के ऑर्किड स्कूल येथे संपन्न झाली.

याचे उद्घाटन मनपा उपायुक्त, प्रशासन अधिकारी गिरीश पंडीत व जिल्हा परिषदेच्या माध्यमिक उप शिक्षण अधिकारी स्वाती हवेले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आले. दर शनिवारी योगाभ्यास व जीवनमूल्यांचे संस्कार आवर्जून विद्यार्थ्यांमधे शाळेच्या माध्यमातून रुजावेत, यासाठी ही प्रशिक्षण कार्यशाळा असून आपापल्या विद्यार्थ्यांमधे सद्गुणांचे सिंचन अवश्य करण्याचे आवाहन दोन्ही अधिका-यांनी केले. या कार्यशाळेत शहरातील मराठी, इंग्लिश, कन्नड, तेलुगु व ऊर्दू माध्यमांच्या १०० शाळांच्या शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिक्षकांकडून इयत्ता तिसरी ते सातवीच्या नोंदणीकृत २६ हजार ५१७ विद्यार्थ्यांना सदर प्रशिक्षण यापुढे दर शनिवारी देण्यात येणार आहे.





या कार्यशाळेत गीतापरिवार स्कायच्या राष्ट्रीय समन्वयक संगीता व तांत्रिक सहयोगी मिहिर सुरेश जाधव यांनी योगसोपान आसन श्रृंखलेचे प्रशिक्षण डॉ. संजय मालपाणी रचित क्रमबद्ध व्हिडीओ क्लिप दाखवून प्रत्यक्ष शिक्षकांकडून करवून घेतले. नैतिक मूल्य संवर्धन या सत्रामधे नमुना म्हणून महेंद्र काबरा निर्मित दगडू हा आत्मविश्‍वास या जीवनमूल्यावर केंद्रित लघुपट दाखवून प्रश्‍नोत्तरातून व संबंधित प्रेरक आदर्श व्यक्तिमत्वाची कथा सांगून मूल्य निर्मिती कशी करायची याचे प्रशिक्षण हेमा फाऊंडेशन चे राष्ट्रीय सचिव धीरज सोनार यांनी दिले.

राज्य शिक्षक संघटनेचे सचिव कृष्णा हिरेमठ यांनी या कार्यशाळेचे समन्वयन केले. गीता परिवार सोलापूर शाखेचे अध्यक्ष ओम भैय्या दरक यांनी समर्पक सूत्र संचालन तर सचिव शिवशरण वाणीपरीट यांनी आभार प्रदर्शन केले. आकाश झळकेनवरु, आर्या यादव, ऋतुराज साठे,ओवी शिंदे तसेच गीता मिठ्ठा, गीतांजली पावसकर,गीता गंजूल यांनी कार्यशाळेचे अचूक संयोजन केले. समारोपात ऑर्कीडचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी नूमविच्या नवगिरे, शरदचंद्र प्रशालेचे अमोल मते, विवेकानंद पब्लिक स्कूलचे विठ्ठल वाकचौरे,राजवर्धन प्रशालेच्या सपताळे यांनी रंजक पद्धतीने अभिप्राय व्यक्त करीत सर्वांची मने जिंकली. गीतापरिवारचे संस्थापक स्वामी गोविंददेव गिरि यांच्या शहात्तराव्या जन्मदिवशी उपस्थित शहात्तर शिक्षकांकडून योग व संस्कार विद्यार्थ्यांमधे रुजवण्याचा शुभसंकल्प करण्यात आला.

## प्रजासत्ताक दिन साजरा



### जि. प. कन्नड शाळा, वळसंग

**वळसंग, दि. ३० जानेवारी-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापिका सरोजिनी तावरगेरी होत्या. राष्ट्रपिता महात्मा गांधी व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन ग्रामपंचायत सदस्य गुरुबाई हंजगे व जगदेवी म्हेत्रे तर ध्वजकट्टा पूजन ग्रामसेवक राजकुमार जाधव यांनी केले. ध्वजारोहण ग्रामपंचायत सदस्य विनोद सुरपुरे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केला. यावेळी काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्ष फर्जाना बागवान, ग्रामपंचायत सदस्य सुवर्णा गुरव, राष्ट्रीय शिक्षण समितीचे अध्यक्ष सिद्धय्या मठपती, मुलीमनी, मालुंडे, काटे, मुख्याध्यापक स. चे. सुतार, मुख्याध्यापक श. ब. अरळी उपस्थित होते.



### ग्रामपंचायत, वळसंग

**वळसंग, दि. ३० जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग ग्रामपंचायतीमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सरपंच जगदीश अंटद, विनोद सुरपुर, धानव्वा मठपती, उपसरपंच समीर कटरे उपस्थित होते. हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी यांचे स्मारक येथे तिरंगा फडकवण्यात आला. विद्यार्थी कलावंत विद्यार्थ्यांकडून नृत्य सादर करण्यात आले. फारुक शेख यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ग्राम सेवक राजकुमार जाधव, माजी उपसरपंच आरिफ कुरेशी, ग्रामपंचायत सदस्य श्रीशैल भूसणगी, माजी तंटामुक्त अध्यक्ष बुडन कटरे, ग्राम पंचायत सदस्य मलकप्पा कोडले, विनोद सुरपुरे, शालम आमलीचुंगे, श्रवणबाळ फुटके, कमला गायकवाड, जाई वाघमारे, अश्विनी बर्वे, सुवर्णा गुरव, लक्ष्मी गायकवाड, जयश्री व्हनकडे, गुरुबाई हंजगे, जगदेवी सातलगाव, जगदेवी म्हेत्रे, अनिल बर्वे, शांतकुमार गायकवाड, लिपिक पार्श्वनाथ खोबरे, कुमार होटकर उपस्थित होते.

### वामनराव शिंदे विद्यालय, सांगोला

**सांगोला, दि. ३० जानेवारी-**



सांगोल्यातील वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालयात ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थाध्यक्षा कौशल्यादेवी शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केली. प्रास्ताविक मुख्याध्यापक आर.एम.पवार यांनी केले. ध्वजारोहणास मानवंदना एस. एस. कुंभार यांनी दिली.

### शिक्षक संघाच्या उत्तर सोलापूर तालुकाध्यक्षपदी सिद्धराया कोळी

**अक्कलकोट, दि.३० जानेवारी -**



अध्यक्ष सिध्दराया कोळी



सरचिटणीस पुंडलिक कलखांबकर

जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या उत्तर सोलापूर तालुकाध्यक्षपदी सिध्दराया कोळी, कार्यकारी अध्यक्षपदी आप्पाशा उमराणी व सरचिटणीसपदी पुंडलिक कलखांबकर यांची निवड करण्यात आली. शिक्षक संघाचे माजी राज्याध्यक्ष बाळासाहेब काळे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली. कोषाध्यक्ष सचिन बोराळे, उपाध्यक्ष श्रीशैल समदुर्ले यांची निवड झाली. याप्रसंगी माजी चेअरमन उत्तमराव जमदाडे, जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष वीरभद्र यादवाड, सरचिटणीस रामभाऊ यादव, सिद्राम कटगेरी, कार्यकारी सचिव सतीश वाले, कार्याध्यक्ष संतोष जाधव, ज्ञानेश्वर चट्टे, राज्य कार्यकारिणी सदस्य रेवणसिध्द हत्तुरे, जिल्हा प्रवक्ता बालाजी गुरव, काळे, पतसंस्थेचे चेअरमन नारायण घेरडे, ज्येष्ठ मार्गदर्शक हा. ऊ. पठाण, रब्बीलाल मुल्ला, अल्पसंख्याक अध्यक्ष महंमद हयात पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा संघाचे अध्यक्ष वीरभद्र यादवाड यांनी केले. दक्षिण सोलापूर अध्यक्ष महिबूबसाब सवार, सरचिटणीस मल्लिनाथ पुजारी, महिला आघाडी अध्यक्षा विद्याताई जगताप, अक्कलकोट तालुकाध्यक्ष बसवराज खिलारी, सरचिटणीस शशिकांत रंगदाळ, अक्कलकोट सोसायटी चेअरमन मंजुनाथ भतगुणकी, माजी चेअरमन काशिनाथ विजापुरे, मंगळवेढा अध्यक्ष भाऊसाहेब माने, बाळासाहेब धुमाळ, मोतीचंद वाघमारे, कोषाध्यक्ष बापू काळे, मंद्रुप सोसायटी संचालक संजय देवकत्ते, दक्षिण सोलापूर संपर्क प्रमुख संजय मंगरूळे उपस्थित होते.

## निधन वृत्त

### बसवेश्वर गुळवे



**अकलूज, दि. ३० जानेवारी-**

येथील वीरशैव लिंगायत समाजाचे मार्गदर्शक ज्येष्ठ नेते बसवेश्वरआबा शिवमुर्ती गुळवे (वय ७६) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. माजी ग्रामपंचायत सदस्य त्रिंबक गुळवे यांचे ते मोठे बंधू होत.

### नागनाथ मिठ्ठा



**सोलापूर दि. ३० जानेवारी -**

गांधीनगर अक्कलकोट रोडवरील नागनाथ बुडप्पा मिठ्ठा (वय ७५) यांचे निधन झाले. त्यांच्यामागे ४ मुले, सूना व नातवंडे असा परिवार आहे. पूर्व विभागातील प्रभू मँचिंग सेंटरचे मालक आहेत.

# भेंडमधील जलसमृद्धीचे काम अनुकरणीय

## आ. सुभाष देशमुख : अटल भूजल योजनेंतर्गत अभ्यास सहल

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३० जानेवारी-**



आपल्या गावाची ताकद ओळखा, प्रत्येक कुटुंब सक्षम करा. घराघरामध्ये स्पर्धा लावा, गावागावामध्ये विकासाच्या स्पर्धा लावा. भेंड गावाने पाण्याची पातळी वाढवण्यासाठी केलेल काम कौतुकास्पद आहे. गटातटाचे राजकारण न करता सर्वांनी एकत्रित येत अशाप्रकारे चांगले काम करत प्रत्येक गाव आणि पर्यायाने जिल्हा समृद्ध करावा, असे आवाहन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

अटल भूजल योजनेंतर्गत कामाच्या पाहणीसाठी आयोजित अभ्यास सहल अंतर्गत आ. सुभाष देशमुख यांनी भेंड (ता. माढा) गावास सदिच्छा भेट दिली, यावेळी ते बोलत होते. आ. देशमुख म्हणाले, भेंड हे जिल्ह्यातील मॉडेल गाव म्हणून पुढे येत आहे. लोकसहभागाच्या माध्यमातून पाणी, जलसंधारण, बायोगॅस या माध्यमातून समृद्ध गाव या विषयावर काम सुरू करावे. जिल्ह्यात धार्मिक पर्यटनस्थळे खूप आहेत. त्यांची प्रसिद्धी करा. एखाद्या विशिष्ट उत्पादनाद्वारे आपल्या गावाची ओळख निर्माण करा. याप्रसंगी माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे, डॉ. संतोष दळवी यांनी प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यांतर्गत अभ्यास सहलीसाठी सरपंच मनीषा दळवी, वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. मुस्ताक शेख, सहाय्यक भूवैज्ञानिक डॉ. संजय साबळे, जाधव, गरड, सुभाष रणदिवे, शिवाजीराव पवार, भूजल मित्र व ग्रामस्थ तसेच जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील क्षमता बांधणी व माहिती शिक्षण संवाद तज्ज्ञ प्रशांत सोरटे, जलसंधारण तज्ज्ञ गायकवाड, कृषीतज्ज्ञ सुमित गायकवाड व जिल्हा अंमलबजावणी भागीदार संस्थेचे प्रकल्प समन्वयक गणेश घाडगे, विषय तज्ज्ञ व समूह संघटकांचे सहकार्य लाभले.



## लतिका यादव, दत्तू यादव यांना आदर्श माता-पिता पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३० जानेवारी-**

पुणे येथील सुसंगत फाउंडेशनच्या वतीने कोंडबावी (ता. माळशिरस) येथील लतिका व दत्तू यादव यांना राज्यस्तरीय आदर्श माता-पिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, उद्योजक राहुल भोसले, प्रकाश चव्हाण, नजीर तांबोळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर न्हाळदे, सचिव संगिता न्हाळदे, विश्वस्त धोंडीराम गडदे, विजयकुमार दुबे, फाउंडेशनचे सर्व सदस्य तसेच प्रकाशक रुपाली अवचरे, निखिल लंभाते आदी उपस्थित होते. प्रा. मिलिंद जोशी, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे मुख्य मार्गदर्शक आणि साधना ट्रस्टचे अध्यक्ष विवेक सावंत यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष सुधाकर न्हाळदे यांनी तर सूत्रसंचालन जागृती कुलकर्णी आणि माणिक सोनवलकर यांनी केले. आभार धोंडीराम गडदे यांनी मानले.

## विनापरवाना लाकूड वाहतूक करणारा ट्रक मुद्देमालासह जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० जानेवारी-**



सांगोला ते मिरज रोड येथे रात्रीची फिरती करत असताना विनापरवाना कडूलिंब जळावू लाकूड वाहतूक करत असताना ट्रक मालासह जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर यांनी दिली.

सांगोला ते मिरज रोड येथे फिरती करत असताना२८ जानेवारी रोजी रात्री १.३० वा. ट्रक (क्र. एम. एच. ४५/०९८०) मध्ये कडूलिंब जळावू लाकूड २२.६३८ घ. मी. दिसून आले. वाहन चालकाकडे वनविभागाचा वृक्षतोड परवाना व वाहतूक पास परवाना नसल्याचे दिसून आले. जप्त लाकूड मालाचे अंदाजे १० टन व किंमत ३० हजार होईल. वाहन चालक अनिल श्रीशेल बिराजदार (रा.शिरडोण, ता. चडचण, जि. विजयपूर), ट्रक मालक राजू लक्ष्मण सोलकर (रा. कात्राळ, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर), लाकूड व्यापारी बिराप्पा लक्ष्मण सोनलकर (रा. शिरडोण, ता. चडचण, जि. विजयपूर), शेतकरी माळाप्पा लक्ष्मण माने (रा. कात्राळ, ता. मंगळवेढा) यांनी विनापरवाना वृक्षतोड व वाहतूक केल्याबद्दल वनरक्षकांनी प्रथम वन गुन्हा नोंद केला आहे. तपास सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी करीत आहेत. ही कारवाई पुणे मुख्य वनसंरक्षक (प्रा) लेफ्टनंट कुशाग्र पाठक, सोलापूर सहा. वनसंरक्षक(कॅम्पा) एन. आर. प्रवीण, उपवनसंरक्षक व्ही. एन. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर, वनपाल जे. जे. खोंदे, वनरक्षक जी. बी. व्हरकटे यांनी केली.

## चुंगी येथे दुचाकीच्या धडकेत वृद्धेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० जानेवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील चुंगी येथे मोटारसायकल चालकाने मोटारसायकल भरधाव वेगाने चालवून वयोवृद्ध महिलेला धडक दिल्याने उपचारासाठी सोलापूरकडे नेताना मृत्यू झाला. या घटनेची नोंद उत्तर पोलीस ठाण्यात झाली असून मोटारसायकल चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



२२ जानेवारी रोजी दुपारी तीनच्या सुमारास फिर्यादी विनोद बाबुराव थोरे हे घरासमोरील कट्टयावर बसले होते. विनोद थोरे यांच्या आई वत्सलाबाई थोरे (वय ८३) व चुलत आत्या कान्होपात्रा संभाजी रणझुंजारे (वय ७९) असे शेजारीशेजारी त्यांच्या घरासमोरील चुलते श्रावण राणू थोरे यांच्या घरासमोरील अंगणात धान्य पाकडत बसले होते. तेव्हा विठ्ठल मंदिराकडून हन्नूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका मोटारसायकल चालकाने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल भरधाव वेगाने चालवून आत्या कान्होपात्रा व आई वत्सलाबाई यांना जोराची धडक दिली. चालक आर्यन धनराज चव्हाण व पाठीमागे बसलेला इसम अमर दिलीप जाधव (दोघे रा. चुंगी, ता. अक्कलकोट) हे दोघे पळून गेले. मोटारसायकलने जोराने धडक दिल्याने कान्होपात्रा जखमी झाल्या. त्यांचे नाक व कानातून रक्तस्राव झाल्याने त्या जागीच बेशुध्द पडल्या. आई वत्सलाबाई यांच्या डाव्या डोळ्याच्या वर, तोंडावर, पोटात मुका मार लागला आहे. त्या दोघींना वैद्यकीय उपचारासाठी घराशेजारील जनाबाई काशिनाथ गायकवाड, जयश्री सुभाष माने यांच्या मदतीने खाजगी वाहनाने श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल अक्कलकोट येथे दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्या दोघींवर प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापूर येथे जाण्यास सांगितले.

अश्विनी हॉस्पिटल कुंभारी येथे दोघींना उपचारास दाखल केले असता डॉक्टरांनी चुलत आत्या कान्होपात्रा संभाजी रणझुंजारे यांना मयत घोषित केले. वत्सलाबाई थोरे यांच्यावर उपचार सुरु आहेत. या प्रकरणी विनोद बाबुराव थोरे यांनी मोटार सायकलचालक आर्यन धनराज चव्हाण यांच्या विरोधात उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## वळसंगमधील श्री शंकरलिंग प्रशालेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ३० जानेवारी-**



वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग प्रशालेतील दहावीतील कन्नड, सेमी, मराठी विभागातील विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री शंकरलिंग देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री सिद्धाराम बागलकोटी होते. यावेळी सपोनि अनिल सनगल्ले, पीएसआय सागर पाटील, हवालदार अशोक पाटील, स्कूल कमिटीचे चेअरमन शिवशरण थळंगे, निवृत्त मुख्याध्यापक शिवशरण प्याटी, बसवराज शाबादे उपस्थित होते. स्वागत पर्यवेक्षक शिवानंद घोडके, कलाशिक्षक अजय माणकोजी, गंगाधर बिराजदार व प्रशालेतील विद्यार्थिनींनी स्वागतगीताने केले. प्रास्ताविक प्राचार्य वीरेश थळंगे यांनी केले.

आदर्श विद्यार्थी अनिकेत आंटद, रश्मी यागंटे यांचा सत्कार करण्यात आला. संगप्पा भैरामडगी यांच्या स्मरणार्थ डॉ. गुरुराज भैरामडगी यांच्यातर्फे चार, मल्लिकार्जुन भैरामडगी यांच्या स्मरणार्थ सिद्धाराम भैरामडगी यांच्यातर्फे तीन, वीरेश शिवशरण थळंगे यांच्यातर्फे तीन, शैला बसवराज निंबाळ यांच्यातर्फे दोन, संजयकुमार धनशेट्टी यांच्यातर्फे एक, निवृत्त मुख्याध्यापक संगमेश्वर बागलकोटी यांच्यातर्फे एक अशा १४ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०० प्रमाणे परीक्षा शुल्क मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. दहावीच्या विद्यार्थ्यांतर्फे प्रशालेस चार साऊंड सिस्टीम व एक पंखा भेट देण्यात आले. कार्यक्रमासाठी सिद्धारुढ हिरेमठ, सिध्दाराम भैरामडगी, नीलकंठ कवटगी, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, संतोष कस्तुरे, मल्लिनाथ गौडगाव, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोंदे, रूपाली कलशेट्टी, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, सेवक कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी यांनी परिश्रम घेतले. श्रीमंत भोसले तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी मानले.



## छंदोत्सवामध्ये बार्शीच्या उदयकुमार पोतदार यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जानेवारी-**

छंदोत्सव २०२५ मध्ये मोबाईल व्हाऊचर कलेक्शनबद्दल मान्यवरांच्या उपस्थितीत विनीत केंजळे (संचालक व्हिन्टेज माईल्स संग्रहालय) यांच्या हस्ते उदयकुमार पोतदारयांना ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

यावेळी बाल साहित्यकार राजीव तांबे, प्रसिद्ध समाजसेवक सायबर क्राईम नॅशनल अवॉर्ड विनर डॉ. धनंजय देशपांडे उपस्थित होते. महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून वेगवेगळे संग्रहकांच यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कलादालन कोथरुड येथे विविध छंदाचे प्रदर्शन आयोजित केले होते. उदयकुमार पोतदार यांचा मोबाईल व्हाऊचरचा आगळावेगळा छंद याचे प्रदर्शन पहिल्यांदाच पुण्यामध्ये आयोजित केले होते. या आधी मोबाईल व्हाऊचर कलेक्शनचे प्रदर्शन कुठेही झालेले नाही. आज पहिल्यांदाच हे प्रदर्शन भारतातील नाहीतर जगातले पहिले प्रदर्शन ठरलेले आहे. असंख्य पुणेकरांनी खास मोबाईल व्हाऊचर कलेक्शनचे कौतुकही केले आहे. उदयकुमार पोतदार बावीस वर्षांपासून मोबाईल व्हाऊचरचा संग्रह करत आहेत. देश-विदेशातील व्हाऊचर संग्रहात आहेत. आजपर्यंत अनेक मोबाईल कंपन्या आल्या. त्यापैकी काही कंपन्या बंद पण झाल्या. आज ठराविक मोबाईल कंपन्या आहेत. आजचा जमाना डिजीटलचा जमाना आहे. आज मोबाईल व्हाऊचरचा संग्रह करायचा म्हटलं तरी शक्य होत नाही. उदयकुमार पोतदार यांनी आवड म्हणून मोबाईल व्हाऊचरचे कलेक्शन केले.

# आ. राजू खरे यांच्यावर गुन्हा दाखल करा

### सुधाकरपंतांवर केलेल्या टिकेबद्दल निषेध; पंढरपूर पोलीस ठाण्याला दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० जानेवारी-**



मोहोळचे आ. राजू खरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी भाजप पदाधिकारी आक्रमक झालेत. तीन दिवसांपूर्वी एका सार्वजनिक कार्यक्रमात मोहोळचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आ. राजू खरे यांनी पंढरपूरचे माजी आमदार सुधाकरपंत परिचारक यांच्यावर टीका केली. या टिकेनंतर भाजप पदाधिकारी आणि परिचारक समर्थकांनी गुरुवारी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्याबाबत निवेदन दिले आहे. तात्काळ गुन्हा न दाखल झाल्यास पंढरपूर शहरामध्ये तीव्र आंदोलन करण्याचा इशारा परिचारकांचे कट्टर समर्थक तथा माजी नगराध्यक्ष लक्ष्मण पापरकर यांनी दिला आहे.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष विक्रम पापरकर, माजी नगरसेवक राजू सर्वगोड, माजी नगरसेवक नवनाथ रानगट ,सचिन शिंदे, भीमशक्ती तरुण मंडळाचे अध्यक्ष उमेश सर्वगोड , माजी नगरसेवक कृष्णा वाघमारे, शैलेश आगावणे, भाजप महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष प्राजक्ता बेणारे, दत्तात्रय घोत्रे, बालाजी बंदपट्टे, माजी नगरसेवक शैलेश बडवे, नारायण सिंघन, महादेव धोत्रे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. लक्ष्मण पापरकर म्हणाले, सुधाकरपंत परिचारक यांनी सर्व जाती धर्माच्या पदाधिकाऱ्यांना घेऊन पंढरपूरचा विकास केला. एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर त्या व्यक्तीवर टीका करणे योग्य नाही. नगरपालिका निवडणुकीसाठी ही स्टंटबाजी सुरु आहे. मात्र अशी स्टंटबाजी, टीका करण्यापेक्षा थेट नगरपालिका निवडणुकीच्या मैदानात उतरा. जनता योग्य त्या नेत्याच्या उमेदवारीला संधी देईल. मात्र अशा प्रकारे टीका आता सहन केली जाणार नाही. दोन दिवसांमध्ये आमदार राजू खरे यांच्यावर गुन्हा दाखल न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला आहे.

## भाई उद्धवराव पाटील यांचा सामाजिक वारसा जपावा : घोगरे

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३० जानेवारी-**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी विरोधी पक्ष नेते, झुंजार सेनानी भाई उद्धवराव पाटील यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान अमूल्य आहे. आजच्या पक्ष बदलू राजकारणाकडे पाहता विरोधी पक्ष नेता असताना त्यांना मुख्यमंत्रीपदाची संधी आली असतानाही जीवनभर शेतकरी कामगार पक्ष सोडला नाही. तत्वनिष्ठ राजकारण केले. भाई उद्धवराव पाटील यांचा सामाजिक वारसा जपावा, असे आवाहन शशिकलाताई घोगरे यांनी केले.

भाई उद्धवराव पाटील यांच्या जयंती व राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा शशिकलाताई घोगरे बोलत होत्या. यावेळी मंडळाचे कार्याध्यक्ष एम. डी. देशमुख, सचिव धनंजय पाटील, सदस्य निर्मलाताई भांगे, माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, ॲड. पांडुरंग लोमटे, प्राचार्य बाळासाहेब मुंडे, उपप्राचार्य व्ही. के. देशमुख, पर्यवेक्षक अमोल दीक्षित उपस्थित होते. क्रीडा, निबंध व इतर स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिस देण्यात आले. हुतात्मा दिनानिमित्त शहिदांना आदरांजली वाहण्यात आली. सूत्रसंचालन एस. डी. जाधव यांनी केले. आभार आनंद वीर यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त



सोलापूर : पालकमंत्री आणि ग्रामविकास व पंचायत राज कॅबिनेट मंत्री जयकुमार गोरे यांची माजी आमदार नरसिंग मेंगजी यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांच्यासमवेत प्रदेश कार्यकारिणी सदस्य भा.ज.पा महाराष्ट्र राज्य अमरसिंह शेंडे उपस्थित होते.



### युवक क्रीडा मंडळाच्यावतीने ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

भवानी पेठ येथील मड्डीवस्तीमधील युवक क्रीडा मंडळाच्या वतीने ज्येष्ठ दलित साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचा सत्कार करण्यात आला. रिपाइं (आठवले)चे ज्येष्ठ नेते के.डी. कांबळे यांच्या हस्ते डॉ. लिंबाळे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. लिंबाळे हे मड्डी वस्तीमध्ये काही काळ वास्तव्यास होते. त्यांनी आजपर्यंत ४४ पुस्तके लिहिली आहेत. दलित पँथर चळवळीत त्यांचे फार मोठे योगदान आहे. साहित्यिक चळवळीमध्ये वेदनांचे साहित्यिक म्हणून ते परिचित असल्याचे यावेळी के.डी. कांबळे यांनी सांगितले. सूत्रसंचालन केतन कांबळे आणि कांचन कांबळे यांनी केले. जनार्दन मोरे यांनी आभार मानले. यावेळी युवक क्रीडा मंडळाचे अध्यक्ष लखन गवळी, लखन यरवडे, सुनील कांबळे, दयानंद डावरे, राहुल बनसोडे, गौतम कांबळे, प्रतीक कांबळे आदी उपस्थित होते.

### शब्दगौरव वक्तृत्व स्पर्धेत 'वालचंद'च्या पद्मा मगरूमखानेचे यश



**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

संगमेश्वर रात्र महाविद्यालयाच्या वतीने झालेल्या शब्दगौरव वक्तृत्व स्पर्धेत वालचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता ११ वी कला शाखेतील पद्मा दत्तात्रय मगरूम खाने हिने उत्तेजनार्थ ५०० रुपयाचे रोख व प्रशस्तीपत्र पारितोषिक प्राप्त केले. तिने या स्पर्धेत ''युवक आणि भारतीय राजकारण'' या विषयावर विचार व्यक्त केले. तिला चेतन तुपकर यांनी मार्गदर्शन केले. तिचे प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे आदींनी अभिनंदन केले.

### राष्ट्रीय समाज पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी काळे



**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

राष्ट्रीय समाज पक्षाच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी उमेश राम काळे यांची निवड करण्यात आली. पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष किरण गोफणे यांनी ही निवड करण्यात आली. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर, राष्ट्रीय संघटक लोकरे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नाना शेवते, मुख्य महासचिव माली सलगर, सचिव सुनील बंडगर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड करण्यात आली.

# उजनीतील आवर्तनासाठी पालकमंत्र्यांची मंजुरी

## लाभक्षेत्र विकास प्राधिकरण बैठकीत निर्णय | पाणी काटकसरीने वापरण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला शहर व भीमा नदी तीरावरील पाणीपुरवठा योजनांसाठी उजनी धरणातून भीमा नदीत सोडण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे ५.५० टीएमसीचे दुसरे आवर्तन तर ६.५० टीएमसी चे तिसरे आवर्तन सोडण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज मंजुरी प्रदान केली.



नियोजन भवन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय आकस्मिक पाणी वापर समितीची बैठक पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आमदार सुभाष देशमुख, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण चे अधीक्षक अभियंता एस खांडेकर, कार्यकारी अभियंता धीरज साळे, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपअभियंता कैलास चौधरी आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची अडचणी येणार नाही या अनुषंगाने जलसंपदा विभागाने उजनी धरण प्रकल्पात उपलब्ध असलेल्या पाण्याचे योग्य नियोजन करावे व विविध पाणीपुरवठा योजनेला आवश्यक असलेले पिण्याच्या पाण्याचे आकस्मिक आरक्षण करून ठेवावे व ते पाणी आवर्तन नियोजित वेळेप्रमाणे भीमा व सीना निधीतून द्यावे. पाणी आवर्तन देत असताना पाण्याची बचत व्यवस्थितपणे होईल या दृष्टीने विचार करावा व त्यानुसार जलसंपदा विभागाने कार्यवाही करावी असेही त्यांनी सूचित केले. प्रारंभी लाभ क्षेत्र विकास प्राधिकरणचे खांडेकर यांनी उजनी धरणात २९ जानेवारी २०२५ रोजी उपयुक्त पाणीसाठा ४०. ५९ टीएमसी असून, अचलपाणी साठा ६३.६६ टीएमसी आहे तर एकूण पाणीसाठा १०४.२५ टीएमसी इतका असल्याचे सांगितले. तसेच सोलापूर पंढरपूर मंगळवेढा सांगोला शहर व भीमा नदी तीरावरील पाणीपुरवठा योजना साठी उजनी धरणातून भीमा नदीत सहा टीएमसी पाणी आवर्तन यापूर्वी सोडलेले असून या पाणीपुरवठा योजनेसाठी पिण्याच्या पाण्याचे दोन आकस्मिक आरक्षण देणे शक्य असून त्याची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

सोलापूर शहर व भीमा नदी काठावरील इतर पाणीपुरवठा योजनेसाठी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये उजनी धरणातून भीमा नदीमध्ये पाणी सोडणे आवश्यक होते, परंतु पालकमंत्री महोदयांची नियुक्ती न झाल्यामुळे जिल्हास्तरीय आकस्मिक पाणी आरक्षण समितीची बैठक घेता आली नाही. त्यामुळे जलसंपदा मंत्री यांची मान्यता घेऊन भीमा नदीचे पहिले आवर्तन पूर्ण केल्याची माहिती श्री. खांडेकर यांनी देऊन पुढील नियोजित वेळेनुसार आज रोजी समितीने दिलेल्या मान्यतेप्रमाणे दुसरे व तिसरे आवर्तन सोडण्यात येणार असल्याचे सांगितले.

# जिद्द-चिकाटी असल्यास यश हमखास मिळते : पिरजादे

## अंजुमन-ए-इस्लाम इंग्लिश मीडियम शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

जग नवनवीन तंत्रज्ञानासह पुढे आगेकूच करत आहे. अशावेळी नव्या तंत्रज्ञानाची माहिती प्राप्त करणे हे गरजेचे बनले आहे. याबरोबरच जिद्द आणि चिकाटी असल्यास यशाचे शिखर गाठता येते, असे प्रतिपादन पुणे येथील पर्सिस्टंट सिस्टम कंपनीचे इंजीनियरिंग लीड असिस्टंट मॅनेजर जाहिद पिरजादे यांनी केले.



प्रजासत्ताक दिनानिमित्त अंजुमन-ए-इस्लाम इंग्लिश मीडियम शाळेत संस्थेचे कोऑर्डिनेटर रियाज पिरजादे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. प्रारंभी शाळेच्या प्रांगणात पत्रकार सादिक इनामदार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी व्यापारी असोसिएशनचे इम्तियाज कमिशनर, कार्यालयीन प्रमुख इम्तियाज हंजगीकर, प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख रियाज जमादार, केंद्रप्रमुख इरफान सय्यद आणि शहबाज शेख आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूहगान, मनोरंजन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी आपले कलागुण दाखवितानाच भारत देशाची एकता, अखंडता टिकविणे आणि मोबाईल, सोशल माध्यमांचा होत असलेला भडीमार, तरुणांमधील व्यसनाचे सवयी यावर जनजागृती करून उपस्थित सर्वांची दाद मिळविली. यावेळी प्राचार्या मेराज करजगीकर, रफत शेख, तस्लिम शेख, सबा शेख, फरीदा शेख, नसरीन शेख, अल्फा शेख, सुल्ताना शेख आदी उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम कमी का?

- पालकमंत्र्यांनी दिले चौकशीचे आदेश
- आमदार अन् खासदारांनी उपस्थित केला प्रश्न

**पीक कर्जाचा विषय लोकसभेत मांडा :** शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यास नकार देणाऱ्या बँकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी धाराशिवचे खासदार ओम राजेनिंबाळकर यांनी बैठकीत केली. मात्र गुन्हे दाखल न करण्याबाबत केंद्र सरकारचे परिपत्रक असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्पष्ट केले. तरीही आपण आपल्या पातळीवर अधिकाऱ्यांना कारवाईची भीती दाखवत पीककर्ज वाटपाची शंभर टक्के उद्दिष्टपूर्ती केल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. यावर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी हा विषय खासदारांनी लोकसभेत मांडावा, असे सूचित केले.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी-**

राज्य सरकारची भूमिका शेतकरी हिताची असून, कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळालीच पाहिजे, असे सांगत इतर जिल्हयातील शेतकऱ्यांना पीकविम्याची चांगली रक्कम मिळाली. मग सोलापूर जिल्हयात ती का मिळाली नाही? याची चौकशी करून माहिती द्या, असा आदेश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांना दिला.

गुरूवारी, नियोजन भवनात पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत धाराशिवचे खासदार ओम राजेनिंबाळकर व आमदार राजू खरे आणि समाधान आवताडे यांच्या प्रश्नावर उत्तर देताना पालकमंत्री गोरे बोलत होते. बैठकीच्या सुरुवातीलाच मागील



सभेतील अनुपालन अहवाल वाचन होत असताना खासदार ओम राजेनिंबाळकर यांनी शेतकऱ्यांच्या पीक विम्याचा विषय मांडला. कंपन्या शेतकऱ्यांना पीक विमा देत नाहीत, असा मुद्दा उपस्थित केला.

दरम्यान, खासदार राजेनिंबाळकर यांच्या प्रश्नावरील या चर्चेत सहभाग घेत आमदार खरे व आवताडे यांनीही पीक विमा कंपनीच्या कारभारावर ताशेरे ओढले.

आमदार खरे म्हणाले, पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. मोहोळ तालुक्यात काही ठराविक शेतकऱ्यांनाच पीकविमा मिळाला. यात बनावटगिरी झाल्याचा आरोप करीत पीक विमा कंपनीच्या कारभाराचे वाभाडे काढले. दुसरीकडे आमदार आवताडे यांनी याप्रश्नी जिल्हा कृषी अधीक्षकांनी बैठक घेतो म्हणून सांगितले. परंतु त्यांनी घेतली का नाही माहिती नाही. बैठकीला मला तर बोलावले नाही असे सांगत कृषी विभागाच्या कारभारावरही आमदार आवताडे यांनी नाराजी व्यक्त केली.

यावर बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले, शेतकऱ्यांना भरपाई मिळाली नाही हे चालणार नाही, असे सुनावत मी या विषयात खूप गंभीर आहे, हे सरकार शेतकऱ्यांचे आहे, आपण सर्वजण नवीन आहोत. परंतु सर्वजण मिळून शेतकऱ्यांना न्याय देऊ, असा विश्वास त्यांनी दिला.

# शिवसृष्टी प्रतिष्ठानच्या शिवजयंती उत्सव अध्यक्षपदी श्रीकांत यमपुरे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

गेल्या २४ वर्षांपासून तरुण वर्गात प्रचंड लोकप्रिय असणाऱ्या टिळक चौक येथील शिवसृष्टी प्रतिष्ठान च्या शिवजयंती २०२५ वर्षातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. संस्थेचे संस्थापक श्रीयुत अमोल केकडे यांच्या अध्यक्षतेखाली हि बैठक आयोजित करण्यात आली होती.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मध्यवर्ती महामंडळाचे पद्माकर काळे, संभाजी आरमार चे श्रीकांत डांगे, डॉ. नितीन राठी, माजी नगरसेवक अमर पुदाले, शिवसृष्टी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल केकडे, संस्थेचे उपाध्यक्ष महेश बुरांडे, उद्योजक अमर कालेकर, किसन गर्जे, शिवाजी वाघमोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी शिवरायांच्या आरतीने बैठकीला सुरुवात झाली.शिवसृष्टी प्रतिष्ठान च्या कार्याचा आढावा घेत श्रीकांत डांगे यांनी उत्सव काळात शिवरायांच्या कार्याचा जागर करत शहरातील सर्वच उपक्रमात युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.

यावेळी चेतन गायकवाड, विकास बळुडंगी, योगेश पतंगे, के डी बिराजदार, अनमोल केकडे, फैयाज शेख, गणेश पुकाळे, विजय तलवार, सचिन स्वामी, हरी उपरे, रोहित राजोल, गणेश हुलसूरे यासह । कार्यकर्ते मोठ्या संख्येने बैठकीस उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रथमेश कासार यांनी केले.

**पदाधिकारी याप्रमाणे :** अध्यक्ष : श्रीकांत यमपुरे, उपाध्यक्ष : तेजस सूरवसे , कार्याध्यक्ष : महेश लोकापूरे, सचिव : राहुल भोसले, खजिनदार : आशिष धुंबड, सहखजिनदार : नागेश माळगे.

# श्री महाकाल शिवजन्मोत्सव युवक मंडळाच्या अध्यक्षपदी मोटे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

मुरारजी पेठेतील मंगळवेढेकर चाळ येथील श्री महाकाल शिवजन्मोत्सव युवक मंडळाच्या २०२५ शिवजन्मोत्सव मंडळाच्या बैठकीत उत्सव अध्यक्षपदी माणिकराव मोटे यांची एकमताने निवड करण्यात आले. यावेळी इतर पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली.




मंडळाची सर्वसाधारण बैठक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब रोडगे व गतवर्षीचे अध्यक्ष बंटी रोडगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी मार्गदर्शक दादू रोडगे, सचिन बावळे, अमोल व्यवहारे यांच्यासह सभासद व कार्यकर्ते मंडळाचे उपस्थित होते. श्री महाकाल शिवजन्मोत्सव मंडळाच्यावती १७ फेब्रुवारी रोजी लकी चौक येथे शिवमुर्तीची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच १८ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिर व १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी लकी चौक येथून मंडळाच्या मिरवणुकीस प्रारंभ होणार असून यंदाच्यावर्षीही मिरवणुकीमध्ये दरवर्षीप्रमाणे नाविन्यपूर्ण व ऐतिहासिक प्रसंगावर आधारित शिवरायांची शिकवण देणारा देखावा सादर करणार आहे.

**पदाधिकारी याप्रमाणे :**

उत्सवअध्यक्ष - माणिकराव मोटे, उपाध्यक्ष - आतिश बचुटे, विलास पवार, सचिव - रुपेश काळे, मिरवणूक प्रमुख - स्वप्निल वाघमारे, प्रसिद्धीप्रमुख - सोनू पवार




# एसव्हीसीएसच्या शिबिरात ५२९ जणाचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री वीर तपस्वी शिक्षण संकुल एमआयडीसी येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ५२९ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

प्रारंभी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमा पूजनानंतर संस्थेचे सचिव शांतया स्वामी यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे व शिवानंद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थितांचे स्वागत मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांनी केले. उपमुख्याध्यापक धनंजय नकाते यांनी आपल्या प्रास्ताविकेतून श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने संपन्न होत असलेल्या विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांची माहिती दिली. संस्थेचे सचिव स्वामी यांनी वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या धार्मिक व सामाजिक कार्याची माहिती देऊन रक्तदानाच्या पवित्र कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी प्राचार्य राम ढाले, गिरमल बुगडे, लक्ष्मी पाटील, लक्ष्मी कंदिकटला, केदारनाथ बचाटे,पर्यवेक्षक संतोषकुमार तारके व रक्तदाते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. सिद्धेश्वर ब्लड बँक व त्यांच्या सहकार्यांनी रक्त संकलन करण्याचे काम केले.

# स्थापत्य २०२५ प्रदर्शनाच्या स्टॉल बुकिंगसाठी भरभरून प्रतिसाद

## सोलापूरकरांना उत्सुकता : २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान भरणार प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी -**

असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्सतर्फे सोलापुरात २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर भरणाऱ्या स्थापत्य २०२५ या बांधकाम साहित्य व अंतर्गत सजावट विषयक प्रदर्शनाच्या स्टॉल बुकिंगला व्यवसायिकांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे यांनी दिली.

स्थापत्य २०२५ या स्थापत्य प्रदर्शनाचे प्रायोजकत्व मेटारोल इस्पात प्रा. लि. जालना यांनी घेतले आहे. या प्रदर्शनात जागा विक्रीचे

Sthapatya ESTD. 2001 2025

विविध प्रकल्प, प्रमोटर आणि बिल्डर, गृह कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था, सिमेंट कंपन्या, कन्स्ट्रक्शन केमिकल्स, स्टील, प्लंबिंग आणि सॅनेटरी वेअर, इलेक्ट्रिक मटेरियल, बांधकामास लागणारी अत्याधुनिक यंत्रे आणि उपकरणे, दरवाजे आणि खिडक्या, रूफिंग मटेरियल, टाईल्स, घरातील अंतर्गत सजावट, फर्निचर, लँडस्केपिंग असे एकूण ७० स्टॉल आहेत. या वस्तू आणि सेवा पुरवणाऱ्या विविध उत्पादक कंपन्या आणि सेवा पुरवठादार स्थापत्य प्रदर्शनाच्या

**प्रदर्शनातून होणार पर्यावरण जागृती**
स्थापत्य २०२५ चे घोषवाक्य सेव्ह एंव्हॉर्मेंट फॉर ग्रीन फ्युचर हे आहे. या विषयाची माहिती देणारा स्टॉलदेखील या प्रदर्शनात असणार आहे. स्थापत्य प्रदर्शनाच्या माध्यमातून पर्यावरण जागृतीही करण्यात येणार आहे, असे असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे यांनी सांगितले.

आयोजकांकडे स्टॉल बुकिंग करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. व मोजके स्टॉल शिल्लक आहेत. स्थापत्य २०२५ या प्रदर्शनाच्या माध्यमातून सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील नागरिकांना बांधकाम आणि अंतर्गत सजावट विषयक अमूल्य मार्गदर्शन मिळणार आहे. नव्याने घर बांधू इच्छिणाऱ्या तसेच घरात अंतर्गत सजावट करु इच्छिणाऱ्या सोलापूरकरांनी स्थापत्य २०२५ या प्रदर्शनासाठी २१, २२ आणि २३ फेब्रुवारी या तारखा राखून ठेवाव्यात. स्टॉल बुकिंगसाठी असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे (९८९०१८७०७७), सचिव इंजि. मनोहर लोमटे (९८५०५७०७९२), उपाध्यक्ष इंजि. बी. एम. जाधव (९४२२०६७१९६) किंवा खजिनदार इंजि. संतोषकुमार बायस (७०५५३०९०८०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे सचिव इंजि. मनोहर लोमटे यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## रोटरी क्लबतर्फे आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या वतीने आंतर शालेय प्रश्न मंजुषा स्पर्धेची प्राथमिक फेरी रविवार, २ फेब्रुवारी रोजी मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट येथे, तर अंतिम फेरी ९ फेब्रुवारी २०२५ रोजी आयएमएस प्रशाला हॉलमध्ये होणार असल्याची माहिती अध्यक्ष सीए सुनील माहेश्वरी यांनी दिली.

या स्पर्धेत जिल्ह्यातील इयत्ता ७वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांच्या तीन सदस्यीय संघांच्या माध्यमातून सहभाग घेऊ शकतात. या स्पर्धेत सामान्य ज्ञान, इतिहास, भूगोल, तंत्रज्ञान, पौराणिक कथा, खेळ, राजकारण, चालू घडामोडी अशा विविध विषयांवर आधारित प्रश्न विचारले जातील. विजेता, उपविजेत्या संघाना १० व ५ हजार आणि इतर दोन अंतिम फेरी संघांना प्रत्येकी २, सेमी फायनलमध्ये बाद झालेल्या चार संघांना: प्रत्येकी १ हजार तर प्राथमिक फेरीतील १० सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५००/- प्रोत्साहनपर बक्षीस सर्व सहभागी संघांना प्रमाणपत्रे दिली जातील. इच्छुकांनी धनश्री केळकर (मो. ९९२३६१५८८५) यांच्याशी ३१ जानेवारी २०२५ संपर्क साधावा, असे आवाहन सचिव ब्रिजकुमार गोयदानी यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

#### रोटरी क्लबची आजपासून तीन दिवस व्याख्यानमाला

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर व माऊली लँडमार्क यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष डॉ. अमित गायकवाड-पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदा व्याख्यामालेचे हे दुसरे पर्व आहे. शुकवार ३१ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी ७ वाजता मुंबईचे ज्येष्ठ संपादक उदय निरगुडकर हे ध्यास सर्वोत्तमाचा या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत. तर १ फेब्रुवारी २०२५ रोजी प्लास्टिक सर्जन, लातूर डॉ. विठ्ठल लहाने हे राष्ट्र उभारणीमध्ये आपले योगदान या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत. २ फेब्रुवारी २०२५ रोजी चीफ मेंटॉर, एमकेसीएल, पुण्याचे विवेक सावंत हे ए.आय. कृत्रिम बुध्दीमत्ता आणि आपण या विषयावर तिसरे पुष्प गुंफणार आहेत. या व्याख्यानमालेस सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. अमित गायकवाड-पाटील यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस माऊली झांबरे , अक्षय पाटील, विक्रम बंडेवार उपस्थित होते.

#### भारतीय जैन संघटनेतर्फे रविवारी मोफत कॅन्सर तपासणी शिबिर

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

भारतीय जैन संघटना व जैनस्को तर्फे रविवार दि. २ फेब्रुवारी रोजी कॅन्सर रोगाबद्दल जनजागृती, उपचार आणि मोफत तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती केतन शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली. जागतिक कॅन्सर दिनाचे औचित्य साधून रविवारी सायंकाळी ४ वाजता शुक्रवार पेठ येथील महावीर सांस्कृतिक भवन येथे कॅन्सर आजार व उपचार या विषयावर कॅन्सर तज्ज्ञ डॉ. शिरीष कुमठेकर , डॉ. विपुल दोशी, डॉ. सरिता कोठाडिया हे मार्गदर्शन करणार आहे. डफरीन चौक येथील दमानी रक्तपेढी येथे रेड क्रॉस सोसायटीच्या सहकार्याने महिलांसाठी कॅन्सर तपासणी शिबिर विनामूल्य आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केतन शहा यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस श्याम पाटील, संतोष बंब आदी उपस्थित होते.

#### शेतमाल वाहतुकीसाठी तात्पुरता रस्ता उपलब्ध करण्याची मागणी

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती येथील चार एकर शेतात उसाचे पीक पडून आहे. साखर कारखान्याला हा ऊस नेण्यासाठी तात्पुरता रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शेतकरी सागर मोरडे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. या शेतीमध्ये असणारा परंपरागत वहिवाटचा रस्ता अडविण्यात आला आहे. ही बाब न्याय प्रविष्ट आहे. शेतातील एकूण चार एकर ऊस गळीतासाठी तयार आहे. केवळ रस्त्याअभावी गेली तीन महिने हा ऊस साखर कारखान्याकडे नेता येत नाही. जिल्हा प्रशासनाने तत्काळ तात्पुरत्या स्वरूपात ऊस नेण्यासाठी रस्ता उपलब्ध करून न दिल्यास पाच लाखाचे नुकसान होणार आहे. तातडीने तात्पुरता रस्ता उपलब्ध करून द्यावा अन्यथा आत्मदहन करण्याशिवाय पर्याय नाही, असा इशाराही शेतकरी मंगल मोरडे आणि सागर मोरडे यांनी दिला आहे.

#### राष्ट्रव्यापी आठव्या आर्थिक गणनेसाठी समन्वय समितीची स्थापना

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

केंद्र शासनातर्फे राष्ट्रव्यापी आठवी आर्थिक गणना घेण्यात येणार आहे. सन २०२५-२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या आठवी आर्थिक गणनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व कामाच्या सनियंत्रण व समन्वयासाठी महानगर पालिका क्षेत्रातील समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे.आर्थिक गणनेद्वारे उपलब्ध होणारी माहिती राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय उत्पन्न व राज्य स्तरावरून राज्य उत्पन्न यासंदर्भातील अंदाज तसेच राष्ट्रीय व्यवसाय नोंदवही अधिक अचूकपणे तयार करण्यासाठी उपयुक्त होणार आहे. तसेच सदर माहिती जिल्हा व राज्य स्तरावर सामाजिक व आर्थिक व्यवस्थापन तसेच नियोजन यांच्यासाठी उपयोगी येणार आहे. त्या अनुषंगाने गणनेच्या कालबध्द अंमलबजावणीसाठी तसेच क्षेत्र कामाचे प्रभावी सनियंत्रण व समन्वयासाठी विविध स्तरावर शासनाकडून समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

## पीकविमा, आरोग्य विभाग, पाणी नियोजन अन् वाळू तस्करांवरील विषयांवर गाजली 'डीपीसी'

### १ हजार १९ कोटी 33 लाखाच्या विकास आराखड्यास मान्यता

### गतवर्षीचा निधी मार्चअखेर निकाली काढा : पालकमंत्री

### जिल्ह्यातील आठ तीर्थक्षेत्रांना 'क' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा समितीने दिला

### २०० कोटी वाढीव निधीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

शेतकऱ्यांचा पिकविमा, पीककर्ज, सवलती वेळेत न मिळणे, आरोग्य विभागाचा ढिसाळ कारभार, शहरातील पाणी नियोजन लावणे अन् सर्वात महत्वाचे वाळू तस्करीचा विषय आजच्या डीपीसी बैठकीत चांगलाच गाजला. याच बरोबर क्रिडा अधिकाऱ्यांचीही एका प्रश्नावरून नवीन पालकमंत्र्यांनी चांगलीच झडती घेतली. दरम्यान, याच बैठकीत जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत सर्वसाधारण योजना ८३ टक्के, अनुसूचित जाती उपयोजना ५१ टक्के व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना २७% असा एकूण ७८ टक्के निधी २० जानेवारीपर्यंत खर्च झालेला आहे. तरी उर्वरित मंजूर निधी माहे मार्च २०२५ अखेर पर्यंत खर्च करण्याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखाची असून त्यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. तर नवीन आर्थिक वर्षासाठी १ हजार १९ कोटी ३३ लाखाच्या विकास आराखड्यास नियोजन समितीने आज (दि. ३०) मान्यता दिली.

नियोजन भवन येथील सभागृहात जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल उगले तेली, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, खासदार धैर्यशील मोहिते पाटील (ऑनलाईन द्वारे), खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, दिलीप सोपल, राजू खरे, अभिजीत पाटील, उत्तम जानकर, डॉ.बाबासाहेब देशमुख, नारायण पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांच्यासह सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे पुढे म्हणाले की, सन २०२४ -२५ चा १००% निधी खर्च करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी अधिक गतीने काम करावे. ज्या यंत्रणांनी अद्याप प्रशासकीय मागणीसाठी आवश्यक कार्यवाही केली नाही त्यांनी ती तातडीने पूर्ण करावी. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सर्वांच्या सहकार्यातून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करूयात, यामध्ये सर्व समिती सदस्यांची भूमिका ही महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण ८६१.८९ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १५२ कोटी तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ५.४४ कोटी अशा एकूण १ हजार १९ कोटी ३३ लाखाच्या प्रारूप आराखड्यास राज्य समिती समोर सादर करण्यासाठी समितीने मान्यता दिल्याचे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले. शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण करीता ६६१.८९ कोटीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच शिक्षण, आरोग्य, रस्ते विकास, नगरविकास, जनसुविधा यासारख्या महत्वाच्या बाबींकरीता २०० कोटींची अतिरिक्त मागणीचा पुरक आराखडा सादर केल्याची माहिती त्यांनी दिली.

हे शासन शेतकऱ्याचे असून, शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम न मिळणे हे खूप गंभीर बाब आहे या बाबीची चौकशी करून सविस्तर अहवाल प्रशासनाने सादर करावा. शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचेही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले. तसेच बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी दिरंगाई न करता वेळेत कर्जपुरवठा करावा. आरोग्य विभागात नियोजन समितीच्या मान्यतेशिवाय कामे झाली असतील तर त्याची चौकशी करून अहवाल सादर करावा असेही त्यांनी सुचित केले. त्याप्रमाणेच आजच्या बैठकीत समितीच्या वतीने आठ क वर्ग तीर्थक्षेत्रांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. महसूल प्रशासन पोलीस प्रशासन त्यांनी वाळू तस्करावर कडक कारवाई करावी असेही निर्देश त्यांनी दिले. यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधी यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नियोजन समितीतून निधी मिळणे, जुनी कामे वेळेत मार्गे लावणे, शेतकऱ्यांना पीक विमा मिळणे, पीक कर्जाचा पुरवठा बँकांनी करणे, पाणीपुरवठा योजनेच्या बिलापोटी निधी मिळणे, पंधरावा वित्त आयोगाच्या निधी वाटप, कृषी यांत्रिकीकरण, ठिबक अनुदान, नियमित कर्ज पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर अनुदान मिळणे, रोहित्र दुरुस्तीसाठी निधी मिळणे, तीर्थक्षेत्रांना मान्यता देणे, नवबौद्ध घटकाच्या योजनांसाठी निधी उपलब्ध करणे, दुहेरी पाईपलाईनच्या अनुषंगाने त्वरित कारवाई करणे, क्रीडा विभाग व आरोग्य विभागात समितीच्या निधीतून प्रस्तावित केलेल्या कामांची चौकशी करणे आदी मागण्या करून या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करणे बाबत पालकमंत्री गोरे यांनी लक्ष घालण्याचे मागणी केली. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ व सन २०२५ २६ बाबत बैठकीत माहिती दिली. तर जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी समिती समोरील विषयाचे वाचन केले.

**२०जानेवारी २०२५ अखेरच्या खर्चाचा योजनानिहाय तपशील :** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण ) करीता - अर्थ संकल्पीय तरतूद- ७०२ कोटी, प्रशासकीय मान्यता रक्कम- ६२०.९० कोटी, प्राप्त एकूण निधी - २८०.८० कोटी, एकूण वितरीत निधी - २५९.१५ कोटी, एकूण खर्च - २३३.४५ कोटी, खर्च टक्केवारी प्राप्त तरतुदींशी - ८३ टक्के. अनुसूचित जाती उपयोजना करीता - अर्थ संकल्पीय तरतूद- १५२ कोटी, प्रशासकीय मान्यता रक्कम- ११९.२६ कोटी, प्राप्त एकूण निधी - ५२.१६ कोटी, एकूण वितरीत निधी -४८.२८ कोटी, एकूण खर्च - २६.५० कोटी, खर्च टक्केवारी प्राप्त तरतुदींशी - ५१ टक्के. आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना करीता - अर्थ संकल्पीय तरतूद- ४.२८ कोटी, प्रशासकीय मान्यता रक्कम- १.८९ कोटी, प्राप्त एकूण निधी -१.७१ कोटी, एकूण वितरीत निधी -0.९७ कोटी, एकूण खर्च - 0.४६ कोटी, खर्च टक्केवारी प्राप्त तरतुदींशी - २७ टक्के जिल्हा वार्षिक योजना- सन २०२५-२६:-

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण ) :**

राज्य शासनाने घातलेली आर्थिक मर्यादा - ६६१.८९ कोटी, यंत्रणांची मागणी - १६१०.९० कोटी, मर्यादेत तयार करण्यात आलेला प्रारुप आराखडा किंमत - ६६१.८९ कोटी, प्रस्तावित अतिरिक्त मागणी - २०० कोटी, एकूण आराखडा - ८६१.८९ कोटी. अनुसूचित जाती उपयोजना करीता - राज्य शासनाने घातलेली आर्थिक मर्यादा - १५२ कोटी, यंत्रणांची मागणी - १७२.८० कोटी, मर्यादेत तयार करण्यात आलेला प्रारुप आराखडा किंमत - १५२ कोटी, प्रस्तावित अतिरिक्त मागणी - 0.00 कोटी, एकूण आराखडा - १५२ कोटी. आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना करीता - राज्य शासनाने घातलेली आर्थिक मर्यादा - ५.४४ कोटी, यंत्रणांची मागणी - ५.४४ कोटी, मर्यादेत तयार करण्यात आलेला प्रारुप आराखडा किंमत - ५.४४ कोटी, प्रस्तावित अतिरिक्त मागणी - 0.00 कोटी, एकूण आराखडा - ५.४४ कोटी.




#### जिल्ह्यातील आठ तीर्थक्षेत्रांना समितीची मान्यता

श्री. क्षेत्र जकराया देवस्थान, मौजे-तेलगाव (सिना), ता. उ. सोलापूर, श्री. क्षेत्र कानिफनाथ देवस्थान, मौजे-गाताची वाडी, ता. बार्शी, श्री. क्षेत्र म्हस्कोबा देवस्थान, मौजे- लक्ष्मी दहीवडी, ता. मंगळवेढा, श्री. क्षेत्र महालिंगराया देवस्थान, मौजे-मरवडे, ता. मंगळवेढा, श्री. क्षेत्र गुरुगंगालिंग महाराज मंदिर देवस्थान, मौजे हिळळी ता. अक्कलकोट, श्री. क्षेत्र विठ्ठल रुक्मिणी व मारुती मंदिर देवस्थान, मौजे जाधववाडी, ता. पंढरपूर, श्री. क्षेत्र शिव शिवाई देवस्थान, मौजे कोरफळे, ता. बार्शी, श्री. क्षेत्र बिरोबा देवस्थान, मौजे तपकिरी शेटफळ, ता. पंढरपूर

#### जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ प्रारुप आराखड्याची ठळक वैशिष्टे

कृषी व संलग्न सेवा (पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, वने, सहकार) - रुपये ५०.२६ कोटी, ग्रामीण क्षेत्राच्या विकासाच्या योजना - रुपये ६० कोटी, जलसंधारण विभागाच्या योजना - रुपये ५५ कोटी, ऊर्जा विकास- रुपये ६० कोटी, शिक्षण विभागाच्या योजना - रुपये ३९ कोटी, महिला ब बाल विकासाच्या योजना - रुपये १९.८५ कोटी, आरोग्य सेवांचे बळकटीकरण - रुपये ६३.१५ कोटी, नगर विकासाच्या योजना- रुपये १०६ कोटी, रस्ते व परिवहन - रुपये ६८.२० कोटी, पर्यटन, तिर्थक्षेत्र,गड किल्ले, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास - रुपये . ४६.२० कोटी, पोलिस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण रुपये - २१.८५ कोटी.

#### आमदार कोठेंची शहर पाणी नियोजनावर आक्रमक भूमिका

सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूर शहरातील अतिशय महत्त्वाचा आणि नागरिकांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा असलेल्या पाणी पुरवठ्याचा विषय जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित केला. समांतर जलवाहिनीला अजून किती दिवस लागतील, ही जलवाहिनी झाली तरी आठ दिवसाआड पाणी का? शहराच्या पाणी प्रश्नी महत्त्वाचे अनेक मुद्दे मांडले. या प्रश्नी पालकमंत्री यांनी दखल घेवून मनपा आयुक्तांकडून माहिती घेतली आणि ही योजना गतीने मार्गी लावण्याची सुचना केली.

#### मी चुकून तुतारी हाती घेतली : आ.खरे

मोहोळचे आमदार राजू खरे यांनी मोहोळ विधानसभा मतदारसंघात चालत असलेली वाळू, मुरूम आणि माती चोरीवरून प्रचंड नाराजी आणि संताप व्यक्त केला. यावेळी पालकमंत्र्यांशी बोलताना त्यांनी मी चुकून तुतारी हाती घेतली अजूनही बाळासाहेबांचा सच्चा शिवसैनिक असल्याचे सांगत सभागृहाला आश्चर्यचकित केले. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये बोलतांना आमदार खरे म्हणाले, आपण दुष्काळी भागाचे पालकमंत्री झालात, पण आमच्या मतदारसंघात मुरूम, माती आणि वाळू उपसा होतो इथे सरंजामशही पद्धत आहे, शासनाचा महसूल बुडतो, मी तुमच्या सोबत अनेक वर्ष काम केले आहे, चुकून मला तुतारी घ्यावी लागली, मी बाळासाहेबांचा सैनिक आहे. ५० हायवा टीपर फिरतात, बीड पेक्षा वाईट परिस्थिती मोहोळमध्ये आहे. महिला अधिकाऱ्यांवर गाडी घालावी लागली, यावर कारवाई करा अशी मागणी त्यांनी केली. यावेळी त्यांच्या राजकीय भूमिकेबाबत सर्वच आश्चर्यचकित झाले. दरम्यान बैठकी नंतर त्यांनी सविस्तर माहिती दिली. पालकमंत्री गोरे यांनी, वाळू कारवाई दिसेल, त्यात कुणी अधिकारी कर्मचारी सहभागी असला तर त्याला सोलापुरात काम करण्याचा अधिकार नाही अशीही तंबी दिली.

## शहरात रुजतेय फुटपाथ मार्केटची नवी संकल्पना







#### सोयी सुविधांचा बोजवारा

सोलापूर शहरातील मंडईतून ओट्यावर विक्री करणाऱ्या विक्रेत्यांकडून शुल्क घेतले जाते. मात्र स्वच्छतेसह सोयी सुविधांकडे दुर्लक्ष होत आहे. सोयी सुविधांचा बोजवारा उडाला असल्याचे चित्र पाहायला मिळते. यामुळे पावती करण्यास गेलेल्या कर्मचाऱ्याला विक्रेत्यांकडून बोलणे खावावे लागते. कस्तुरबा मंडई सह काही मंडईमध्ये अस्वच्छता तसेच स्वच्छतागृहासह इतर सोयी सुविधांची अडचण असल्याचे सांगण्यात येते. शुल्क आकारण्यास आघाडीवर असलेल्या प्रशासनाने सोयी सुविधांकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

### महापालिकेच्या काही मंडई असून अडचण नसून खोळंबा

### वापरात नसलेल्या मंडईंकडे पालिकेने लक्ष देण्याची गरज

**तभा वृत्तसेवा | किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी**

शहरात काही मंडई असून अडचण नसून खोळंबा अशी स्थिती झाली आहे. आता वापरात नसलेल्या महापालिकेच्या इतर मंडईकडे महापालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज वर्तवली जात आहे. दरम्यान, शहरात फुटपाथ मार्केटची अनाधिकृत नवी संकल्पना रुजत आहे. यामुळे वाहतुकीसही मोठा अडथळा निर्माण होत आहे.

शहरात महापालिकेच्या मालकीची सुमारे १३ भाजी मंडई आहेत. यामध्ये मंगळवार व बुधवार ) असे दोन आठवडी बाजार आहेत. त्यापैकी ७० फूट रोड परिसरातील चिप्पा मार्केट येथे मागील वर्षी खुनाची घटना घडली होती. या चिप्पा मार्केटमध्ये गेल्या अनेक वर्षापासून भाजीविक्रेते येथील ओट्यावर बसत नाहीत. ७० फूट रोड येथेच रस्त्यावरच भाजी विक्री केली जाते. महापालिका प्रशासन व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमानेही यापूर्वी अनेक वेळा रस्त्यावर विक्रेत्यांना चिप्पा मार्केटमध्ये भाजी विक्री करण्यासंदर्भात प्रयत्न करण्यात आला मात्र अनेक वेळा कारवाई करूनही चिप्पा मार्केटमध्ये भाजी विक्री करण्यास येथील विक्रेत्यांनी प्रतिसाद दिला नाही. अनेक वेळा महापालिकेने ओटे लिलावही केला मात्र त्यास प्रतिसाद मिळाला नाही. परिणामी चिप्पा मार्केट वापराविना ओसाड आहे. त्याचबरोबर स्टेशन रोडवरील सुपर मार्केटचीही अशीच अवस्था आहे. त्या ठिकाणी गैरवापर होत असल्याचे बोलले जात आहे. महापालिकेच्या चिप्पा, चैतन्य, सुपर मार्केट ,शास्त्रीनगर येथील मंडई वापराविना आहेत. यामुळे महापालिकेला आर्थिक फटका बसतो. आता सोलापूर महापालिका प्रशासनाच्या मंडई विभागाने वापरात नसलेल्या अशा मंडईकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्यासाठी विविध उपाय योजना महापालिकेने हाती घेण्याची आवश्यकता आहे.

#### शहरातील फुटपाथ विक्रेत्यांनी गजबजले

एकीकडे महापालिकेच्या विविध मंडई ओसाड पडल्या आहेत तर दुसरीकडे शहरातील फुटपाथवर मात्र विक्रेत्यांची गजबज वाढली आहे. अतिक्रमण करून वाहतुकीस अडथळा करत फुटपाथवर विक्री केली जाते. यामुळे फुटपाथ मार्केटची नवी संकल्पना शहरात रुजत आहे. अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडून रोज कारवाई केली जाते मात्र तासभरात तिथे जैसे थे परिस्थिती निर्माण होते. ७० फूट रोड, विजापूर रोड, स्टेशन रोड, अवंती नगर ५४ मीटर रस्ता यासह इतर रस्त्यांवर विक्रेत्यांची संख्या वाढली आहे. हे नियंत्रणात आणण्यासाठी वाहतूक पोलिसांची मदत घेण्याची गरज आहे.

#### शहरात महापालिकेच्या वापरात नसलेल्या ४ मंडई

सोलापूर शहरात महापालिकेच्या १३ पैकी ४ मंडई या भाजी विक्रेत्यांचा प्रतिसाद नसल्यामुळे वापरात नाहीत. यामध्ये ७० फूट रोड परिसरातील चिप्पा मार्केट, विडी घरकुल येथील मार्केट , विजापूर रोड येथील चैतन्य मंडई, स्टेशन रोडवरील सुपर मार्केट आदी ४ मंडईचा यात समावेश आहे. या चारही मंडळींमध्ये ओटे लिलावासाठी प्रतिसाद मिळाला नाही. वापर आणि वर्दळ नसल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गैरवापर होतो.

#### वापर नसलेल्या मंडईत या उपायोजना

महापालिकेच्या वापरात नसलेल्या या ४ मंडईमध्ये अनेक वेळा लिलाव केला मात्र प्रतिसाद मिळाला नाही. गैरवापरामुळे डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे अशा वापर नसलेल्या मंडईमध्ये महापालिका प्रशासनाने विविध वस्तू विक्री प्रदर्शन (महासेल), विविध वस्तू लिलाव केंद्र यासाठी भाड्याने या मंडई देता येतील. यामुळे महापालिकेला उत्पन्नही मिळेल तसेच दक्षता म्हणून वापरत नसलेल्या मंडई परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षा रक्षक यांची नजर ठेवणे गरजेचे आहे. इतरही उपाययोजना महापालिका प्रशासनाने करण्याची आवश्यकता आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१५

**कर्वतिली देहें कापियेलें मांसा ।**
**गेले वनवासा शुकादिक ।।**

संसारात अडकलेल्या जीवाला ईर्षा, मोह, माया, अहंकार, काम, क्रोध, मत्सर आदि सर्व आपले वाटतात. या सर्वांची त्याच्याकडून सहज जोपासना होते. हे सर्व सत्य असतांनाही प्रत्येक जीवाला सुखही प्राप्त व्हावे असे वाटत असते. ज्या ठिकाणी, ईर्षा, मत्सर, अहंकारासारखे शत्रु अस्तित्वात असतात, त्या ठिकाणी निस्वार्थ प्रेम, आपुलकी, मानवता आदिला स्थान नसते. ईर्षा,द्वेष, मीपणा आदी जोपासायचे आणि देवदेव करायचे, म्हणजे आपोआप आनंद मिळतो अशी खुळचट भावना अनेकजण जोपासतात. ईर्षा, मोह, मत्सर, आदिमध्ये अडकलेल्या जीवाला माणूस कळत नाही, तेव्हा देव कळण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तरीपण हा जीव ईश्वराच्या प्राप्तीसाठी स्वत:च्या जीवाची, देहाची, हालअपेष्टा करण्यास तयार होतो. तनामनाला प्रचंड क्लेश देणारे लोक आहेत. कर्वतीने देहाचे तुकडे करणे किंवा मांस कापून ईश्वराला अर्पण करणे, वनवास पत्करणे आदी बाबी लोक सहज करून जातात. ईश्वर प्राप्तीसाठी शुकादिकानी संसार त्यागून वनवास पत्करला. तरीपण त्यांना खऱ्या भगवंताची प्रचिती आली नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**कर्वतिली देहे कापियेले मांसा।**
**गेले वनवासा शुकादिक।।**

समाजात असे अनेक लोक पाहायला मिळतात की जे ईश्वराच्या प्राप्तीसाठी स्वत:च्या शरीराला अतोनात कष्ट देतात. पायात वाहान न घालता खूप यात्रा करणे, भरपूर लोटांगण घालणे, जीव कासावीस होईपर्यंत उपवास धरणे, ऊन, पाऊस, वारा आदिचा विचार न करता अवघड असे व्रत करणे, वगैरे वगैरे. पण हे सर्व करूनही ईश्वराची प्रचिती येईलच असे नाही. कारण भगवंताला या बाबीपेक्षा आपल्या कर्तव्याशी देणे-घेणे आहे. तुम्ही-आम्ही चालती बोलती माणसं हीच भगवंत आहोत. या भगवंतांना लाथाडून निर्जिव दगडा-धोंड्यासाठी कांहीही व कितीही केले तर भगवंत प्राप्त होईलच कसा? पंढरीच्या वाऱ्या करायच्या, उपवास तापास करायचे आणि घरात आई-वडीलांशी, बंधू-भगिनीशी नीट वागायचे नाही, तरीपण ईश्वर प्राप्तीची अपेक्षा करायची, हे कोणत्याही नियमात बसणारे नाही. पुंडलिकाची आईवडीलांवरील भक्ती पाहून खुष झालेला पांडूरंग त्याची भेट घेण्यासाठी अठ्ठाविस युगापासून उभा आहे. याचाच अर्थ असा आहे की, केवळ उपवास-तापास करणाऱ्याला भेटण्यासाठी तो उभा नाही. आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्यांसाठी तर तो निश्चितच उभा नाही. यावरून आपण असे स्पष्ट म्हणू शकतो की, त्या पांडुरंगाला त्याच्यासाठी कष्ट करणारे आवडत नाहीत. त्यासाठी भक्तांनी कष्ट करावेत ही त्याची अपेक्षाही नसते. तर वाट्याला आलेले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणारे आवडतात. म्हणून अकारण शरीराला यातना, कष्ट देण्यापेक्षा कर्तव्यावर भर देणेच योग्य आहे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ३१ जानेवारी २०२५ | धर्मनाथ बीज |
| विक्रम संवत् २०८०-८१ | अवतार मेहेरबाबा अमरतिथी |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वितीया - (१३.५९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशिर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - शततारक (२८.१४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वरियन (१५.३२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२४.४८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या :** लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल.

# मराठीतील बोली भाषा टिकणे ही काळाची गरज : डॉ. शिवाजी शिंदे

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिन संपन्न



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३० जानेवारी -**

मराठी भाषेत विविध ५२ बोली भाषा आहेत. याचा लहेजा, ढब, शैली, बाज वेगवेगळा आहे. या बोलींमुळे मराठी साहित्यात रांगडेपणा, गोडवा व ठसकेबाज निर्माण केलेला असल्याने मराठीतील बोली भाषा टीकायला हव्यात असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मराठी संस्कृतीक मंडळ, जिल्हाधिकारी कार्यालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर यांच्या- वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून '' अभिजात मराठी भाषा : दिशा आणि जबाबदारी '' या विषयावर डॉ. शिंदे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार होत्या.

याचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी कुंभार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मराठी भाषा सदस्य सचिव, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अंजली मरोड, तहसिलदार श्रीकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या व्याख्यानानंतर शहरातील मान्यवर कवींचे कवी संमेलन झाले यात डॉ.नसीमा पठाण, गोविंद काळे, गिरीश दुनाखे, कालिदास चवडेकर, रेणुका बुधाराम, डॉ.माधुरी भोसले, राम चंद्र धर्मसाले, आणि अंजली मरोड यांनी सहभाग घेतला होता त्यांनी मराठी संवर्धन पंधरवड्या निमित्त आपल्या रचना सादर केल्या.

प्रास्ताविक मसापचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी केले, सूत्रसंचालन रामचंद्र धर्मसाले यांनी केले तर मसाप जुळे सोलापूरचे उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी यांनी आभार मानले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती मो.
९९६००५३५२१

### अलक:- (३७) प्रार्थना (२)

आशय :- (२) आपण सर्व हिंदू, परमेश्वराचे अस्तित्व मानतो. तोच चराचर सृष्टीचे संचालन करतो. तो सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान परमेश्वर आहे. ज्ञानेश्वर माऊलींनी आता विश्वात्मके देवे असे म्हणून परमेश्वराला साद घातली. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी सर्व देशभक्तांना ही श्रीं ची इच्छा आहे, असे म्हणून साद घातली. रा.स्व. संघानी आम्ही हिंदू राष्ट्राचे अंगभूत नागरिक या नात्यांनी, राष्ट्र सर्वप्रथम या नात्यानी भारत मातेलाच परमेश्वर म्हणून साद घातली. तिला शक्ती, बुद्धी, शुद्ध चारित्र्य यासाठी शुभाशीर्वाद मागितले. व असे शुभाशीर्वाद देणाऱ्या परमेश्वर स्वरूप भारत मातेची पूजा कशी करायची हे ज्याचे त्याने ठरवावे. सबका साथ- सबका विश्वास- सबका विकास- सबका प्रयास या सोबत सबका कर्तव्य पण आवश्यक आहे. ड्शर्लीश्री मनोवृत्तीचे लोक म्हणतात- विविध धर्मीयांचा आपला देश आहे-ते हिंदू राष्ट्र नाही. परंतु हिंदू ही या देशाची म्हणजे हिंदुस्थानची ओळख आहे. भारताची ओळख इथली राज्यव्यवस्था राज्यप्रणाली किंवा राज्यशक्ती नाही तर भारताची ओळख तिची सांस्कृतिक विरासत आहे. भारत निर्माणात ऋषी-मुनी, संत-महंत, आचार्य धर्माचार्य, दार्शनीक, ज्ञानी- विज्ञानी, शिक्षक, सेवाव्रती यांचा हात आहे व ही पवित्र अनुभूती सर्वांनाच होत असते. आज विश्वाच्या नेतृत्वासाठी, श्रेष्ठ मॅनेजमेंट साठी आय आय एम, हॉवर्ड, स्टॅनफोर्ड, सारख्या जगप्रसिद्ध हजारो संस्था आहेत. पण तिथे त्याग; तपस्या; निष्ठा आणि प्रतिबद्धता शिकवत नाही. हे गूण संघाच्या शाखेत शिकवतात. व भारत मातेला सुजलाम सुफलाम करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.

।। भारत माता की जय ।।

**- क्रमशः**

# ई.डब्लू.एस व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची भरती टांगणीला

## पवित्र पोर्टलच्या दुसऱ्या टप्पात तरी होणार का भरती?

## कन्नड माध्यमांच्या शाळेत रिक्तपदे असतानाही शिक्षकांना मिळेना नेमणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी-**

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या शिक्षक भरतीच्या दुसऱ्या टप्प्याची भावी शिक्षकांना प्रतीक्षा लागली आहे. पहिल्या टप्प्यात आतापर्यंत २१ हजार ६७८ शिक्षकांची भरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबरोबरच खासगी अनुदानित शाळांमध्ये रिक्तपदे असलेल्या शिक्षकांच्या जागा भरण्याची प्रक्रिया दोन वर्षांपासून सुरू आहे.

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात २१ हजार ६७८ जागांची भरती प्रक्रिया राबविण्यात आली. दुसऱ्या टप्प्यात शिक्षक भरतीला सुरुवात झाली असून, राज्यातील सर्व माध्यमिक उच्च माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागांमध्ये जवळपास १० ते १२ हजार रिक्तपदासाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार असून त्यामध्ये सोलापूर जिल्ह्याचाही समावेश आहे.

दरम्यान, पहिल्या टप्प्यातील शिक्षक भरती प्रक्रियामध्ये जिल्ह्यातील कन्नड माध्यम प्राथमिक शिक्षकांचे रिक्त जागेची जाहिरात २४/०२/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या जाहिरातीमध्ये कन्नड माध्यमाचे ई.डब्ल्यू.एस आणि खुल्या प्रवर्गातील रिक्त जागा या शून्य होत्या. परंतु १५/०१/२०२४ रोजीच्या मागासवर्गीय कक्ष पुणे यांच्या अहवालाप्रमाणे रिक्त जागा भरल्या नाहीत. मागासवर्ग कक्ष पुणे यांच्या बिंदू नामावली तपासणी अहवालाप्रमाणे ई.डब्ल्यू.एस आणि खुल्या प्रवर्गाला पहिल्या टप्प्यातील शिक्षक भरतीमध्ये रिक्तपदे दाखवली गेले नाहीत. त्यामुळे पवित्र पोर्टलच्या भारतीय प्रक्रियेतील पहिल्या टप्प्यात या उमेदवारांवर अन्याय झालेला आहे. आत्ता तरी दुसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरती प्रक्रियामध्ये मागासवर्गीय कक्ष पुणे यांच्या बिंदूनामावली प्रमाणे ईडब्लूएस व खुल्या जागा भरती जाहिरातमध्ये दाखवून त्यांना न्याय मिळवून द्यावी, अशी मागणी भावी शिक्षकांमधून होत आहे.

राज्यातील दुसरा टप्पा शिक्षक भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. सोलापूर जिल्हा परिषदेला जवळपास १००च्या आसपास जागा येण्याची शक्यता आहे. पहिल्या टप्प्यात आतापर्यंत जिल्ह्यातील पदभरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मुलाखतींसह सर्व खाजगी आस्थापनातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संस्थामध्ये रिक्तपद भरती करण्यात आलेली आहे. सोलापूर जिल्ह्यात जवळपास २६० रिक्तपदे मुलाखतसह भरण्यात आलेली आहेत.

### अन्यथा आम्हाला उपोषण करावे लागेल

पवित्र पोर्टलमध्ये आम्ही चांगले मार्क घेऊन, सुद्धा सोलापूर जिल्ह्यात कन्नड शाळा असताना देखील, त्या शाळेमध्ये ईडब्ल्यूएस आणि खुल्या प्रवर्ग जागा असून सुद्धा आम्हाला अद्याप नोकरी मिळाली नाही. ७० टक्के पदभरतीमध्ये रिक्तपदे भरल्या नसल्यामुळे अनेक पात्रताधारकांना नोकरी पासून वंचित राहावे लागत आहे. परंतु आता दुसऱ्या टप्प्यातील १० टक्के पद भरतीमध्ये ह्या जागा जाहिरातमध्ये सामाविष्ट करून आम्हाला रोजगार उपलब्ध करून द्यावी अन्यथा आम्हाला उपोषणाला सामोरे जावे लागेल. **- प्रशांत हत्तरकी, पात्रताधारक कन्नड उमेदवार**

### सोलापूर ज़िल्हा परिषद पहिला टप्पा व रूपांतरित जागा जाहिरात

एकूण ४०३ (७० %) : १ ली ते ५ वी इंग्रजी माध्यम ९१, १ ली ते ५ वी मराठी माध्यम १५६, ६ वी ते ८ वी गणित व विज्ञान ७५, ६ वी ते ८ वी भाषा २७, ६ वी ८ वी मराठी भाषा २७, ६ वी ते ८ वी हिंदी भाषा २७.

### आरक्षणानुसार ईडब्लूएस आणि खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना न्याय द्या

आम्ही संघटनेच्या वतीने मुख्ख कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.७० टक्के पद भरती प्रक्रिया पूर्ण झाली मात्र आरक्षण नुसार ईडब्लूएस व खुल्या जागा भरले नाहीत. आता तरी कन्नड माध्यमाचे जागा उपलब्ध आहे. पात्रताधारक उमेदवार असताना देखील त्यांना न्याय मिळाला नाही. मात्र दुसऱ्या टप्प्यातील १० टक्के शिक्षक भरतीमध्ये त्यां जागा उपलब्ध करून देण्यात यावी. त्यामुळे भावी कन्नड शिक्षकांना न्याय मिळेल. आरक्षणानुसार ईडब्लूएस आणि खुल्या प्रवर्गातील रिक्तपदांसह सुधारित बिंदूनामावलीनुसार जाहिरातीमध्ये सामाविष्ट करूनचं प्रसिद्ध करण्यात यावी अशी आमची प्रमुख मागणी आहे. **- प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष**

### माहिती घेऊन पुढील कार्यवाही करू



पवित्र पोर्टल शिक्षक भरती संदर्भात संबंधित विभागाकडून माहिती मागविण्यात आली आहे. बिंदू नामावली त्याचप्रमाणे ओबीसी, ई. डब्ल्यू. एस, व खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांची माहिती मागवली आहे त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

**- कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर.**

### तत्कालीन अधिकाऱ्यांची गरजेनुसार पदभरती



याप्रश्नी तत्कालीन प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी गरजेनुसार पदभरती केली असावी. रिक्तपदांची माहिती देणे विभागाचे काम आहे. परंतु त्यावर नेमणूक किंवा नियुक्ती करण्याचे काम शासनस्तरावर आहे.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सोलापूर.**

# विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक

### सहाय्यक पोलीस आयुक्त खिरडकर; सेवासदन प्रशालेत रस्ता सुरक्षा अभियान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

वाहतूक नियमांच्या जाणीव व जागृतीचे काम हे केवळ वाहतूक पोलिसांचे नसून ते प्रत्येक विभागाचे आणि व्यक्तीचे आहे. त्यामुळे विद्यार्थिनींना वाहतुकीच्या नियमांचे धडे शाळांमधून मिळावेत, असे आवाहन शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिरडकर यांनी केले.

येथील सेवासदन प्रशालेत रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत आयोजित कार्यक्रमात सहाय्यक पोलीस आयुक्त खिरडकर बोलत होते. याप्रसंगी सेवाशधन संस्थेच्या सचिव विणा पत्की, संस्थेचे संचालक पद्माकर कुलकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री रणपिसे, वाहतूक शाखेचे पोलीस सब इन्स्पेक्टर प्रवीण पारडे, वाहतूक पोलीस हवालदार ए.सी.पोळ यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. संचालक पद्माकर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले तर शाळेतील आर.एस.पी.चे शिक्षक रेवणसिद्ध कट्टे यांनी सूत्रसंचालन करून सर्वांचे आभार मानले.

# कोल्हापूर महापालिकेप्रमाणे सोलापुरातील २४९ रोजंदारी कामगारांना कायम करावे

### मंत्री दत्तात्रय भरणे यांचे उपमुख्यमंत्री शिंदे यांना पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी-**

कोल्हापूर महापालिकेप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेच्या २४९ रोजंदारी बदली कामगारांना कायम करण्यासंदर्भात क्रीडा व अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे विनंती केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्याकडून संदर्भात पाठपुरावा सुरू आहे.



कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये विविध पदांवर रोजंदारी तत्वावर कार्यरत कमंचाऱ्यांना त्यांच्या संस्थेएवढी अधिसंख्य पदे निर्माण करुन त्यांच्या सेवा महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नियमित करण्याचा नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.कोमपा- २०२४/ प्र.क्र.५१/ नवि-१९, दि.११ ऑक्टोबर २०२४ अन्वये घेण्यात आला आहे. या शासन निर्णयाप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेमधील सन १९९५ नंतर सेवेत कार्यरत असलेल्या २४९ रोजंदारी व बदली कामगारांना सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नियमित करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी केली आहे. चंदनशीवे यांनी केलेल्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा, असे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

# इंडियन केमिकल सोसायटीकडून बालाजी अमाईन्सला 'रसायन उद्योग श्री' पुरस्कार




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी-**

इंडियन केमिकल सोसायटी ही भारतातील सर्वात जुनी स्वातंत्र्यपूर्व काळातील सन १९२४ मध्ये स्थापना केलेली संस्था असून, ती संशोधन, शिक्षण आणि औद्योगिक अनुप्रयोगांसह रासायनिक विज्ञानांच्या प्रगतीला प्रोत्साहन देते. नुकतेच संस्थेने आपले १०० वे स्थापना वर्ष साजरे केले असून, भारतातील रसायन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या उद्योगांना विविध पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये बालाजी अमाईन्स या कंपनीला 'रसायन उद्योग श्री' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

दि. २८/०१/२०२५ रोजी नेहरु सेंटर, वरळी, मुंबई येथे पार पडलेल्या कार्यक्रमात प्रा. जी. डी. यादव यांच्या हस्ते पारितोषिक वितरित करण्यात आले. यावेळी बालाजी अमाईन्सचे अध्यक्ष ए. प्रताप रेड्डी यांनी पारितोषिक स्विकारले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉ. सी. व्ही. आनंदा बोस उपस्थित होते. या कार्यक्रमात रिलायन्स इंडस्ट्रीज, टाटा केमिकल्स, गोदरेज इंडस्ट्रीज, युपीएल,पीडीलाईट व इतर नामांकित उद्योगांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच विशेष अतिथी पद्मविभूषण प्रा. एम. एम. शर्मा आणि प्रख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांचाही त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल 'रसायन महर्षी' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### आमच्यासाठी अभिमानास्पद बाब: राम रेड्डी

बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकिय संचालक डी. राम रेड्डी यांनी सांगितले की, आयसीएस ही रसायन क्षेत्रात काम करणारी सर्वात जुनी आणि प्रख्यात संस्था आहे. अशा संस्थेकडून बालाजी अमाईन्सनला रसायन उद्योग क्षेत्रातील असाधारण योगदानाबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हे आमच्यासाठी खूप मोठी अभिमानास्पद बाब आहे. दरम्यान, 'रसायन उद्योग श्री' या पुरस्काराचे श्रेय राम रेड्डी यांनी बालाजी अमाईन्सचे सर्व कर्मचारी, अधिकारी आणि व्यवस्थापनास दिले.

### बालाजीचे ५०हून अधिक देशांत नेटवर्क

१९८८ साली स्वदेशी तंत्रज्ञान वापरुन एका सयंत्रापासून सुरु करण्यात आलेल्या छोट्याशा प्रकल्पापासून आज ४ मोठे प्रकल्प कार्यान्वित आहेत, ज्यात प्रामुख्याने जीवनावश्यक औषधे, शेती फवारणी औषधे, जलशुद्धीकरण, रंग, रबर, प्राण्यांसाठीचे खाद्य अश्या अनेक ठिकाणी बालाजी अमाईन्सच्या उत्पादनांचा वापर केला जातो. जगातील पन्नासहून अधिक देशांना आपल्या मालाचा पुरवठा करणाऱ्या बालाजी अमाईन्सने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण दर्जेदार उत्पादनांमुळे जागतिक पातळीवर स्वत:चे स्थान निर्माण केले असल्याचीही माहिती डी. राम रेड्डी यांनी दिली.

# करमाळ्यात केळी संशोधन, संवर्धन केंद्र होणार

## कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे आ. नारायण पाटील यांचा पाठपुरावा सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३० जानेवारी-**

शेलगाव वां (ता. करमाळा) येथे केळी संशोधन केंद्र, ऊती संवर्धन-प्रयोगशाळा व केळी प्रशिक्षण केंद्र उभारण्यास मंजुरी मिळावी अशी मागणी आ. नारायण पाटील यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची मुंबई येथे भेट घेऊन केली आहे. यावेळी मंत्रीमोहदय यांनी तपासून मंजुरी देण्यात यावी असे संबंधितांना निर्देश दिले.



करमाळा तालुक्यामध्ये केळी पिकाखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. सोलापूर जिल्ह्यात केळी पिकासाठी असणारे पोषक वातावरण आणि मोठ्या प्रमाणात वाढत असलेले केळी पिकाखालील क्षेत्र याचा विचार करता करमाळा तालुक्यात केळी संशोधन केंद्र होणे गरजेचे आहे. करमाळा तालुक्यातून मोठ्या प्रमाणात निर्यातक्षम केळीचे उत्पादन होऊन आखाती देशाबरोबरच युरोपीयन देशमध्येही केळीची निर्यात होत आहे. करमाळा तालुक्यामध्ये सन २०२१-२२ मध्ये ६७३१ हेक्टर व सन २०२२-२३ मध्ये ६९७८ हेक्टर व सन २०२३-२४ मध्ये ७३०० हेक्टर एवढ्या क्षेत्रावर केळी पिकाची लागवड केल्याचे कृषी विभागाकडे नमूद असून सरासरी उत्पादकता ६९ टन प्रति हेक्टर आहे. करमाळा तालुक्यामध्ये कोल्ड स्टोरेज व पॅक हाऊसची संख्या ०९ इतकी असून त्याची साठवण क्षमता २५००० मेट्रिक टन आहे.

### ऊती संवर्धन प्रयोगशाळेचीही गरज

करमाळा तालुक्यातून कंदर, वाशिंबे, वरकटणे, जेऊर येथून ८००० कंटेनरमधून १,६०,००० मे. टन वजनाच्या केळीची निर्यात झालेली आहे. केळी फळावर प्रक्रिया करून वेफर्ससह इतर उत्पादन काढली जातात. परंतु केळीसाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असल्याने कुशल मजुरासाठी प्रशिक्षण केंद्र, मृदा व जलपरीक्षण केंद्र, खत तपासणी प्रयोगशाळा, नवनवीन वाणाची निर्मिती व दर्जेदार रोपांची निर्मिती होण्यासाठी केळी संशोधन केंद्राची व ऊती संवर्धन प्रयोगशाळेची आवश्यकता आहे.

## संक्षिप्त वृत्त



### पंढरपुरात पत्रकारांच्या आरोग्याची तपासणी

**पंढरपूर, दि.३० जानेवारी-**

मराठी पत्रकार संघ संलग्न पंढरपूर पत्रकार संघ व डॉ. काणेज् गायत्री सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनानिमित्त पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांची आरोग्य तपासणी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी सचिन इथापे होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. महेश सुडके, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, डॉ. सुरेंद्र काणे, डॉ. वर्षा काणे, हृदयरोग तज्ञ डॉ. बसवराज सुतार आदी उपस्थित होते. यावेळी ५७ पत्रकारांनी या शिबिराचा लाभ घेतला. प्रांताधिकारी सचिन इथापे, डॉ. वर्षा काणे यांनी मार्गदर्शन केले.



### जेऊर येथे हळदी-कुंकू कार्यक्रम

**करमाळा, दि. ३० जानेवारी-**

जेऊर (ता. करमाळा) येथील अपर्णा विवेक पाथ्रुडकर यांनी आधुनिकतेची कास धरत पण परंपरेला छेद न देता आगळेवेगळे हळदी-कुंकू आयोजित केले होते. अपर्णा पाथ्रुडकर यांनी कल्पक विचार करत एकूणच स्त्रियांना सद्य परिस्थितीत उपयोगी पडतील आणि काहीतरी बोध करतील अशा वचनांचा, चारोळ्यांचा तथा कवितांचा वापर करत महिला सशक्तीकरण, अर्थसाक्षरता, महिला सुरक्षा, स्वावलंबन, कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पडत स्वत:साठी वेळ काढत नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी कसा वेळ काढला पाहिजे यावर भर देत वाण देताना या गोष्टींचा पुनरूच्चार केला. त्यांच्या या कामात रेश्मा दुनाखे आणि सीमा मोरे यांनी सहकार्य केले.



### सोरटे वस्तीमध्ये मुलीच्या जन्माचे स्वागत

**नातेपुते, दि. ३० जानेवारी-**

नातेपुते येथील सोरटे वस्तीमध्ये ८६ वर्षाचे पणजोबा माजी केंद्रीय मुख्याध्यापक पांडुरंग आबाजी सोरटे व माजी केंद्रीय मुख्याध्यापिका सुमन पांडुरंग सोरटे या उभयतांनी लेकीच्या नातीच्या दुसऱ्या कन्येचे जंगी स्वागत केले. रंगीबेरंगी फुलांच्या पाकळ्यांच्या पायघड्या अंथरल्या. अंगणात चिमुकलीच्या चार वर्षाच्या छोट्या बहिणीने रांगोळी काढली होती. व्हरांड्यातून बेडपर्यंत सुंदर पाकळ्यांची आरास केली होती. गाडी बाळाला घेऊन दारात येताच सर्वांनी टाळ्यांच्या गजरात फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करुन आई आणि कन्येचे स्वागत केले. उपस्थितांना सातारा कंदी पेढ्यांचे वाटप केले.



### वागदरीत मतदानावर जनजागृती

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जि. प. प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय मतदान दिवासानिमित्त मतदानाचा हक्क बजवा, लोकशाही वाढवा, असा संदेश देत जनजागृती केली. यावेळी मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे, बाबासाहेब बनसोडे, तोलन बागवान, अनुसया कलशेट्टी, अर्चना गिरी, मनिषा कुणाळे, कविता फड यांच्यासह विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. निबंध, चित्रकला, घोषवाक्य स्वत: विद्यार्थ्यांनी लिहिले होते.



### नातेपुते पोलिसांची नियम पालनासाठी गांधीगिरी

**नातेपुते, दि. ३० जानेवारी-**

नातेपुते पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी महारुद्र परजने यांच्या मार्गदर्शनाखाली नातेपुते येथे रस्ता सुरक्षा अभियान राबवण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विक्रांत दिघे, पीएसआय ओमासे, पोहेकॉ विकास बाबर, वाहतूक शाखेचे पोकॉ सुधीर हांगे, पोकॉ विश्वास जानकर यांनी नागरिकांना वाहतुकीच्या नियमाचे पालन करण्याबाबत गुलाब पुष्प देऊन जनजागृती केली.



### लहुजी युनियनतर्फे पोलीस अधिक्षकांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ३० जानेवारी-**

लहुजी पेंटिंग कामगार युनियनचे संस्थापक अध्यक्ष वसंत देडे यांनी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचा सत्कार केला. विभागीय पोलीस अधिकारी विलास यामवार, पोनि महेश स्वामी, पोनि राजेद्र टाकणे, अखिल भारतीय पत्रकार परिषद शाखा अक्कलकोटचे तालुकाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, पत्रकार रमेश भंडारी, पत्रकार स्वामीराव गायकवाड, लहुजी शक्ती सेनेचे अक्कलकोट स्टार प्रचारक राजेंद्र स्वामी, पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना व्यक्तिमत्व विकासाचे केंद्र : डॉ. इंगवले



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० जानेवारी-**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो. विद्यार्थ्यांचा फक्त बौध्दिक विकासच होणे अपेक्षित नसून, त्यांचा सर्वांगीण विकास खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातूनच होत असतो, असे प्रतिपादन डॉ. विजय इंगवले यांनी केले.

मेडशिंगी (ता. सांगोला) येथे अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, सांगोला महाविद्यालय व ग्राम पंचायत मेडशिंगी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, तात्यासाहेब केदार, सचिव उदयबापू घोंगडे, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, सरपंच उमा इंगवले, उपसरपंच बाळासाहेब लेंडवे, प्रतापसिंह इंगवले, अमर गोडसे, अमीत नष्टे, प्रभाकर कांबळे, तुकाराम शिंदे, अरुण शेंडे, कल्पनाताई शिंगाडे उपस्थित होते. उमा इंगवले यांनी स्वागत केले. प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, डॉ. सुरेश भोसले, बाबुराव गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. या शिबिराचे संयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ.नवनाथ शिंदे, डॉ. सदाशिव देवकर, डॉ. विद्या जाधव, प्रा. सोनल भुंजे, डॉ. तानाजी यादव, प्रा. रोहित पवार, प्रशासकीय सेवक महादेव काशीद उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रसाद लोखंडे यांनी केले.



## अलकाताई भोसले यांना राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० जानेवारी-**

मराठा मंदिर मुंबई संचलित श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेच्या वतीने हिरकणी महिला संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलकताई जन्मेजयराजे भोसले यांना राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी मराठा मंदिर विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार, सचिव मनोहर साळवी, सदस्य सुदाम पाटील, सदस्य निवेदिता देशमुख, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले, अन्नछत्र मंडळाचे सचिव शामराव मोरे, हिरकणी महिला संस्थेच्या सचिवा अर्पिताराजे अमोलराजे भोसले, श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजीव माने, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे सचिव ए. एम. घाटगे, विश्वस्त महेश गोगी, मुख्याध्यापक शरद जंगाले, शहाजी मुख्याध्यापक एस. एन. शिंदे, अर्चना जाधव, जॉईंट सेक्रेटरी ममता जाधव, जनरल सेक्रेटरी गायत्री सुतार, मनोज निकम, अरविंद शिंदे, शितल फुटाणे उपस्थित होते. हा सन्मान प्रसालेच्या वार्षिक स्नेहसंमेलन समारंभात करण्यात आला.



## रातंजनच्या आनंद बाजारात ३५ हजारांची उलाढाल

**बार्शी, दि. ३० जानेवारी-**

तालुक्यातील रातंजन येथील आदर्श विद्यालयात आनंद बाजाराचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन रातंजनचे ज्येष्ठ नागरिक लक्ष्मण देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. गावातील नागरिक यावेळी उपस्थित होते. यावेळी ३५ हजारांची उलाढाल झाली.

आनंद बाजारामध्ये विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, भाजीपाला, विक्रीचे विविध स्टॉल लावण्यात आले होते. नागरिकांनी माल घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती. यातून विद्यार्थ्यांच्या व्यवहार कौशल्यास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. आनंद बाजारामध्ये ३५,२४० रुपयांची उलाढाल झाली. गावातील नागरिकांनी आनंद बाजाराचा आनंद घेतला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा सुदामती देशमुख, उर्मिला देशमुख, शिवाजी भोसले, भालशंकर, विकास बनसोडे, माळी, सचिन साठे, विजय दळवी, प्रविण नायकल, आत्तार, विद्यार्थी, ग्रामस्थ, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अक्कलकोटमध्ये मोबाईल चोरट्यांची धुमाकूळ

**तथा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३० जानेवारी-**

अक्कलकोट शहरात गेल्या तीन दिवसांपासून मोबाईल चोरणारी टोळी सक्रिय झाली आहे. अनेकांचे मोबाईल चोरीला गेले आहेत. गर्दीच्या ठिकाणी सोमवार बाजार येथुन ८ जणांचे मोबाईल चोरीला गेल्याने एकच खळबळ उडाली आहे.

शिवसेना विधानसभा संघटक प्रा. सुर्यकांत कडबगावकर यांचा मोबाईल चोरट्यांनी हातोहात लांबविला. सोमवारी कांदा बाजारात मोबाईल चोरणारी टोळी सक्रिय होऊन सायंकाळी पाच ते सहा वाजता आठ जणांचे मोबाईल चोरीला गेले. स्वामी समर्थ मंदिर परिसर, एसटी स्टॅण्ड येथेही अनेकांचे मोबाईल चोरीला गेली आहेत. त्यामुळे लोकांमध्ये व भाविकामध्ये भयाचे वातावरण निर्माण झाले आहे. गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवावा, मोबाईल चोरांचा त्वरित बंदोबस्त करण्याची मागणी शिवसेना शिंदे गट तालुकाप्रमुख संजय देशमुख यांनी केली आहे.



## किरण राजमानेची खेलो इंडियासाठी निवड

**सांगोला, दि. ३० जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूरच्या १० मीटर रायफल शूटिंग महिला संघाने पंजाब विद्यापीठ चंदिगड येथे पार पडलेल्या आखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सांगोला महाविद्यालयाची विद्यार्थिनी किरण महेश राजमाने हिची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंना डॉ. सुरेश भोसले, प्रा. जगदीश चेडे, जिमखाना कमिटीचे सर्व सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष प्रा. पी. सी. झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव अॅड. उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी अभिनंदन केले.



## मंगळवेढ्यात निराधारांचे ठिय्या आंदोलन

**मंगळवेढा, दि. ३० जानेवारी -**

संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे अनुदान मिळत नसल्याने लक्ष्मी दहिवडी येथील लाभार्थ्यांनी तहसील कार्यालयात ठिय्या मांडत तातडीने अनुदानाची देण्याची मागणी प्रभारी महसूल तहसीलदार सुरेखा हजारे यांच्याकडे केली. तालुक्यात साडेपाचशे लाभार्थ्यांना वेळेवर अनुदान मिळत नाही. हे अनुदान मिळण्यासाठी वारंवार कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. अनुदान ज्या बँक खात्यात जमा होते, त्या ठिकाणी सबंधित बँकेला वारंवार हयात दाखला दिला तरी महसूल विभागाकडूनही उत्पन्न दाखला, हयात दाखला मागणी करण्यात येते. हे दाखले देऊनही अनुदान वेळेवर मिळत नसल्याची तक्रार लाभार्थ्यांनी केली. लाभ न मिळाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या वतीने येताळा भगत व सामजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर कौंडुभैरी, गंगाधर मसरे, संतोष माने, लाभार्थ्यांनी दिला आहे.

## कर्मयोगी इन्स्टिटयूटच्या 30 विद्यार्थ्यांची नोकरीसाठी नामांकित कंपनीमध्ये निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० जानेवारी-**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी (अभियांत्रिकी) महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनियरिंग व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील अश्या एकूण तब्बल ३० विद्यार्थ्यांची पुणे येथील एआरएमएस प्रा. लि. या नामांकित कंपनीमध्ये निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील यांनी दिली.



श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार जी. डी. वाळके, उपप्राचार्य प्रा. जे. एल. मुडेगावकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मोहसीन शेख, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ, विभागप्रमुख प्रा. अनिल बाबर, डॉ. एस. व्ही. एकलारकर, प्रा. दीपक भोसले, प्रा. एस. एम. लंबे, समन्वयक प्रा. सुशील कुलकर्णी, प्रा. दत्तात्रय चौगुले, प्रा. व्ही. एल. जगताप, प्रा. योगेश माने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# दिल्ली दरबारात फडकली ‘जकराया’च्या यशाची पताका

## केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून पाठीवर शाबासकीची थाप

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ३० जानेवारी-**

तालुक्यातील वटवटे येथील जकराया उदयोग समूहाच्या यशस्वीतेची पताका आता थेट दिल्ली दरबारी फडकली आहे. जकराया शुगरने स्पेंट वॉशपासून बायोसिएनजी निर्मितीचा प्रकल्प देशात पहिल्यांदाच चालू केला असून त्याचे उत्पादन यशस्वीरित्या सुरू आहे.

यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी मदत होणार आहे. हा प्रकल्प देशातील साखर कारखानदारीसाठी पथदर्शी ठरला आहे. याची दखल थेट केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी घेतली आहे. त्याचाच एक भाग म्हणून जकराया शुगरचे कार्यकारी संचालक सचीन जाधव यांना दिल्लीत पाचारण करून गडकरी यांनी या प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती जाणून घेत जकराया उद्योग समहाच्या व्यवस्थापनेचे कौतुक केले आहे आणि पाठीवर शाबासकीची थाप दिली आहे.



जकराया शुगरच्या वतीने विविध उपपदार्थ निर्मितीचे प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत. यामध्ये सहविजनिर्मिती, इथेनॉल, पीडीएम पोटॅश, नॅनो युरिया यासारख्या प्रकल्पांचा समावेश आहे. २०२४-२५ च्या गळीत हंगामात या उद्योग समूहाने पेंट वॉशपासून बायोगॅस (सीबीजी) तयार करण्याच्या प्रकल्प कार्यान्वित केला आहे. साखर कारखानदारीत देशातील हा पहिलाच प्रयोग आहे. हा प्रकल्प सुरू करताना अनेक तांत्रिक अडचणी आल्या.

मात्र कार्यकारी संचालक सचिन जाधव आणि पूर्णवेळ संचालक राहुल जाधव यांनी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष अॅड. बी. बी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक तांत्रिक अडचणीची उकल करीत मुळाशी जाऊन यावर मात करीत हा प्रकल्प यशस्वीरित्या चालवून दाखविला आहे. जकराया उद्योग समूहाने हे अशक्यप्राय आव्हान पेलून दाखविले असल्याने याबाबत इतर कारखानदारांमध्ये या स्पेंट वॉशपासून बायोगॅस निर्मिती या प्रकल्पाबाबतबाबत मोठे कुतूहल आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्यासह देशातील नामांकित साखर कारखानदारांनी या कारखान्याला भेट देऊन या प्रकल्पाची माहिती घेतली आहे. या प्रकलपाबाबतची माहिती केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांना समजल्यानंतर त्यांनी सचिन जाधव यांना आपल्या कार्यालयात बोलावून घेऊनसविस्तर माहिती जाणून घेतली. उद्योगासाठी आवश्यक असणाऱ्या कोणत्याही पायाभूत सुविधा उपलब्ध नसताना, सामान्य शेतकरी कुटुंबाने साखर कारखानदारी सारख्या अतिशय किचकट उद्योगात घेतलेल्या भरारीची यशोगाथा ऐकून गडकरी भारावून गेले. यावेळी भाजयुमोचे मोहोळ तालुकाध्यक्ष अंकुश आवताडे उपस्थित होते.

> जकराया उद्योग समुहाची विकासगाथा ऐकताना केंद्रीय मंत्री गडकरी यांनी दिलेली दाद कायमस्वरूपी स्मरणात राहणारी आहे. या भेटीने मी भारावून गेलो आहे. ही भेट जकराया उद्योग समूहाला कायमच प्रेरणा देत राहील.
>
> **- सचिन जाधव,** कार्यकारी संचालक, जकराया शुगर

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मंगळवेढा नगरपरिषदेसमोरील आंदोलन स्थगित

**मंगळवेढा, दि.३० जानेवारी-**
मंगळवेढा शहरातून होणारी अवजड वाहतूक थांबविण्यात यावी या मागणीसाठी प्रजासत्ताक दिनानिमित्त मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांच्यासह कार्यकर्त्यांनी नगरपरिषद कार्यालयासमोर आंदोलन सुरु केले होते.

दरम्यान मुख्याधिकारी डॉ. चरण कोल्हे यांनी जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा जिल्हाधिकाऱ्यांचे लेखी पत्र उपोषणकर्त्यांना दिल्याने तूर्त हे आंदोलन स्थगित करण्यात आले. या आंदोलनात नारायण गोवेसह चंद्रकांत पवार, एकनाथ फटे, देवदत्त पवार, श्रीकांत जाधव, ओमने आदी सहभागी झाले होते.

आंदोलनस्थळी माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे, अजीत जगताप, चंद्रशेखर कोंडुभैरी, पांडुरंग जावळे, संतोष रंदवे, माणिक गुंगे, नजीर इनामदार, प्रा. विनायक कलुबर्मे, येताळा खरबडे, सुखदेव डोरले, मुरलीधर घुले, सुनिल नलवडे, राजेंद्र माळी, अनिल बोदाडे, मच्छिंद्र कोंडुभैरी यांनी पाठिंबा दर्शविला होता.






## संक्षिप्त वृत्त...



### पंढरपुरात ७६६ जणांचे रक्तदान

**पंढरपूर, दि. ३० जानेवारी-**
अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य औषध विक्रेता संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष, जगन्नाथआप्पा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त देशव्यापी एकाच दिवशी, एकाचवेळी महारक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी ७५५ जणांनी रक्तदान केले. यावेळी पढरपूर शहर व तालुक्यातील भाळवणी, भोसे, फुलचिंचोली या गांवामध्ये शिबीर घेण्यात आले. पंढरपूरमध्ये केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन अध्यक्ष प्रशांत खलिपे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहरात ५४७ तर व तालुका ग्रामीणमध्ये फुलचिंचोली ७७, भोसे-करकंब ७२, भाळवणी ५९ असे एकूण विक्रमी ७५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी अध्यक्ष प्रशांत खलिपे, सचिव महादेव जाधव, खजिनदार श्रीरंग राहिरकर, उपाध्यक्ष मिलिंद उकरंडे, सहसचिव दीपाली कारंडे, पीआरओ उमेश गायकवाड, कार्यकारीणी सदस्य श्रध्दा कुलकर्णी, रावसाहेब गवळी, मनोज वास्ते, शिवराज पाटील, सचिन मेनकुदळे, शिवराम कोरके, फरदीन शेख, गोवर्धन भट्टड, सुदेश व्होरा, श्रीरंग बागल, दिलीप कारंडे, विनय उपाध्ये, श्रीकांत भुमरेला, अजित कुलकर्णी, हर्षल इनामदार, राहुल जाधव, माधुरी जाधव, अमृता माने, आनंद मेलगे, विशाल वाघमोडे, गणेश मेटकरी यांनी परिश्रम घेतले.



### सुरेश डिसले यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान

**बार्शी, दि. ३० जानेवारी-**
महाराष्ट्र विद्यालय बार्शीचे क्रियाशील शिक्षक सुरेश डिसले यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार युवराज छत्रपती संभाजी महाराजांच्या हस्ते पुण्यात देण्यात आला. याप्रसंगी माजी शिक्षक आ. दत्तात्रय सावंत, पुणे विभाग शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे, अध्यक्ष डॉ. श्रीमंत कोकाटे, आयआरएस विपुल वाघमारे उपस्थित होते. संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, संस्थेचे सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. मीराताई यादव, एस. बी. शेळवणे, प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन. बी. साठे यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### गोरे नवदांपत्याकडून आपुलकी प्रतिष्ठानला देणगी

**सांगोला, दि. ३० जानेवारी-**
लग्न समारंभातील अनावश्यक खर्च टाळून स्वाती नागेश गोरे यांच्या स्मरणार्थ गोरे नवदांपत्याकडून आपुलकी प्रतिष्ठानला ५००१ रुपये देणगी देऊन एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला आहे. चिंचोली येथील गोरे परिवाराने विवाह सोहळा अत्यंत साध्या पद्धतीने करून अनावश्यक खर्चाला फाटा दिला. ही देणगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी अरविंद डोंबे, सुरेश चौगुले, शशिकांत येलपले, रमेश गोडसे, बाळासाहेब वाघमारे, सुभाष पाटोळे, अरविंद केदार, प्रा. डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, वसंत माने, दादा खडतरे आदीसह गोरे कुटुंबीय उपस्थित होते.



### मंगळवेढ्यातील १४ शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक डिजिटल प्रमाणपत्रांचे वाटप

**मंगळवेढा, दि. ३० जानेवारी-**
महाराष्ट्र शासनाने कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी ॲग्रीस्टॅक योजना आणली असून मंगळवेढ्यातील १४ शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी झाल्याने त्यांना प्रजासत्ताकदिनी तालुका कृषी अधिकारी मनिषा मिसाळ-जाधव यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी तुकाराम नागणे, यशवंत ढाणे, यशवंत खताळ, आबासाहेब चेळेकर, सार्थक चेळेकर, भिकन साखरे, अनिता शिंदे, सुनंदा हिरेमठ, बिभीषण माने, विजय पाटील, अण्णासाहेब बिले, संगीता बिले, सुनिता चेळेकर, नामदेव नागणे आदी १४ शेतकऱ्यांना यावेळी डिजिटल प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

## पंढरपुरातील वाहतूक मार्गात बदल

**माघी यात्रेनिमित्त प्रशासनाची तयारी**

### २ ते १२ फेब्रुवारीपर्यंत अंमलबजावणी, वाहतूक कोंडी टाळण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० जानेवारी-**
माघ शुद्ध एकादशी शनिवारी ८ फेब्रुवारी रोजी असून, माघ यात्रा कालावधीत श्री. विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपुरात मोठ्या प्रमाणात भाविक येतात. यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातील तसेच शहराबाहेरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा बदल २ ते १२ फेब्रुवारी या कालावधीपर्यंत राहणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

संबंधित भाविक व वाहनधारकांनी या बदललेल्या वाहतूक मार्गाची नोंद घेऊन वाहतूक कोंडी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी यांनी केले आहे. पंढरपुरात यात्रेनिमित्त अहिल्यानगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने अहिल्यादेवी चौक, शेटफळ चौकमार्गे मोहोळ रोड विसावा येथे पार्क करावीत. ६५ एकर येथे फक्त दिंडी व पालखीचे वाहने पार्क करावीत. पुणे, सातारा, वाखरीमार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंचीमार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोलामार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, टाकळी बायपासमार्गे येऊन वेअर हाउस येथे पार्क करावीत. तसेच विजापूर, मंगळवेढा मार्गे येणारी वाहने टाकळी बायपासमार्गे वेअर हाऊस व यमाई तुकाई मंदिर येथे पार्क करावीत.

**एकेरी मार्ग**
कॉलेज क्रॉस रोड ते सरगम चौक ते सावरकर चौक ते नवीन कराड नाका या मार्गावर एकेरी वाहतूक राहील.



पंढरपूर शहरातून टेंभुर्णी, अहिल्यानगर, सोलापूर, लातूर, बीड, उस्मानाबादकडे जाणारी सर्व वाहने सावरकर चौक, नवीन कराड नाका, कॉलेज क्रॉस रोड, कौठाळी बायपास, नवीन सोलापूर नाकामार्गे जातील. पुणे-साताऱ्याकडे जाणारी वाहने सावरकर चौक, नवीन कराड नाका, कॉलेज क्रॉस चौक, वाखरी मार्गे जातील तर विजापूर, कराड, आटपाडी, कोल्हापूर, सांगली, मिरज, मंगळवेढामार्गे जाणा-या सर्व गाड्या सावरकर चौक, नवीन कराड नाका येथून टाकळी बायपास व गादेगाव फाटामार्गे जातील.

**शहरातील अंतर्गत वाहतूक :** ६ ते ९ फेब्रुवारीपर्यंत प्रदक्षिणा मार्ग, महाव्दार चौक ते शिवाजी चौक, सावरकर चौक ते शिवाजी चौक मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद असेल. बार्शी, सोलापूर मार्गावरुन येणारी तीन रस्तामार्गे येणारी हलकी वाहने फक्त अंबाबाई पटांगणात उतरतील. नियमित ट्रक व यात्रेसाठी सोडण्यात येणाऱ्या एस .टी. बसना जुना दगडी पूल, नवीन पूल व तीन रस्ता मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंगळवेढा नाका, महात्मा फुले चौक, लहुजी वस्ताद चौक या मार्गाने येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंदी आहे. अंबाबाई पटांगण ते भजनदास चौक, अंबाबाई पटांगण ते अर्बन बँक, शिवाजी चौक ते अर्बन बँक, संकुल कॉर्नर ते नगरपालिका मार्ग हा मार्ग पासेसच्या वाहना व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

**पार्किंग व्यवस्था :** अहिल्यानगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने अहिल्या चौक, तीन रस्तामार्गे मोहोळ रोड विसावा व नगरपालिकेच्या वाहनतळावर पार्किंग करतील. तसेच ६५ एकर येथे दिंडी व पालखीची वाहने पार्किंग करतील. पुणे, सातारा, वाखरीमार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंचीमार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोलामार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, टाकळीमार्गे येऊन वेअर हाऊस येथे पार्क करावीत. विजापूर, मंगळवेढ्याकडून येणारी वाहने कासेगाव फाटा, टाकळीमार्गे वेअर हाऊस येथे पार्किंग करावीत. यात्रा कालावधीत शहरात येणारी हलकी वाहने अंबाबाई पटांगण, गजानन महाराज मठ, नगरपालिका पार्किंग, क्रीडा संकुल तसेच संबंधित मठामध्ये पार्क होतील. शहरातील अंतर्गत रोडवर कोणत्याही ठिकाणी गाड्या पार्क करण्यास मनाई असेल.

## आता उद्योगाशिवाय पर्याय नाही

**श्रद्धा कंडूडे : तीर्थ येथील रामलिंगेश्वर प्रशालेत प्रजासत्ताक दिन साजरा**

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ३० जानेवारी-**
२१ व्या शतकात युवकांना उद्योगाशिवाय पर्याय नाही. शालेय जीवनामध्ये उद्योगाचे धडे विद्यार्थ्यांना द्यावे व त्यातून युवा उद्योजक तयार होऊ शकतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये जिद्द व चिकाटी जास्त असते, असे प्रतिपादन महाराष्ट्र भाजपा उद्योग आघाडीच्या सरचिटणीस श्रद्धा कंडूडे यांनी केले.

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालात प्रजासत्ताक दिनानिमित्त त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, यावेळी त्या बोलत होत्या. प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. अध्यक्षस्थानी सौम्या परमेश्वर पाटील होत्या. यावेळी भुवनेश्वरी पाटील, मंगळवेढ्याचे युवा उद्योजक उत्तम पाटील, संचालक शिवराज बिराजदार उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषण व देशभक्तीपर गीत सादर केले. श्रद्धा कंडूडे यांनी शाळेतील निसर्गरम्य वातावरणाचे कौतुक केले. नागराज पाटील यांनी संविधान निर्मिती व प्रजासत्ताक दिन याविषयी माहिती दिली. सौम्या पाटील म्हणाल्या की, आपल्या गावातील ही शाळा ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वरांच्या नावाने स्थापित असल्याने या शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी खूप बलवंत व चाणक्य बुद्धीचा होतो. कारण प्रभू रामचंद्रांचा आशीर्वाद या शाळेवर आहे. महिला सन्मान केल्याबद्दल संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त करते. यावेळी प्राचार्य सुधीर सोनकवडे, शिल्पा महिंद्रकर, सचिन गुजा, सिद्धेश्वर बिराजदार, अमर पाटील, सिद्धाराम पाटील, रेवणय्या मठपती, गुरुशांत बिराजदार, राजकुमार देडे, श्रीशैल बाळकाई, अजित पट्टणशेट्टी, सिद्धेश्वर घोंगडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन महेश पट्टणशेट्टी यांनी केले तर आभार शांतप्पा बगले यांनी मानले.



## पिलीवमध्ये रोडरोमियोंचा हैदोस

**तात्काळ बंदोबस्त करण्याची भाजपाचे राहुल मदने यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३० जानेवारी-**
माळशिरस तालुक्यातील पिलीवमध्ये रोडरोमियोंनी हैदोस घालण्यास सुरुवात केली असून, त्यांना आळा घालण्याची मागणी भाजपाचे राहुल मदने यांनी केली आहे.

येथे दोन हायस्कूल व एक ज्युनिअर कॉलेज आहे. या ठिकाणी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलिपे ज्युनिअर कॉलेज हे पिलीवपासून पूर्वेला जवळपास दोन किलोमीटर आहे. शाळा व कॉलेजला मुली रस्त्याने ये-जा करतात. यामध्ये शाळेला व कॉलेजला जाताना व येताना पायी चालत ,सायकलवरुन ये-जा करतात. याचवेळी शाळा कॉलेजला नसणारी अनेक मुले केसाची वेगवगळी स्टाईल व बुलेट व इतर गाड्यावरुन सायलेन्सरचा कर्णकर्कश आवाज करीत मुलींकडे पाहत छेडछाड करतात. ते मुद्दाम मुलींची छेडछाड काढण्यासाठीच असे कृत्य केले. बऱ्याच दिवसांपासून पिलीव परिसरात हे प्रकार सुरू असून यामध्ये सतत वाढच होत आहे. अशा मस्तवाल रोडरोमियोंचा पिलीव पोलिसांनी तात्काळ बंदोबस्त करावा, तसेच कर्मवीर व जवाहरलाल या दोन्ही विद्यालयात दामिनी पथकामार्फत मुलींचे प्रबोधन करावे, अशी मागणी भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल मदने यांनी निवेदनाद्वारे पिलीव पोलीस स्टेशनकडे मागणी केली आहे. यावेळी सचिन भैस, प्रकाश काकडे, स्वप्निल सावळजकर, नवनाथ पिसे, वसीम बागवान, शहाजी खरात यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. सदरचे निवेदन पोलीस नाईक दत्ता खरात यांनी स्वीकारले.



### वांगीच्या चैत्रालीचे राज्यस्तरीय गांधी विचार संस्कार परीक्षेत यश

**करमाळा, दि. ३० जानेवारी-**
गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव यांच्या वतीने घेतलेल्या राज्यस्तरीय गांधी विचार संस्कार परीक्षेत न्यू इंग्लिश स्कूल वांगी नंबर ३ येथील विद्यार्थिनी चैत्राली सोमनाथ झुंबाड हिने तृतीय क्रमांक मिळविला. मेडल, प्रशस्ती पत्रक आणि स्मृतिचिन्ह देऊन तिला गौरवण्यात आले. तिच्या यशाबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, स्थानिक स्कूल कमिटी व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.



## वटवृक्ष मंदिरात मुंबईच्या भक्त परिवाराची भजनसेवा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० जानेवारी-**
येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात मुंबईच्या श्री. स्वामी समर्थ भक्त परिवारची भजनसेवा मोठ्या भक्तीभावात संपन्न झाली.

या भजन सेवेत गायक कृष्णा चौकेकर, राजेश सावंत, दिनेश साळवी, मंदार सावंत, अनिल कोळवणकर यांच्यासह स्वामी समर्थ भक्त परिवारच्या कलाकारांची भजनसेवा स्वामी चरणी समर्पित झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व मान्यवरांचा सत्कार मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते स्वामींचे कृपावस्त्र देऊन संपन्न झाला. या भजनसेवेत श्री स्वामी समर्थ भजनी मंडळाच्या सर्व कलाकारांनी स्वामींचे नामस्मरण, राम गणपती वंदन, श्रीपाद श्रीवल्लभ भजन, स्वामी स्तुती, शंकर महाराज स्तवन, श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ, निघालो घेऊन दत्ताची पालखी इत्यादीसह अनेक भावगीते गाऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, सागर गोंडाळ, रविराव महींद्रकर, काशिनाथ इंडे, श्रीकांत मलवे, विपूल जाधव, प्रसाद सोनार आदीसह भाविक भक्तांनी या भजन सेवा श्रवणाचा लाभ घेतला.



### सांगोल्यात श्री अंबिका देवी यात्रेनिमित्त कृषी प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० जानेवारी-**
कृषी विभाग सांगोला व श्री अंबिका देवी यात्रा कमिटीचे कोर्ट रिसिव्हरतर्फे श्री अंबिका देवी यात्रेत कृषी प्रदर्शन आयोजित केले जाणार आहे.

त्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपले शेतातील शेतमालाचे नमुने घेऊन ४ व ५ फेब्रुवारी रोजी सहभाग नोंदवावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव यांनी केले आहे. स्पर्धेसाठी उपस्थित नमुन्यातून आयोजकांकडून विजेते निवडले जाणार आहेत. त्यानुसार त्यांना बक्षीस वितरण केले जाईल. कृषी विभागातील सर्व योजनांची माहिती संबंधित ठिकाणी उपलब्ध होणार आहे. सहभाग नोंदवण्यासाठी कृषी विभाग व श्री अंबिका देवी यात्रा कमिटी कोर्ट रिसिव्हर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पंढरपुरात उद्यापासून पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव

**बार्शी रस्त्यावर मंदिराची उभारणी**

**डॉ. शीतल शहा यांचा पुढाकार, विविध कार्यक्रमांचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ जानेवारी-**
येथील बालरोग तज्ञ डॉ. शीतल शहा यांनी पंढरपूर-बार्शी रस्त्यावर आढीव येथून २ कि. मी. अंतरावरतील आपल्या तपोवन या फार्महाऊसवर एक भव्य व दिव्य अशा अजोड कलाकृतीने व आकर्षक अशी जैन मंदिराची निर्मिती केलेली आहे.

या मंदिरामध्ये भगवान श्री १००८ मुनिसुव्रतनाथ तीर्थकरांची स्थापना करण्यासाठी शनिवारी १ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत पंचकल्याणक प्रतिष्ठेचे आयोजन करण्यात आले आहे.

जैन धर्म शास्त्रानुसार जैन गुरुंच्या सानिध्यातच व मंत्रोपचाराव्दारे मंदिरामध्ये तीर्थकरांच्या मूर्तीची स्थापना होणार आहे. यासाठी पंचकल्याण प्रतिष्ठेसाठी जैन धर्मियांचे महान गुरु प. पू. आचार्य चर्याशिरोमणी व अध्यात्म योगी १०८ विशुध्द सागर महाराज ३० साधूंसह मध्य प्रदेशाहून चालत येत आहेत. तसेच याच परिसरामध्ये मंगल विहार करणारे प. पू. आचार्य सुयोग सागर ससंघ उपस्थित रहात आहेत. ४० साधूंची आगमनाची ही पर्वणी आहे. दरम्यान पंचकल्याणक प्रतिष्ठेसाठी संपूर्ण भारतातून व महाराष्ट्रातून प. पू. मुनिराजांचे जवळपास ५ ते ६ हजार भक्त देखील या समारंभास उपस्थित राहणार आहेत. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन डॉ. शीतल शहा व सुषमा शहा यांनी केले आहे.



**बांधकामासाठी लोखंड, लाकडाचा वापर नाही**
जैन मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिराच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा लोखंडी व लाकडीवस्तूंचा वापर न करता केवळ राजस्थानी मखराना मार्बलमध्ये भव्य व दिव्य ४० बाय ८० लांबी-रुंदीच्या मंदिराची निर्मिती केलेली आहे.

**केवळ नऊ महिन्यांत मंदिराची उभारणी**
या मंदिराचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे अल्पावधीत म्हणजे केवळ ९ महिन्यात बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. मंदिरासाठी लागणारे मार्बल किंवा पाषाण मखरामा शहरातून घेऊन, तेथेच राजस्थानी कारागिराच्या मार्फत मंदिराची चढणघडण करुन सुबक कलाकृतीने मंदिराचे कोरीव काम करण्यात आले आहे.

CMYK

# धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मराठा आंदोलन : परंडा येथे धरणे व घंटा नाद आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३० जानेवारी -**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा जालना जिल्ह्यातील सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले असून त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून परंडा येथे दि.३० जानेवारी रोजी तहसील कार्यालयासमोर मराठा समाज बांधवाकडून एक दिवशीय धरणे व घंटा नाद आंदोलन हलगी वाजवीत करण्यात आले.



मराठा समाजाला मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार आरक्षण मिळावे अशी मागणी केली आहे. आंदोलन कर्त्यांनी आपल्या मागणीचे निवेदन परंडा तहसिलदार मार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे. यावेळी धरणे व घंटानाद आंदोलनास गोरख मोरजकर, रवि मोरे, मेजर महाविर तनपुरे, शंकर घोगरे, पै. तिंबोळ, उपसरपंच गोडगे, बालाजी गंभीरे आदिसह सकल मराठा समाज बांधव उपस्थीत होते.



## संक्षिप्त वृत्त...



### देशी गोवंश, नैसर्गिक शेती प्रशिक्षण

**जळकोट, दि.३० जानेवारी -**

महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने व सोशल रेस्पोंसिबिलिटी समूह यांच्या सहकार्याने देशी गोवंश आधारित नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रम तुळजापूर येथे पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री ज्ञानेश्वर शिंदे (संचालक राष्ट्रीय कर्तव्य समूह), श्री. जगन्नाथ मगर (महाराष्ट्र कृषी भूषण, गोकृषी तज्ञ ) ,डॉ. भगवान आरबाड ,शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र तुळजापूर उपस्थित होते. प्रमुख अतिथी यांचे स्वागत डॉ. दीपक क्षीरसागर( विकास अधिकारी, विस्तार पंचायत समिती ,तुळजापूर) डॉ. कृष्णा रेड्डी, पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना अणदूर,डॉ. शिंगारे , डॉ. निरंजन यांनी केले. प्रथमतः श्री ज्ञानेश्वर शिंदे यांनी देशी गोवंश पासून माणसाला कोणकोणते फायदे आहेत. त्याच्यापासून तयार होणारे पदार्थ याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय कोंडुभैरी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. दीपक क्षीरसागर यांनी केले.

### सदस्यपदी प्रशांत मते नियुक्ती

**धाराशिव, दि.३० जानेवारी -**



महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण धाराशिव NLS (legal service to the workers in the Unorganised sector Scheme २०१५ असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी कायदेशीर सेवा योजना,२०१५ संदर्भीय मधील निर्देशांची अंमलबजावणी करणे करिता विशेष सेलची स्थापना करण्यात आली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर धाराशिव वसंत यादव यांनी प्रशांत शशिकांत मते पी.एल.व्ही यांची विशेष सेलच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे. उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांची २७ जानेवारी रोजी दुसऱ्या वर्षी निवड करण्यात आली. सलग दुसऱ्या वर्षी त्यांची निवड झाल्याबद्दल सर्वत्र स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



### प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.३० जानेवारी -**

महिला व बालविकास विभाग अंतर्गत कार्यरत धर्मवीर संभाजीराजे सामाजिक बहुउद्देशीय संस्था, तुळजापूर संचलित निरीक्षणगृह, बालगृह धाराशिव येथे २६ जानेवारी, ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण संस्थेचे सचिव सुधीर कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाचे परिविक्षा अधिकारी व्यंकट देवकर, तसेच कर्मचारी माधुरी हरवले, शहापुरे आर.के, कदम बी.आर, शिंदे. ए.एल, आशा भिसे, प्रशांत मते, अक्षय निपाणीकर यावेळी उपस्थित होते. तसेच बालगृहातील मुले उपस्थित होती.

### जि.प. शाळेत स्नेहसंमेलन संपन्न

**नळदुर्ग, दि.३० जानेवारी -**

नळदुर्ग येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन दि.२८ जानेवारी रोजी अत्यंत उत्साहात पार पडले. निवृत्त शिक्षक महयोद्दीन सय्यद, केंद्रप्रमुख सत्तेश्वर जाधव यांच्या उपस्थितीत नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या हस्ते या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. पहिली ते पाचवीतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मराठी व हिंदी गीतावर बहारदार नृत्य सादर केले तसेच पारंपारिक लेझीम कलाही सादर केली. मुख्याध्यापक भास्कर मस्के, बिलाल सौदागर, सुंदर भालकाटे, वंदना चौधरी, सुरेखा मोरे, जयश्री धुमाळ, प्रीती भंडारे, राहुल खोडके, आकाश पाटील परिश्रम घेतले.

## उपलब्ध होणाऱ्या रोजगारातून संधीचे सोने करा : आ. प्रवीण स्वामी

**१३७ उमेदवारांची प्राथमिक निवड... ३८८ उमेदवारांची मेळाव्याला उपस्थिती... १४ स्टॉलवर ५२१ उमेदवारांनी केली स्वयंरोजगारासाठी नोंदणी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**

रोजगारातून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यास मदत होते.युवावर्ग हा रोजगार नाही असे म्हणत आज समाजात फिरतांना दिसतो. ज्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले आहे, असे अनेक उदाहरण आहे. रोजगाराचा प्रश्न आज सर्वत्र आहे. मात्र उपलब्ध रोजगार ही संधी आहे. तेव्हा मिळणाऱ्या संधीचे युवावर्गाने सोने केले पाहिजे, असे मत आमदार प्रवीण स्वामी यांनी व्यक्त केली.

आज २९ जानेवारी रोजी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिव यांच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून आमदार स्वामी बोलत होते. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या परिसरात या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंखे, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संजय गुरव आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी संजय मगर यांची उपस्थिती होती.

या रोजगार मेळाव्यात १७ खाजगी क्षेत्रातील आस्थापनांमध्ये पात्र व नोकरी इच्छुक असलेल्या ३५७ उमेदवारांनी मुलाखती दिल्या. यामध्ये १३७ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. मेळाव्यात ३८८ उमेदवार उपस्थित होते. यामध्ये १८८ पुरुष व २०० स्त्री उमेदवारांचा समावेश होता. मेळाव्यात १४ विविध विभाग व महामंडळाचे एकूण १४ स्टॉलवर ५२१ उमेदवारांनी स्वयंरोजगार मिळवण्यासाठी नोंदणी केली. मगर यांनी उपस्थित उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार याबाबत मार्गदर्शन केले.



## ज्वारीला पाणी देताना विद्युतच्या धक्क्याने दोन शेतमजूरांचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० जानेवारी -**

उमरगा तालुक्यातील बलसुर येथे ज्वारीला पाणी देत असताना विद्युत धक्क्याने दोन शेतमजुरांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी घडली.

याबाबत माहिती अशी की, येथील मोहन पेमा पवार यांच्या शेतातील विद्युत पंपासाठी विद्युत पुरवठा करण्यासाठी जमिनीवरून घेतलेल्या वायर कट होवुन त्याला असलेल्या जे वायरमध्ये विद्युत पुरवठा उतरल्याने ज्वारीला पाणी देत असताना कडदोरा येथील व्यंकट राम बालकुंदे (वय ५९) व बलसूर येथील खुर्शिद अमीनसाब बडगिरे (वय ६७) या दोन शेतमजुरांचा विद्युत धक्क्याने जागीच मृत्यु झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (दि.३०) रोजी सकाळी अकराच्या सुमारास घडली आहे.

घटनेची माहिती मिळताच महावितरनच्या कर्मचार्यांनी तात्काळ विद्युत पुरवठा खंडीत करुन घटनास्थळी पोहोचले तर उमरग्याच्या पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, सहाय्यक पोलीस निरीक्षक रामहरी चाटे, बिट अमलदार अनिल बोदमवाड आदिंनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.

## रावसाहेब दानवे यांची मा.आ. ठाकूर यांच्या घरी सदिच्छा भेट



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३० जानेवारी -**

भारतीय जनता पार्टीचे माजी प्रदेशाध्यक्ष, ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेबदानवे-पाटील यांनी आज परंडा येथे भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या संवाद निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता त्यांचे ठाकूर यांनी स्वागत करून सत्कार केला.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य गुलचंद व्यवहारे, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अ‍ॅड. जहीरभाई चौधरी, भाजपा जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, जिल्हा चिटणीस सुजित परदेशी, तालुका सरचिटणीस धनाजी गायकवाड, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. संतोष सुर्यवंशी, भाजपा परंडा शहराध्यक्ष उमाकांत गोरे, अरविंद बप्पा रगडे, अविनाश विधाते, सारंग घोगरे, राम कृष्ण घोडके, किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी पाटील, वैद्यकीय आघाडी तालुका संयोजक डॉ. आनंद मोरे, परसराम कोळी, संकेत ठाकूर, धनंजय काळे, मनोज पवार, आदर्श ठाकूर, अमर ठाकूर, साहेबराव पाडुळे, किरण देशमुख, अर्जुन कैलते, किरण कवठे, विठोबा मदने, मिलिंद शिंदे, गौरव पाटील, राज वळसंगकर, सिद्धीक हन्नुरे, अजीमभाई हन्नुरे, सुरज काळे, आकाश मदने, समाधान कोळेकर, तुषार कोळेकर, महिला मोर्चाच्या ज्योतीताई भातलवंडे, शुभदा शेलार तसेच तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सर्व सोयाबीन खरेदी होईपर्यंत केंद्र सुरु ठेवा : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**



जिल्ह्यातील सर्व नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी पूर्ण होईपर्यंत खरेदी केंद्रे सुरू ठेवावीत, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

धाराशिव जिल्ह्यात एकूण ४,६२,८७२ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पेरणी झाली होती. यंदा सोयाबीन उत्पादन सरासरी १६.९८ क्विंटल प्रति हेक्टर असून एकूण उत्पादन ७८.५९ लाख क्विंटल एवढे आहे. जिल्ह्यात ३५ हजार ४०० शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर नोंदणी केली होती, मात्र १० डिसेंबर २०२४ ते २९ डिसेंबर २०२४ या कालावधीत फक्त ९ हजार ३८० शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी झाले आहे. अद्याप सुमारे २५,००० शेतकरी सोयाबीन विक्रीच्या प्रतीक्षेत आहेत. खरेदी केंद्रावर मोठ्या प्रमाणावर वाहनांच्या २-२ किमी लांब रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी कडता आणि चाळणीच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट सुरू असल्याच्या तक्रारी मिळत आहेत.

राजस्थानमध्ये खरेदीला १४ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली, तर महाराष्ट्रासाठी फक्त ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली गेली. हा दूजाभाव का? असा प्रश्न आमदार पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना विचारला आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी खरेदी केंद्र ३१ जानेवारीनंतरही सुरू ठेवण्याची मागणी आमदार पाटील यांनी केली आहे.

### डोळ्यांची तपासणी व चष्मे वाटप कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**

रमाई जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवत डोळ्यांची मोफत तपासणी व चष्मे वाटपाचा कार्यक्रम दि.७ फेब्रुवारी आळजापुर, ता.बार्शी येथे आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचे आयोजन जयसुर्या व विकी दादा मित्रमंडळ मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. परिसरातील गरजुंनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## बायपास मार्ग सुरु; मात्र अवजड वाहनांची वाहतुक शहरातूनच !

**महामार्ग पोलिसांनी लक्ष देण्याची मागणी... शहरवासियांतून संताप**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० जानेवारी -**

सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील नळदुर्ग बायपास रस्ता वाहतुकीसाठी खुला झाला आहे. सोलापुरहुन हैद्राबादकडे जाणारी वाहने या बायपासमार्गे न जाता पुन्हा नळदुर्ग शहरातुनच जात आहेत. त्यामुळे जीवघेण्या अपघाताची टांगती तलवार नळदुर्गकरांवर कायम आहे. त्यामुळे नळदुर्गकरांनी तीव्र संताप व्यक्त केला असुन महामार्ग पोलिस विभाग आणखी कुणाचा बळी जाण्याची वाट पाहत आहे का? असा सवाल नागरीकांमधुन उपस्थित केला जात आहे.

गेल्या दहा वर्षाच्या प्रदीर्घ लढ्यानंतर दि.२७ व २८ जानेवारी रोजी सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील नळदुर्ग बायपास रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

नळदुर्ग बायपास रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला असताना आजही महामार्गावरून जाणारी वाहने ही बायपास मार्गे न जाता ती नळदुर्ग शहरातुनच जात आहेत.

त्यामुळे नळदुर्गकरांवर आजही जीवघेण्या अपघाताची टांगती तलवार कायम आहे त्यामुळे नळदुर्गकरांनी तीव्र संताप व्यक्त करुन नळदुर्ग बायपास रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्याचे दोन-दोन कार्यक्रम करणे हे नाटक होते की काय असा प्रश्न नळदुर्गकरांनी उपस्थित केला आहे.

सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर नळदुर्ग ते जळकोटपर्यंत अपघात होऊन शेकडो युवकांचा बळी गेला आहे.

त्याचबरोबर महामार्गावर नळदुर्ग ते जळकोटपर्यंत कायम वाहतुक कोंडीचा सामना नळदुर्गकरांना करावा लागत असे या सर्वाला कंटाळुन नळदुर्गकरांनी महामार्गावरील नळदुर्ग बायपास रस्ता तात्काळ वाहतुकीसाठी खुला करावा, अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊनच दि. २७ व २८ जानेवारी रोजी हा नळदुर्ग बायपास रस्ता सध्या एकेरी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

नळदुर्ग बायपास रस्ता वाहतुकीसाठी खुला झाला असल्याने आता सोलापुरहुन हैद्राबादला जाणारी सर्व वाहने या बायपास मार्गेच पुढे हैद्राबादकडे जाणार आहेत.मात्र आजही सोलापुरहुन-हैद्राबादकडे जाणारी वाहने हे नळदुर्गमार्गेच जात आहेत.

## शेतकरी आत्महत्या; प्रकरणाचा फेर आढावा घ्यावा : अनिल जगताप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**

शेतकरी आत्महत्या प्रकरणात अपात्र व प्रलंबित ठेवलेल्या प्रकरणाचा फेर आढावा घेऊन माणुसकीच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्याकडे केले आहे.



धाराशिव हा आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या खूप मोठ्या प्रमाणात आहेत. सन २०२२-२३-२४ या तीन वर्षात धाराशिव जिल्ह्यातल्या ४४० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून ३३२ प्रकरण पात्र ठरवून मदत देण्यात आली आहे. ५२ प्रस्ताव अपत्र ठरवण्यात आले असून ५६ प्रस्ताव प्रलंबित आहे. अपात्र व प्रलंबित प्रकरणाचा निपटारा तातडीने करावा व माणुसकीच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा अशी विनंती जगताप यांनी केली आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या वारसांना शासनाकडून एक लाख रुपयाची मदत दिली जाते. शेतकरी आत्महत्या हा सर्वांच्या दृष्टीने अत्यंत काळजीचा व संवेदनशील विषय आहे शासनाकडून त्यावर उपाययोजनाही चालू आहेत. धाराशिव जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा विचार केला तर त्यात पुढील कारणाने शेतकरी आत्महत्या करतात असे दिसून येत आहे.

निसर्गाचा लहरीपणा, नापिकी, कर्जबाजारीपणा, कर्ज परतफेडीचा तगादा, सिंचनाच्या अपुऱ्या व्यवस्था, शासनाकडून अवेळी मिळणारी मदत, बंद पडलेल्या शेतकऱ्याच्या आर्थिक नाड्या जसे की साखर कारखाने, दूध संघ, जिल्हा बँक त्यामुळे भांडवल अपुरे मिळते, असे जगताप यांनी सांगितले.

> जिल्हा मध्यवर्ती बँकेची झालेली हलाखीची परिस्थिती, कमी पतपुरवठा, सहकारी साखर कारखान्याची दुरावस्था, बंद पडलेला दूध संघ, सूतगिरणी इत्यादीमुळे शेतकऱ्यांना वेळेवर जिल्ह्यात पत पुरवठा होत नाही. राज्यकर्त्याकडून या संस्था केवळ राजकारणाचा अड्डा म्हणून बघण्याचा दृष्टिकोन बदलल्याशिवाय शेतकरी आत्महत्या थांबणार नाहीत मात्र शेतकऱ्यांनीही आत्महत्या करू नये कारण त्यानंतर कुटुंबाची खूप वाताहत होते याचा विचार करावा.
>
> **- अनिल जगताप,** सामाजिक कार्यकर्ते.

## दहावी व बारावी परीक्षा केंद्रसंचालक, पर्यवेक्षक अदलाबदली अखेर रद्द; पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**

फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये होत असलेल्या दहावी व बारावी परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक, पर्यवेक्षक यांच्या अदलाबदलीचे आदेश रद्द करण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य शिक्षण बोर्डाने घेतला आहे. बुधवारी (ता.२९) यासंदर्भात राज्य बोर्डाने परिपत्रक काढले असून महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या याबाबतच्या पाठपुराव्यास अखेर यश मिळाल्याची माहिती राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.

पत्रकात म्हटले आहे की, दि.१७ जानेवारी रोजी बोर्डाने एक परिपत्रक काढून दहावी-बारावी बोर्ड परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींच्या आदलाबदलीचा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे शिक्षक मुख्याध्यापक यांच्यात नाराजी पसरली होती. बुधवारी (ता.२९) राज्य शिक्षण बोर्डाने याबाबतचे परिपत्रक काढले आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या प्रयत्नांना यश मिळाले असून यामुळे परीक्षा कामातील शिक्षक, मुख्याध्यापक, शिपाई यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



राज्य शिक्षण बोर्डाच्या निर्णयाचे स्वागत नागोराव गाणार, राजकुमार बोनकिले, किरण भावठाणकर, पुजा चोधरी, राजेंद्र सूर्यवंशी, उमाकांत कुलकर्णी, गणेश पवार, दिलीप अहिरे, गुलाबराव गवळे, संजय सातपुते, सुनिल पंडितसह सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### सेवानिवृत्तनिमित्त सुरेखा कदम यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.३० जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेरे येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुरेखा कदम सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, विद्युलता टेकाळे, राजाभाऊ पडवळ, एल.बी. पडवळ, बाबा मते, संतोष देशपांडे, विश्वास शिंदे, अमर गोरे, जयश्री माळी, विक्रम लोमटे, सुधीर वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## भाई उद्धवराव पाटील यांचा सामाजिक वारसा जपावा : शशिकला घोगरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी विरोधी पक्ष नेते झुंजार सेनानी भाई उद्धवराव पाटील यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत सामाजिक व राजकीय योगदान अमूल्य आहे. आजच्या पक्ष बदलू राजकारणाकडे पाहता विरोधी पक्ष नेता असताना त्यांना मुख्यमंत्री पदाची संधी आली असतानाही जीवनभर शेतकरी कामगार पक्ष सोडला नाही. तत्वनिष्ठ राजकारण केले. भाई उद्धवराव पाटील यांचा सामाजिक वारसा जपावा, असे आवाहन कार्यक्रमाच्या अध्यक्षा शशिकलाताई घोगरे यांनी केले.



भाई उद्धवराव पाटील यांच्या जयंती व राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त गुरुवार दि.३० रोजी छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा शशिकला घोगरे यांनी बोलताना सांगितले. सदर कार्यक्रमास राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष एम.डी. देशमुख, सचिव भाई धनंजय पाटील, संस्था सदस्य निर्मला भांगे, माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, अ‍ॅड. पांडुरंग लोमटे, प्राचार्य बाळासाहेब उर्फ सूर्यकांत मुंडे, उपप्राचार्य व्हि.के. देशमुख, पर्यवेक्षक अमोल दिक्षित उपस्थित होते. सदर जयंती निमित्त प्रशालेमध्ये क्रीडा, निबंध व इतर स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

हुतात्मा दिन निमित्त मौन पाळत शहिदांना आदरांजली वाहण्यात आली.

सुत्रसंचालन एस.डी. जाधव यांनी केले. आभार आनंद वीर यांनी मानले. कार्यक्रमास प्रतिष्ठित नागरिक, पालक, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

# धाराशिव जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## वाशी तहसील प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे निराधारांची पेन्शन परत

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० जानेवारी -**

वाशी तहसील कार्यालयाच्या ढिसाळ कारभारामुळे संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना आणि इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना लाभार्थ्यांची ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्याची पेन्शन परत गेल्याची माहिती समोर आली आहे.

जाणीव संघटनेच्या वतीने तहसील कार्यालयावर निवेदन देण्यात आले होते. पेन्शन वाटप, नवीन रेशनकार्ड वितरण आणि गायरान जमिनींच्या नोंदींसह विविध मागण्या शासनाकडे पोहोचवण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

तहसीलदारांनी आठवडाभरात पेन्शन वाटपाचे आश्वासन दिल्याने संघटनेने आंदोलन मागे घेतले होते. मात्र, तीन आठवडे उलटल्यानंतरही कोणतीही कारवाई झालेली नाही. उपविभागीय अधिकारी संजय पाटील यांच्या उपस्थितीत तहसीलदार मेहत्रे यांनी आठ दिवसांत पेन्शन वितरित करू असे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात तहसील कार्यालयाच्या हलगर्जीपणामुळे लाभार्थ्यांना अद्याप पेन्शन मिळालेली नाही. यामुळे गरजू आणि निराधारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

या प्रकाराची सखोल चौकशी करून लाभार्थ्यांना तत्काळ न्याय द्यावा, अशी मागणी जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांनी केली आहे.

## ▶▶ प्रजासत्ताक दिन...



### जळकोट ग्रामपंचायतीची ग्रामसभा शांततेत

**जळकोट, दि.३० जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्रामपंचायत कार्यालयाची ग्रामसभा सरपंच गजेंद्र कदम यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालय समोर अत्यंत शांततेत पार पडली. जळकोट ग्रा.पं. कार्यालयाच्यावतीने दि.२९ रोजी बोलावण्यात आली होती. या ग्रामसभेत गावात मोकाट फिरत असलेल्या वराह प्राण्यावर निर्बंध घालण्यासाठी व रानोमाळ शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान करत असलेल्या वराहचे बंदिस्त जागेत करण्याचा ठराव घेण्यात आला. बंदिस्त वराह पालन करण्यासाठी दोन एकर जागा देण्याची तयारी असल्याचे कृष्णात मोरे यांनी जाहीर केले. तसेच डॉल्बी मुक्त मिरवणुक काढण्यात यावी व डॉल्बी मुक्त गाव करण्यात यावे असा ठराव समोर आला. त्याचबरोबर महसूल विभागाशी निगडित असलेल्या ई पीक पाहणी तलाठी कार्यालय स्तरावर दि.१५ फेब्रुवारी २५ पर्यंत शेतकऱ्यांनी करण्याचे जळकोटचे तलाठी महादेव गायकवाड यांनी ग्रामसभेत सांगितले. आरोग्य बाबतच्या प्रश्नावर वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण कुंडले यांनी शंकाचे समाधान केले.

### सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

**नळदुर्ग, दि.३० जानेवारी -**

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा, विद्यार्थी सर्व गुणसंपन्न व्हावा, विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळावी म्हणुन वसंतनगर येथील जि.प. प्राथमिक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात या सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेतील इयत्ता पहिली ते पाचवी मधील ७३ मुले आणि ९४ मुली अशा १६७ विद्यार्थ्यांनी १०० टक्के सहभाग नोंदविला हे विशेष. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भानुदास रामा राठोड हे होते. तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक ईश्र्वर नागरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, चेअरमन सुनील सुर्यवंशी, प्राध्यापक संतोष पवार, विलास येडगे, विनायक अहंकारी, सुर्यकांत चव्हाण, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ पवार हे उपस्थित होते. या बहारदार कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक विकास कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार शाळेचे सांस्कृतिक विभाग प्रमुख दयानंद सोनवणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षक हरीदास सुरवसे, श्रीकृष्ण कुलकर्णी, अविनाश राठोड, शिक्षिका वंदना वाघमारे, नेहा कुंभलकर, रविना राठोड यांनी परीश्रम घेतले.



### हळदी-कुंकू कार्यक्रम समारंभ संपन्न

**तुळजापूर, दि.३० जानेवारी -**

तुळजापूर शहरातील पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश विश्वनाथ पुजारी यांच्या परिवारातर्फे आयोजित मकर संक्रांती निमित्त हळदी-कुंकू कार्यक्रमास शहरातील महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यशस्वीपणे पार पडला. हितगुज करुया मिळून साऱ्याजणी, हळदी कुंकू लेऊया हक्काच्या स्वअंगणी या उक्तीप्रमाणे स्त्रियांनी एकत्र रहावे सुखी संवाद घडावा यासाठी शुभांगी गणेश पुजारी, सुनंदा विश्वनाथ पुजारी यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी महादेवी पुजारी, सानिका पुजारी, प्रमिला पुजारी, दीपाली पुजारी, स्नेहा मोरे, नीता पुजारी, संगीता पुजारी, अश्विनी मोटे, डॉ. प्रिया पाटील, सुमन पुजारी, अनिता अमृतराव, गायत्री अमृतराव, मनीषा छत्रे, जयश्री छत्रे, दीपाली जाधव, अरुणा पुजारी, तुळसा पुजारी, अश्विनी धनके, नंदिनी कोळगे आदी महिलांची उपस्थित होत्या.

## नूतन पालकमंत्री प्रताप सरनाईकांकडून वचनपूर्ती...

# जिल्ह्याला नव्या कोऱ्या २५ बसेसची भेट

### ▶▶ मुंबई, पुणे, कोल्हापूर, हैदराबाद, छ. संभाजीनगर, धुळे, नाशिक या ठिकाणी धावणार बसेस

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**

राज्याचे परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी जिल्ह्याला नवीन २५ कोऱ्या बसेस मिळाल्या आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीद वाक्य घेऊन काम करणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळाला सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी मोठा दिलासा मिळाला आहे.

जिल्ह्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (चडठढउ) नव्या कोऱ्या २५ बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत.या बसेसच्या समावेशामुळे प्रवाशांना अधिक चांगली,आरामदायी आणि सुरक्षित वाहतूक सेवा मिळणार आहे. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये प्रवासासाठी एस.टी. बसेस हाच मुख्य पर्याय आहे.गेल्या काही वर्षांमध्ये अनेक जुन्या बसेस बंद पडल्या होत्या.त्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता.नव्या बसेस आल्याने प्रवाशांची गैरसोय दूर तर होणार आहेच सोबत वाहतूक सेवा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. या सर्व २५ बसेस बीएस -६ अत्याधुनिक सोयींनी युक्त असून ह्या बसेस अशोक लेलँड कंपनीच्या आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सुलभ व आरामदायी आसने आणि आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज आहेत. इंधन कार्यक्षमतेवर भर देऊन या बसेस पर्यावरणपूरक बनवण्यात आल्या आहेत. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या धाराशिव आगाराला प्राप्त झालेल्या बसेसचे योग्य नियोजन करण्यात आले असून,त्या मुख्यतः मोठया शहरांकडे धावणार आहेत.धाराशिव आगारासाठी १० बसेस देण्यात आल्या आहेत.

धाराशिव ते मुंबई वेळ सकाळी ७ वाजता, धाराशिव-बोरिवली वेळ सकाळी ९ वाजता, धाराशिव-हैदराबाद वेळ सकाळी ७.३० वाजता दोन बसेस, धाराशिव ते पुणे वेळ सकाळी ६ वाजता, सकाळी ८ वाजता आणि दुपारी २ वाजता, धाराशिव-कोल्हापूर सकाळी ६ वाजता सुटणार आहे. तुळजापुर आगारासाठी १० बसेस देण्यात आल्या आहेत. तुळजापुर ते संभाजीनगर सकाळी ५.३० वाजता, सकाळी १०.३० वाजता, तुळजापूर-सोलापूर-पुणे सकाळी ७.३० वाजता व सकाळी ११.३० वाजता, तुळजापूर -धुळे सकाळी ८.३० वाजता व सायंकाळी ६ वाजता,तुळजापूर- नाशिक सकाळी ६ वाजता व सकाळी ८.३० वाजता आणि कळंब आगारासाठी ०५ बसेस देण्यात आल्या आहेत. कळंब ते बोरीवली वेळ दुपारी ४.३० वाजता, कळंब-बार्शी-पुणे सकाळी ८.३० वाजता आणि ९ वाजता, कळंब-छत्रपती संभाजीनगर सकाळी ६.३० वाजता ह्या बसेस चालवण्यात येणार आहेत. त्यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. जिल्ह्याला पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या पुढाकारातून नव्या बसेस मिळाल्याने जिल्ह्यातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.




अनेक प्रवासी गेल्या काही महिन्यांपासून अधिक बसेसची मागणी करत होते.

आता या नव्या बसेस आल्याने प्रवास अधिक सुलभ व लवकर होण्यास मदत होणार आहे.

## बायपास रस्त्यामुळे वाहतुक कोंडी सुटणार : आ. राणाजगजितसिंह पाटील



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० जानेवारी -**

सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील नळदुर्ग बायपास रस्ता एकेरी वाहतुकीसाठी खुला करण्यात आल्याने नळदुर्गकरांची जीवघेणे अपघात व वारंवार होणाऱ्या वाहतुक कोंडीपासुन सुटका होण्यास मदत मिळणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी हा बायपास रस्ता वाहतुकीसाठी खुला करतांना म्हटले आहे.

दि.२८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील नळदुर्ग बायपास रस्ता आमदार राणाजगजितसिंह पाटील व नागरीकांच्या हस्ते वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. यावेळी वाहन चालक व सियुसी कंपनीच्या अभियंत्याचा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी भाजपचे राज्य कार्यकारीणी सदस्य नितीन काळे, सुशांत भुमकर, उदय जगदाळे, नय्यर जहागीरदार, बसवराज धरणे, शफीभाई शेख, निरंजन राठोड, भाजपचे जिल्हाउपाध्यक्ष विलास राठोड, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, भाजपचे तालुका सरचिटणीस श्रमिक पोतदार, छमाबाई राठोड, धीमाजी घुगे, पद्माकर घोडके, पांडुरंग पुदाले, अक्षय भोई, दीपक घोडके, दत्ता राजमाने, शिवाजी सुरवसे, मनोज मिश्रा, संजय जाधव, नाना काजी यांच्यासह भाजप व शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलतांना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले की, विधानसभा निवडणुकीत केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे नळदुर्ग येथे आल्यानंतर त्यांना गेल्या दहा वर्षांपासुन रखडत पडलेल्या सोलापुर-हैद्राबाद महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासंदर्भात माहिती देण्यात आली होती. त्यावेळी ना. गडकरी यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सक्त सुचना देऊन हे काम लवकर पुर्ण करून घेण्याचे आदेश दिले होते.

त्यानंतरच खऱ्या अर्थाने या कामाला वेग आला आणि आज हा नळदुर्ग बायपास रस्ता एकेरी वाहतुकीसाठी खुला करण्यात आहे. हा बायपास रस्ता एकेरी वाहतुकीसाठी खुला करण्यात आल्याने आता नळदुर्गकरांची वाहतुक कोंडी पासुन सुटका होणार आहे. त्याचबरोबर गेल्या कांही दिवसात या महामार्गांवर मोठ्या प्रमाणात अपघात होऊन जीवितहानी झाली आहे. आता यालाही आळा बसणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीत रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षात देशात मोठ्या प्रमाणात नॅशनल हायवेचे काम करण्यात आले आहे. आपल्या संपुर्ण जिल्ह्यात नॅशनल हायवेचे नेटवर्क झाले आहे आणि आजही होत आहे. नळदुर्ग बायपास रस्ता लवकरच पुर्ण क्षमतेने वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याचेही आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा सुशांत भुमकर नागरीकांच्यावतीने नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी नाना काजी यांनीही आमदार पाटील यांचा सत्कार केला. कार्यक्रमानंतर आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी गोलाई ते मुर्टा पाटीपर्यंतच्या नळदुर्ग बायपास रस्त्याची पाहणी केली.

## लोकसहभागातून समशानभूमीतील बसवलेल्या बाकडाचे अश्विनी भोसले यांच्या हस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० जानेवारी -**

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे लोकसभावातून गोळा केलेल्या बैठकीचे कट्टाचे उदघाटन अश्विनी भोसले पोलीस निरीक्षक उमरगा, भागीरथी भरत पवार व ज्येष्ठ नागरिक संतराम पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी सरपंच शेखर घंटे, पोलीस पाटील हेमंत पाटील, राजेंद्र चव्हाण, प्रेमनाथ सूर्यवंशी, भरत पवार, श्रीधर सांगवे, लिंबराज सोमवंशी, मुक्ताजी जगताप, अमोल चव्हाण, खंडू पवार, संजय पवार, मुस्तफा चौधरी, अमोल पवार, शंकर पांचाळ, भीमाशंकर माळी, नितीन कुलकर्णी, नागेश घंटे, आकाश पवार, विकीन सांगवे, गणेश कोकाटे, शिवाजी पवार, भरत मुगळे, विकास सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

गावातील प्रत्येक भागाची आपण सफाई करतो स्वच्छता ठेवतो पण जिथे आपला शेवट होतो अशा ठिकाणाकडे आपण दुर्लक्ष करतो असे म्हणत गावातील डॉ. उमाकांत पवार, दत्तात्रय गंडाळे, विठ्ठल चिकुंद्रे, अमोल चव्हाण स्मशानभूमीची स्वच्छता करून लोकसहभागातून बाकडे जमा करून बसवण्याचा संकल्प केला होता.

या संकल्पाला गावातील दानशूर व्यक्तींनी हातभार लावून तब्बल ३० बाकडे जमा झाली होती.

## शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढुन घ्यावे : तहसीलदार निलेश काकडे

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३० जानेवारी -**

परंडा तालुक्यातील शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावे, असे तहसिलदार निलेश काकडे यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना आव्हान केले आहे.

ऍग्री स्टॅक योजने अंतर्गत माहिती संच निर्मिती आणि शेतकऱ्यांचे शेतकरी ओळखपत्र क्रमांक तयार करण्याची कार्यवाही परंडा तालुक्यात ऍग्री स्टॅक योजने अंतर्गत डेटा आणि डिजिटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहोचविण्याच्या दृष्टीकानातून शेतकरी माहिती संच तयार करण्यात येणार असून शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक तयार करण्यात येणार आहेत, असे काकडे यांनी सांगितले.

## शासकीय महिला रुग्णालयातील वैद्यकीय कर्मचारी, अधिकाऱ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**

शासकीय महिला रुग्णालय धाराशिव येथे जिल्ह्यातीलच नव्हे तर पर जिल्ह्यातील देखील गरोदर माता डिलिव्हरी साठी येतात. त्यांना चांगल्या प्रकारची आरोग्य सुविधा पुरविण्यात येऊन डिलीव्हरी चांगल्या प्रकारे करतात. आरोग्य उपचार व आरोग्य सुविधा चांगल्या पद्धतीने दिल्याबद्दल रुग्ण कल्याण समिती धाराशिव यांच्या वतीने या कर्मचाऱ्यांचा शाल व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

शासकीय रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक धनंजय चाकुरकर, तालुकास्तरीय बाल संरक्षण समिती तथा इथिकल कमिटी सदस्य गणेश वाघमारे, आरोग्य मित्र शेख रौफ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कार केल्याबद्दल महिला रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षका डॉ. स्मितातार्इ गवळी यांनी सन्मानीत केल्याबद्दल रुग्ण कल्याण समिती व जिल्हा शल्य चिकित्सक यांचे आभार मानले.



यावेळी जिल्हा शिल्लक चिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर, वैद्यकीय अधीक्षका, सर्जन डॉ. स्मितातार्इ गवळी, इथिकल कमिटी सदस्य गणेश वाघमारे, आरोग्य मित्र शेख रऊफ, डॉ. राहुल वाघमारे, डॉ. बाळासाहेब घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

## छोटी जाहिरात...

### हरवले आहे

**अशोक गोपीनाथ राठोड** वय ३२ वर्षे, रा. पळसगाव ता. उमरगा, जि. धाराशिव यांचे आधार कार्ड, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र क्र.२००१/पुनवर्सन/कावि १२६ चिंचोली पळसगाव साठवण तलाव प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे उमरगा ते पळसगाव प्रवासादरम्यान हरवली आहेत. कोणास सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क. ९२८४८९३२५६**

## गोसेवेतूनच रामराज्य येईल : उपेंद्र कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**

गो-आधारित जीवन पद्धतीकडे वळून मानवी जीवन आरोग्यदायी करता येते, ज्यामुळे रामराज्य येईल.रामराज्य आणायचे असेल तर गोसेवा करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय सेवा कार्यप्रमुख उपेंद्र कुलकर्णी यांनी केले. ते धाराशिव इथे गो-विज्ञान संशोधन संस्था आणि दादरा नगर हवेली मुक्ती संग्राम समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्रद्धेय मोरोपंत पिंगळे गोसेवा पुरस्कार वितरण कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर आमदार राणाजगजितसिंह पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक ॲड. रवींद्र कदम, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ग्रामविकास विभागाचे अनिल व्यास अतुल अजमेरा आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपेंद्र कुलकर्णी पुढे म्हणाले की घरातलं वातावरण आरोग्यदायी राहावं यासाठी प्रत्येक घरात गोसेवा होण्याची गरज आहे. आनंददायी जीवन पद्धतीसाठी घराघरात गोमूत्र अर्क तसेच गायीच्या गोमूत्र आणि शेणा पासून तयार करण्यात आलेल्या विविध औषधी या वापरल्या गेल्या पाहिजेत तरच गाईचे महत्त्व प्रत्येक घरापर्यंत पोहोचवता येईल असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात नागपूर इथल्या डॉक्टर प्रकाश रामभाऊ विटणकर यांना गोविज्ञान संशोधन संस्थेचा श्रद्धेय मोरोपंत पिंगळे गोसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपये रोख शाल श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तर सोलापूर इथल्या ज्ञानेश्वर मधुकर साठे यांना द्वितीय आणि धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळा येथील महेश जमाले परंडा तालुक्यातील अंकुश नाळे तुळजापूर तालुक्यातील धनाजी धोतरकर आणि उमरगा तालुक्यातील ओमप्रकाश घाटे यांनाही हे गोसेवा पुरस्कार यावेळी मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

या पुरस्कारानंतर डॉक्टर प्रकाश विटणकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना भारताला विश्वगुरू बनवण्यासाठी गोसेवा करत असताना आयुर्वेदात सांगितलेलं पंचगव्य आणि गोमूत्रापासून तयार झालेल्या विविध औषधी यांचा वैज्ञानिक दृष्ट्या स्वीकारणारी नवी पिढी तयार होण्याची गरज आहे असे सांगितले.



तर ज्ञानेश्वर साठे यांनी पंचगव्य अर्क तयार करून कॅन्सरवर औषधे तयार करून देत असून गोमूत्रापासून गोमूत्र नस्य गोमूत्र अर्क यामुळे कुठलही औषध घेण्याची गरज नाही मानवाला पर्यावरणाला देशी गाय तारू शकते भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा गोमाता असून आज आपण गाईपासून दूर गेलो असल्यामुळे रामराज्य आणायचे असेल तर गोसेवा करण्याची पुन्हा गरज आहे, पुन्हा एकदा सर्वांनी गायीकडे वळण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. रवींद्र कदम यांनी केले त्यात त्यांनी गोसेवेपासून शेतकरी दूर जात असल्यामुळेच शेतकरी आत्महत्येच्या संख्येत वाढ होत असल्याचे निदर्शनास आणून दिले, ज्याच्या शेतात आणि दारात गाय आहे त्याला त्याचे जीवन आनंदी सुखकर आणि घराचे आणि शेताचे अर्थचक्र सुरळीत ठेवता येते असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी गोमाता, भारत माता आणि श्रद्धेय मोरोपंत पिंगळे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी चव्हाण यांनी केले.

कार्यक्रमाला जिल्हाभरातील गोशाळा चालक तसेच सेंद्रिय शेतीवर आधारित शेती करणारे शेतकरी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२५/भुसुधार/कुळ/कावि — दिनांक २९/०१/२०२५

प्रस्तुत जाहीर प्रगटणाव्दारे सर्व जनतेस जाहिररीत्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. सागर गौतम करडे, रा. वहिणा. ता. परंडा, जि. धाराशिव** यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे दहिटणा, ता. परंडा येथील जमीन **सर्व्हे/गट नंबर १७८** या गटातील त्यांच्या नावे असलेले **क्षेत्र ०१ हे. ०७ आर, आकार ०१ रु. ९४ पैसे** चे जमीन क्षेत्र देशमुख मदतमात्र इनाम या भोगवटदार वर्ग २ जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतर करण्यासाठी या कार्यालयास **दिनांक २९/०१/२०२५** रोजी अर्ज दिला आहे.

तरी अर्जदार श्री. सागर गौतम करडे, रा. दहिटणा, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून मौजे दहिटणा, ता. परंडा येथील जमीन सर्व्हे/गट नंबर १७८ या गटातील त्यांच्या नावे असलेले क्षेत्र ०१ हे. ०७ आर, आकार ०१ रु. ९४ पैसे थे जमीन क्षेत्र देशमुख मदतमान इनाम या भोगवटदार वर्ग २ जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतर करण्या बाबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणाऱ्या व्यक्तीचा सदरच्या कार्यवाहीस काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटण प्रसिध्द झाल्यापासून (१५) दिवसांचे आत लेखी स्वरूपात संबंधीत ग्राम महसूल अधिकारी आसू यांच्या कार्यालयात किंवा तहसिल कार्यालयात किंवा मा. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचे कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे जमीन क्षेत्राचे भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतर करण्यासाठी कुणाचाही आक्षेप/उजर/तक्रार नाही असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित /-**
**(निलेश काकडे)**
**तहसीलदार**
**परंडा**

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेत लातूर विभागाचा डंका

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय ज्युनिअर व युथ व्हॉलीबॉल स्पर्धेत लातूर विभागाच्या मुला-मुलींच्या चार संघांनी सहभाग नोंदविला होता. यात १८ वर्षे मुलींच्या तर २१ वर्षे मुलांच्या टीमने विजेतेपद पटकाविले, तर १८ वर्षे मुलांचा संघ उपविजयी ठरला. त्यामुळे या राज्य स्पर्धेत लातूर विभागाचा डंका वाजला.

महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशनच्यावतीने नागपूर येथे झालेल्या खासदार चषक व्हॉलीबॉल स्पर्धेत लातूर विभागाच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करीत यश मिळविले. यात लातूरसह धाराशिव, नांदेड व बीड जिल्ह्यांतील खेळाडूंचा समावेश होता. १८ वर्षे मुलींच्या विजेत्या संघात श्रावणी पवार, श्रावणी जिरे, तृप्ती माने, सानिका वाठवडे, मानसी बागल, उत्कर्ष पाटील, प्रीती माने, भक्ती नाईकवाडी, समीक्षा जिरे, मेहरा सय्यद, प्रतीक्षा कानवटे, भक्ती काडवदे यांचा समावेश होता.

तर २१ वर्षे विजेत्या मुलांच्या संघात प्रथमेश गंगणे, निर्भय देशमुख, सुमित जाधव, यासिन सय्यद, मुजाहिद सय्यद, गणेश जिंकलवाड, ओमेज पठाण, ऋषिकेश डोंगरे, वैभव इरमलवार, अर्शान सय्यद, शेहराज खान, आफताब कुरेशी तर उपविजेत्या १८ वर्षे मुलांच्या संघात ओमकार सोमवंशी, पार्थ गंगणे, पीयूष लामतुरे, फरदीन अहमद शेख, बागवान जाकीर, कार्तिक संबेराव, मोहंमद साजेद, सय्यद जमीर, जावेद शेख, शहानवाज शेख, समीर सय्यद, अयाजखान पठाण यांचा समावेश होता. प्रशिक्षक म्हणून संजय देशमुख, शारेक शेख, शैलेश पाचभाई यांनी काम पाहिले. या विद्यार्थ्यांचे अनेकांनी कौतुक केले.



### संक्षिप्त वृत्त...

## लातूर शहरातील नागरिक ठरवणार मनपाचे बजेट !

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** शहर महानगरपालिकेच्या वतीने सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५- २६ चे मूळ अंदाजपत्रक तयार केले जात आहे. अंदाजपत्रक तयार करताना लातूरकरांच्या मनात काय आहे? हे जाणून घेत त्यांच्या सूचनांचा अंतर्भाव त्यात केला जाणार आहे. यासाठी नागरिकांनी सूचना पाठवाव्यात, असे आवाहन मनपाने केले आहे.

अंदाजपत्रकात नागरिकांचा सहभाग असावा, या हेतूने मनपा गेल्या काही वर्षापासून हा उपक्रम राबवत आहे. शहरातील नागरिक, सामाजिक संघटना, ज्येष्ठ नागरिकांनी सूचना पाठवाव्यात, असे मनपाला अपेक्षित आहे. मनपाच्या उत्पन्नात वाढ, खर्चात बचत, सेवा- सुविधांमध्ये सुधारणा तसेच शहराच्या विकासात्मक दर्जात वाढ करण्यासाठी नागरिक सूचना करू शकतात. शहरातील नागरिक आपल्या सूचना व अभिप्राय मनपाच्या acdplmcgmail.com या मेलवर तसेच मनपाच्या मुख्य कार्यालयात लेखा विभागात ठेवलेल्या सूचनापेटीत टाकू शकतात. ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नागरिक सूचना पाठवू शकतात, असे आवाहन महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## लातूरच्या स्त्री रुग्णालयाने पटकावले राज्यात तृतीय स्थान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत देण्यात आलेल्या सेवा सुविधांचे दर महिन्यास राज्यस्तरावर मूल्यमापन होते. त्यात लातूरच्या स्त्री रुग्णालयाने राज्यात तृतीय क्रमांक मिळविला आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गतच्या माता व बालकांचे आरोग्य, कुटुंब कल्याण कार्यक्रम, गरोदर मातांच्या सुविधा, बालकांच्या आरोग्य सेवा आदी बाबींची पडताळणी करण्यात येते. दर महिन्यास मूल्यमापन करुन त्याचा अहवाल देण्यात येतो. नोव्हेंबर महिन्याचा अहवाल नुकताच प्राप्त झाला आहे. त्यात लातुरातील स्त्री रुग्णालयाने ८१ गुण मिळवून राज्यात तृतीय स्थान पटकाविले आहे. त्याबद्दल वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे. लातुरातील स्त्री रुग्णालय शंभर खाटांचे आहे. उपलब्ध मनुष्यबळावर अधिकाधिक व दर्जेदार आरोग्य सेवा देण्याचा प्रयत्न आहे, असे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रवींद्र भालेराव म्हणाले.

## सावित्रीबाई फुले विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** सावित्रीबाई फुले महानगरपालिका शाळा क्र. ९ मंठाळे नगर येथील इयत्ता पहिली ते दहावी विद्यालयाचा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त उपदक्षता अधिकारी प्रा. डॉ. के. एन. अंबाड यांना निमंत्रित करण्यात आले होते.

या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक शिवदासराव शिंदे व त्यांचे सर्व शिक्षक,शिक्षेत्तर कर्मचारी,पालक, शालेय समितीचे अध्यक्ष व सदस्य हजर होते.या प्रसंगी सर्व प्रथम राज्य घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून पूजन करण्यात आले. नंतर प्रमुख पाहुणे के. एन. अंबाड यांचे हस्ते झेंडा फडकवून त्यास वंदन करून राष्ट्रगीत गाण्यात आले. त्यानंतर इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने प्रजासत्ताक दिनाचे महत्व यावर भाषणे केली. नंतर विद्यार्थ्यांनी कवायत व विविध गुण दर्शनाचे कार्यक्रम सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळविल्या. विविध कवायत प्रकारात अ गटात इयत्ता तिसरीस व ब गटात इयत्ता आठवीस प्रथम क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले. मान्यवरांचे हस्ते विजेत्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र तसेच सहभागी विद्यार्थी यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

प्रजासत्ताक दिन कार्यक्रमास लाभलेले पाहुणे अंबाड यांचे स्वागत मुख्याध्यापक शिंदे सर यांनी पुष्पहार व बुके आणि सन्मान चिन्ह देवून केले. कार्यक्रमाचे संचलन माया कांबळे सहशिक्षिका व प्रतिभा गुडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यास श्रीमती शेख समिना,प्रतिभा गुडे,नंदा पुळकुठे, संगीता घोणसे आदिंनी परिश्रम घेतले.

## श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सवाची गौरवशाली परंपरा वृध्दींगत करावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्यावतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधुन यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी या महोत्सवाचे ७२ वे वर्ष असून गेल्या सत्तर वर्षात यात्रा महोत्सवाने गौरवशाली परंपरा उंचावत नेलेली आहे. यापूढील काळात ही परंपरा अधिक वृंध्दीगत करण्यासाठी विश्वस्तांसह शिवभक्तांनी योगदान देऊन यात्रा महोत्सवाचा नावलौकीक संपूर्ण देशभरात करावा असे आवाहन देवस्थानचे जेष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांनी केले आहे.

लातूर शहरातील श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्यावतीने आयोजीत करण्यात येणाऱ्या यात्रा महोत्सवाच्या पुर्व तयारीसाठी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्या अध्यक्षतेखाली देवस्थान सभागृहात बैठक पार पडली. याप्रसंगी विक्रम गोजमगुंडे बोलत होते. या बैठकीस विश्वस्त अशोक भोसले, बाबासाहेब कोरे, नरेशकुमार पंड्या, सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह बिसेन यांच्यासह शहरातील प्रतिष्ठीत नागरीक व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सवाचे आकर्षण मोठ्या प्रमाणात असून लातूर जिल्हयासह पर जिल्हयातील व कर्नाटक राज्यातील भाविक व नागरीकांची मोठया प्रमाणात गर्दी असल्याचे सांगुन विक्रम गोजमगुंडे यांनी या यात्रा महोत्सवाने गौरवशाली परंपरा जोपासली असल्याचे सांगीतले. गत ७० वर्षात यात्रा महोत्सवाने वेगवेगळे उपक्रम राबवून यात्रा महोत्सवाचे आकर्षण वाढवले आहे.

यात्रा महोत्सव यशस्वी व्हावा यासाठी विश्वस्तांसह शहरातील शिवभक्त व नागरीक नेहमीच पुढाकार घेतात. याही वर्षी यात्रा महोत्सव अधिक नाविन्यपूर्ण व्हावा आणि लोकउपयोगी उपक्रम या माध्यमातून राबवीले जावेत यासाठी सर्वांच्याच सहकार्याची गरज असल्याचे सांगीतले. हा यात्रा महोत्सव आपल्या सर्वांचाच असून सर्वांनी मिळून अधिक उत्साहाने योगदान दिल्यास या यात्रा महोत्सवाची गौरवशाली परंपरा वृंध्दीगत होणार आहे. श्री सिध्देश्वर मंदिर परीसराचा अधिकचा विकास व्हावा आणि यात्रा महोत्सव यशस्वी होवून त्याचा नावलौकीक देशभरात होण्यासाठी शासन व प्रशासन सहकार्य करणारच आहे मात्र शासन आणि प्रशासना सोबत लोकसहभागही तितकाच महत्वाचा असून हा सहभाग वाढविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रीतपणे योगदान द्यावे,असे आवाहन विक्रम गोजमगुंडे यांनी यावेळी केले.



देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी यात्रा महोत्सव यशस्वी होण्यासाठी विश्वस्त यांच्यासह शिवभक्त व नागरीकांनी ज्या ज्या सुचना दिलेल्या आहेत त्याचा योग्य विचार करुन त्या अमलात आणण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करेन अशी ग्वाही दिली.

## शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** रॉयल एज्युकेशन सोसायटी संचलित शारदा सेमी इंग्लिश स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे, डॉ वैशाली ताई पाटील तसेच रॉयल एज्यूकेशन सोसायटीचे सचिव भार्गव पाटील सर, कार्यक्रमाचे अध्यक्ष शारदा सेमी इंग्लिश स्कुल चे प्राचार्य लक्ष्मणपूरी, शाळेच्या मुख्य समन्वयीका अनघा पाटील, पालक प्रतिनीधी म्हणून लाभलेले पोलीस हेड कॉन्स्टेबल गौस पाशा मणियार आदी मान्यवर उपस्थित होते.

शारदा सेमी इंग्लीश स्कूल चे ध्वजारोहन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. वैशाली पाटिल यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी इतर मान्यवर उपस्थीत होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक उषा गुड्डे यांनीकेले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी कदम यांनी केले, तर आभार वैभवी हंचाटे यांनी केले.

यावेळी शारदा सेमी इंग्लिश स्कूल मधून काही विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. मनोगत व्यक्त करणाऱ्या तसेच वेशभूषेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र मान्यवरांच्या हस्ते देवून सम्मानीत करण्यात आले. तसेच नृत्य सादर केलेल्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देवून, मान्यवरांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.

## विवेकानंद चषक :भव्य व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व खेलो भारत, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वामी विवेकानंद चषक २०२५ भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा शानदार समारोप झाला. ही स्पर्धा २७ व २८ जानेवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्‌घाटन अभाविप लातूर विभाग संघटन मंत्री अजित केंद्रे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमुख उपस्थितीत प्रदेश सहमंत्री सुशांत एकोर्गे, महानगर मंत्री तेजुमई राऊत, महानगर खेलो भारत संयोजक प्रतिक बारबोले, ज्ञानेश्वर बिरादार, ऋत्विक मोरे व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यात खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण होते, तर प्रेक्षकांनी देखील मोठ्या संख्येने हजेरी लावली.



अंतिम सामना थरारक, दयानंद कला महाविद्यालय संघाचा विजय स्पर्धेतील अंतिम सामना अत्यंत चुरशीचा ठरला. दयानंद कला महाविद्यालय संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम पारितोषिक पटकावले, तर महाराष्ट्र महाविद्यालय किल्लारी संघाने उत्तम कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. दोन्ही संघांमध्ये रंगतदार लढत पाहायला मिळाली. स्पर्धेतील विजयी संघांना रोख बक्षिसे व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. प्रथम विजेत्याचा मान दयानंद कला महाविद्यालय संघाने पटकावला.

## गवई राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्काराने सन्मानित केल्याने जबाबदारी वाढली असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.

भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष अंबादास शिंदे व छत्रपती शिवरायांचे तेरावे वंशज तथा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष फत्तेसिंह राजे भोसले यांच्या मार्गदर्शनातून राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्कार श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांना दलित पँथरचे राज्य उपाध्यक्ष डी. एस. नरसिंगे यांच्या हस्ते सहकुटुंब शाल, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि पुष्प गुच्छ देऊन नुकताच प्रदान करण्यात आला यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

हा पुरस्कार वितरण सोहळा श्रावस्ती बुद्ध विहार, विक्रम नगर, लातूर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड हे उपस्थित होते तर विचारमंचावर देविदास बाबा आचार्य, डॉ. विजय अजनीकर, सुजाता अजनीकर, व्ही. एम. भोसले, विलास घारगावकर, प्रा. शिवशरण हावळे, रणजीत आचार्य, डॉ. राहुल डोंबे, सुनील मांदळे, रुपेश गायकवाड, राहुल कांबळे, कुसुम बानाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि विश्व मानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी पंचशील गायक मंडळ, बुधोडा येथील महेंद्र गडेराव, माया गडेराव व चमुनी बुद्ध भीम गीते गाऊन उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. संजय गवई म्हणाले की, सामाजिक कार्याची मनस्वी तळमळ असल्याने मी सातत्याने कार्य करीत राहिलो. अहंकार न बाळगता माणसे जोडत राहिलो. त्यामुळे सामाजिक चळवळीमध्ये जीवाभावाचे अनेक मित्र, सहकारी तयार झाले असे ते म्हणाले.

## शाळांनी विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासाकडे लक्ष द्यावे :सौताडेकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** प्रत्येक शाळांनी संख्यात्मक विकासाबरोबर विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन इतिहासाचे अभ्यासक तथा साहित्यिक विवेक सौताडेकर यांनी केले.

लातूर येथील ज्ञानरचना इंटरनॅशनल स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाच्या, उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना सौताडेकर म्हणाले, विद्यार्थ्यांचा विकास हा दोन प्रकारचा असतो एक संख्यात्मक आणि दुसरा गुणात्मक. हल्ली संख्यात्मक विकासासाठी जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे.

गुणात्मक विकासाकडे लक्ष दिल्यानंतर विद्यार्थी भविष्यात उत्कृष्ट कलावंत, संशोधक, वैज्ञानिक, खेळाडू, साहित्यिक, संगीततज्ज्ञ होऊ शकतील. परंतु दुर्भाग्याने गुणात्मक विकासाकडे कुणाचेही लक्ष नाही.

याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. व्यंकट दंतराव, उद्‌घाटक म्हणून मनपा माजी बांधकाम सभापती गिरीश पाटील तर प्रा. प्रशांत सूर्यवंशी, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, विशाखा राजुरे आदींची उपस्थिती होती. सौताडेकर पुढे म्हणाले की, गुणात्मक विकास हा केवळ स्नेहसंमेलने घेतल्याने पूर्ण होणार नाही तर त्यासाठी त्याचे दैनंदिन निरीक्षण होऊन त्याच्यातील कलागुण आपणास हेरता आले पाहिजे आणि त्याला प्रोत्साहन देता आले पाहिजे.तेव्हाच पुढच्या पिढीत अभिजात कलावंत तयार होतील.

## विद्यार्थ्यांनी नंदादीप सारखे ज्ञानाचा प्रकाश देणारे दीप बनले पाहिजे : देडे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** प्रत्येक विद्यार्थ्यांनी दिव्याप्रमाणे तेवत राहून ज्ञानाचा प्रकाश देणारे नंदादीप बनले पाहिजे असे एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी

साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील नंदादीप माध्यमिक विद्यालय व साने गुरुजी बाल विकास केंद्राच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलताना केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपला अभ्यास करून शैक्षणिक गुणवत्ता वाढवताना मोबाईल सारख्या आधुनिक साधनांचा मर्यादित वापर केला पाहिजे जेणे करून पारंपारिक व आधुनिक साधनांची जोड मिळेल. नंदादीप माध्यमिक विद्यालयाच्या परिसरातील स्व. श्यामराव (दादा ) माने खुल्या सभागृहात आयोजीत करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी जी.टी. माने तर प्रमुख पाहुणे दामिनी पथकाच्या प्रमुख पवार एम. एल., संस्था सचिव कालिदासजी माने, संस्था संचालिका सुरेखाताई माने, प्राथमिक विभागाच्या प्रशासकीय अधिकारी उषा आडे, नंदादीप माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनिवास राऊत तथा साने गुरुजी बाल विकास केंद्राच्या प्रमुख भगत वर्षा उपस्थीत होते.

## स्पर्धा कालावधीतच शिष्यवृत्ती परीक्षा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेतल्या जाणाऱ्या पाचवी, आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. ९ फेब्रुवारी रोजी एकाच दिवशी परीक्षा घेण्यात येणार आहे. मात्र, याचवेळी क्रीडा, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षेची तयार करण्याऐवजी क्रीडा स्पर्धेचे नियोजन करावे लागत आहे.

पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा ९ फेब्रुवारी रोजी एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन ६ ते ९ फेब्रुवारी दरम्यान केले असून, यामध्ये विविध क्रीडा प्रकार होत आहेत. मात्र, ऐन शिष्यवृत्ती काळातच स्पर्धा असल्याने विद्यार्थ्यांच्या तयारीवर परिणाम होणार आहे. शिक्षकांनाही परीक्षेचे नियोजन करावे लागते. त्यामुळे स्पर्धा शिष्यवृत्ती परीक्षा झाल्यावरच घ्याव्यात, अशी मागणी होत आहे.

## लातूरच्या प्रगतीचा वाट कायम राखण्यासाठी निधी उपलब्ध करून द्याः आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३० जानेवारी -** आ. अमित देशमुख यांनी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची मुंबई येथे भेट घेतली. लातूरचे पालकमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे स्वागत करून अभिनंदन केले. नव्या उमेदीच्या नेतृत्वाकडे प्रगतीच्या वाटेवर असलेल्या लातूरचे पालकमंत्रीपद आल्यामुळे, या जिल्ह्याच्या विकासाला आणखीन गती मिळेल असा विश्वास व्यक्त करून संपूर्णतः सहकार्याच्या ग्वाहीसह त्यांना शुभेच्छाही दिल्या.

महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या यांच्या भेटीत लातूरच्या विकासासह विविध विषयावर चर्चा झाली. यामध्ये लातूर हे मराठवाड्यातील सर्वाधिक गतीने विकसित होणारे शहर आहे, त्यामुळे शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे, ही बाब लक्षात घेऊन प्रस्तावित बाह्य वळण रस्ता बांधकामासाठी आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यातून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली.



दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडणाऱ्या अहिल्याबाई होळकर चौक (नवीन रेणापूर नका) ते जिवाजी महाले चौक ( गरुड चौक) या मार्गाचे सहा पदरीकरण करण्याची करण्याची मागणी करण्यात आली. लातूर रेल्वे स्थानक ते बाह्य वळण (रामामा क्र.५४८) रस्त्यादरम्यान वाढलेली वाहतूक लक्षात घेता या रस्त्याचे दुभाजक व प्रकाश व्यवस्थेसह सहा पदरीकरण करावे. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पटेल चौक येथील विस्तारित स्त्री व बाल रुग्णालय बांधकामासाठी महानगरपालिकेच्या जागेचे त्वरित हस्तांतरण करावे. लातूरच्या उद्योग व्यापार वाढीच्या दृष्टीने, लातूर विमानतळाच्या विस्तारनकरणाचे काम त्वरित पूर्ण करून उड्डाण योजनेतून विमानसेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, लातूर जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचे त्वरित हस्तांतरण करून रुग्णालयाची लवकरात लवकर उभारणी करावी. लातूर शहरातील विलासराव देशमुख मार्गाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. लातूर शहराच्या प्रगतीचा वेग आणि विस्तार लक्षात घेता शहरातील प्रमुख चौक व रस्त्याचे सुशोभीकरण त्याचबरोबर, सीसीटीव्ही आणि सिग्नल व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.

CMYK

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जानकी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३० जानेवारी -**
येथील जानकी महाविद्यालयात उत्साहात वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन समारोहाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रदीप खोमणे होते तर या समाराहोचे उद्घाटक म्हणून बालाजी शिंदे उपस्थित होते.

यावेळी मंचावर संस्थेच्या उपाध्यक्षा शीतल खोमणे, सुनंदा कुलकर्णी, दादासाहेब पाटील, कलावती भातंब्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केतन खोमणे, सांस्कृतिक विभाग प्रमुख दीक्षा लामतुरे आदींची उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कला गुणांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. महाविद्यालयातील प्रतीक्षा कांबळे, दिव्या सुरनर, अंजली कांबळे, श्रद्धा धडे नृत्य, शेख फिरदौस शायरी, सुचिता सोळंके, प्रतीक्षा मुस्तापुरे गीत गायन, प्रतीक्षा मुस्तापुरे, अश्विनी मोरे, सोनाली वाडेकर कविता सादर केल्या. या सर्व विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक विभाग प्रमुख दीक्षा लामतुरे, प्रा. वैष्णवी आगलावे, प्रा. रोहिणी मजगे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कला सादर केल्या.

कार्यक्रमाचे आभार प्रा. अजय स्वामी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. आकांक्षा जगताप, प्रा. जोहरा देशमुख यांनी केले.



### संक्षिप्त वृत्त...



### विद्यार्थ्यांचे विभागीय स्पर्धेत यश

**औसा, दि.३० जानेवारी -**
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई अंतर्गत येणाऱ्या पदविका महाविद्यालयचे अंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना जी २ झोन स्पर्धेत राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक लातूर महाविद्यालयातील पदविका द्वितीय वर्षातील विद्यार्थी ओमकार शिंदे यांनी वेटलिफ्टिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक तर आयान शेख यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य संतोष मेतगे, उपप्राचार्या योगिता बावगे, प्राचार्य सोनहिवरे एम.जी., क्रिडा विभाग प्रमुख पाटील डी.पी. व सर्व शिक्षक व विद्यार्थांनी अभिनंदन करून केले.



### ‘उदयगिरी’त गांधीजींना अभिवादन

**उदगीर, दि.३० जानेवारी -**
येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व दिनविशेष समितीच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त हिंदी विभाग प्रमुख डॉ. बळीराम भुक्तरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य प्रा.एस.जी. कोडचे, कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ नांदेडचे संस्थापक अध्यक्ष ॲड.बी.आर. कलवले, पर्यवेक्षक प्रा. तिरुपती सगर, प्राध्यापक सचिव प्रा. सचिन कांबळे, दिनविशेष समिती प्रमुख डॉ. गौरव जेवळीकर, ग्रंथपाल डॉ. लक्ष्मीकांत पेन्सलवार यासह अनेक प्राध्यापकांची उपस्थिती होती.



### संविधान बांधीलकी महोत्सव संपन्न

**उदगीर, दि.३० जानेवारी -**
येथील डॉक्टर राधाकृष्णन प्राथमिक विद्यालय व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा उदगीर तर्फे प्रजासत्ताक दिनी जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष रमाकांत बनशेळकीकर यांच्या अध्यक्षतेखाली यांच्या अध्यक्षतेखाली, महिला मेळावा घेण्यात आला. कार्यक्रमात अनिस. शाखा उदगीरचे उपाध्यक्ष विश्वनाथ मुडपे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संविधानाची ओळख व्हावी म्हणून महिलांसाठी संविधान ज्ञान, हीतोन्डीपरीक्षा घेण्यात आली. संविधानावर विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या स्वाती हरणे, ऐश्वर्या गायकवाड, भाग्यश्री येरपुरवाड, प्रतिभा सोमवंशी,पौर्णिमा शिंदे, प्रणिता सुळे इ. महिलांना अनिस तर्फे वाचणीय पुस्तकांची भेट देण्यात आली. महोत्सवाचे सूत्रसंचालन वर्षाताई पाटील यांनी केले. तर प्रफुल्लता बोडके यांनी उपस्थित आमचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोहित बिरादार, प्रशांत पांचाळ, शशिकांत पाटील, मनोरमा तेलंगे, गोविंद रावळे इत्यादींनी परिश्रम घेतले.



**दैठणा : येथील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयात २६ जानेवारी या निमित्त रामराव पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक विठ्ठल कदम यांच्या हस्ते व रामराव पाटील विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला.**

## उदगीरला अतिरिक्त जिल्हाधिकारी व अतिरिक्त पोलीस अधिक्षक कार्यालय स्थापन करावे

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३० जानेवारी -**
तीन राज्याच्या सीमेवर असलेले उदगीर शहर हे एक ऐतिहासिक शहर असून येथील बाजारपेठ मोठी असल्याने व्यापाऱ्यांची संख्या मोठी आहे. उदगीर शहरालगत दोन-तीन तालुके असून दिवसेंदिवस महसूल विभागाची कामे वाढत आहेत. त्याचबरोबर पोलीस विभागाची ही कामे वाढत असुन उदगीर शहराचा वाढता विस्तार पाहुन उदगीरला अतिरिक्त जिल्हाधिकारी व अतिरिक्त पोलीस अधिक्षक कार्यालय स्थापन करावे. हे दोन्ही कार्यालय तात्काळ सुरु होणे गरजेचे आहे.



यासाठी उदगीर ते लातूर हे जवळपास ७० किलोमीटरचे अंतर पार करून लातूरला जावे लागत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांची गैरसोय होत आहे. याकरिता उदगीरला अतिरिक्त जिल्हाधिकारी व अतिरिक्त पोलीस अधिक्षक कार्यालय स्थापन करावे, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री तथा उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांनी केली आहे. उदगीर शहरात मागील काळात विविध शासकीय इमारती बांधून तयार केल्या आहेत.

सद्या जिल्हास्तरीय न्यायालय, आर.टी.ओ. कार्यालय वेगवेगळ्या प्रकारची अनेक जिल्हास्तरीय कार्यालये आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्वात मोठे शहर असल्याने येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी व अतिरिक्त पोलीस अधिक्षक कार्यालय होणे अत्यंत गरजेचे आहे.

जेणेकरुन मतदारसंघातील जनतेचा वेळ व पैसा वाचेल व अधिक जलदगतीने कामे होण्यास मदत होईल म्हणून सदर कार्यालय लवकरात लवकर उदगीरला करावे, अशी लेखी मागणी आमदार संजय बनसोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

त्यांच्या मागणीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

## महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३० जानेवारी -**
येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय वार्षिक विशेष शिबिर लिंबाळा येथे दि.२३ ते २९ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप समारंभ कासारशिरसी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण राठोड, पंचायत समिती निलंगा येथील प्रविण डोईजोडे यांच्या उपस्थितीत पार पडला.

सात दिवसीय शिबिरात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती कार्यक्रम अधिकारी डॉ. विठ्ठल सांडूर यांनी दिली तर आभार प्रा. श्रीकृष्ण दिवे यांनी व्यक्त केले.

शिबिराच्या यशस्वितेसाठी डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. विठ्ठल सांडुर, प्रा. श्रीकृष्ण दिवे, सरपंच सखाराम कलबोने, बालाजी माने व शेख आझम, ओम कांबळे, तुळशीराम बोयणे यांनी परिश्रम घेतले.

## पोटऱ्यात आली ज्वारी; वावरात पाखरांची किलबिल भारी

**तभा वृत्तसेवा**
**शि.अनंतपाळ, दि.३० जानेवारी**
तालुक्यातील थेरगाव सह तालुक्यातील शेतशिवारात सध्या ज्वारी पोटऱ्यात आहे. लवकरच हुरडा सध्या रब्बी ज्वारीसाठी पोषक वातावरण असल्याने ज्वारीचे पीक बहरले आहे. सध्या ज्वारी पोटऱ्यात आहे. तर गव्हाला ओंब्या लगडल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांत समाधान व्यक्त होत असून लवकरच हुरडा येणार आहे.

गत पावसाळ्यात अधिक पाऊस झाल्यामुळे शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव परिसरातील हरभरा, गहू, ज्वारीचा पेरा वाढला आहे. सध्या पोषक वातावरण असल्यामुळे रब्बी हंगामातील पिके चांगली बहरली आहेत. पीकवाढीसाठी चांगले वातावरण असल्याने ज्वारीची वाढ जोमात झाली आहे.

पोटऱ्यातील ज्वारीचे पीक काही ठिकाणी निसवून कणसे दिसत आहेत. लवकर पेरणी झालेल्या ठिकाणी मात्र ज्वारी कणसाच्या स्थितीत आहे. ज्वारीमुळे पशुधनाच्या कडब्याचा प्रश्न सुटणार आहे. हरभऱ्याचे घाटे भरलेले आहेत. ७० ते ७५ दिवसांनी ज्वारीचे पीक फुलोऱ्यात येते.

तालुक्यातील शेतशिवार रब्बी पिकांनी बहरली आहेत. ज्वारी पोटऱ्यात असल्याने शिवारात पक्षी पाहावयास मिळत आहेत. त्यामुळे शेत परिसरात पाखरांची शाळा भरू लागली आहे. पिकांकडे पक्षी आकर्षित होत आहेत. दरम्यान, काही भागात वन्यप्राण्यांचा उपद्रव वाढला आहे. त्यामुळे शेतकरी विविधांगी वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करीत आहेत. दोन ते अडीच महिन्यांत ज्वारी फुलोऱ्यात येते. या अवस्थेत पाणी मिळाल्यास कणसात दाणे भरण्यास मदत होते. कणसाचे वजन वाढून उत्पादन वाढते.

या कालावधीत संरक्षित पाणी दिल्यास ज्वारीच्या उत्पादनात २५ ते ३० टक्क्यांनी वाढ होते.

## उदगीर रोटरीच्या वतीने एस.टी. कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३० जानेवारी -**
रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने उदगीरच्या एस.टी. आगारातील कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

दोन दिवसीय आयोजित या आरोग्य शिबिराचे उद्घाटन आरटीओ इन्स्पेक्टर शांताराम साठे यांच्या हस्ते करण्यात आले. तर तहसीलदार राम बोरगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचा समारोप करण्यात आला. यावेळी आगार प्रमुख चिन्मय चिटणीस, सहा. आरटीओ इन्स्पेक्टर राजकुमार नरेशगुंडे, उदगीर आगारातील कार्यशाळा प्रमुख पृथ्वीराज कोकाटे, रोटरीच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी, उपाध्यक्ष रविंद्र हसरगुंडे, सचिव ज्योती चौधरी, चेअरमन डॉ. मोहन वाघमारे आदींची उपस्थिती होती. शिबिरात एस.टी. आगारातील वाहक, चालक व अन्य सर्व कर्मचाऱ्यांची दंतरोग, नेत्ररोग व मधुमेह तपासणी करण्यात आली. शिबिरात उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयाचे डॉ. माधव मधुकर यांनी नेत्रतपासणी तर डॉ. मोहन वाघमारे यांनी दंत तपासणी केली.

शिबिरास डॉ. बस्वराज स्वामी, डॉ. संतोष पांचाळ, कृष्णा जाधव, सतिश पाटील, संतोष फुलारी, विजयकुमार पारसेवार, व्ही.एस. कणसे, ॲड. मंगेश साबणे, प्रशांत मांगुळकर, नागेश आंबेगावे, विक्रम हलकीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशाल जैन यांनी केले. सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन विशाल तोंडचीरकर यांनी केले.

## महाराष्ट्र फार्मसी महाविद्यालयात विभागीय फुटबॉल स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३० जानेवारी -**
इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडंट स्पोर्ट्स असोसिएश, महाराष्ट्र राज्य अंतर्गत महाराष्ट्र पॉलिटेक्निक डी. फार्मसी इन्स्टिट्यूट, निलंगा येथे भव्य फुटबॉल स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.



स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. खान, संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर, प्राचार्य डॉ. भागवत पौळ डॉ. गोपाळ मोघे, स्पर्धा संयोजक डॉ. अमोल घोडके तसेच कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. एस.एस. पाटील, मुख्याध्यापक मोहन नटवे, उपप्राचार्य प्रशांत गायकवाड, डॉ. सुनिल गरड आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक, नांदेड, ग्रामीण पॉलीटेक्निक अँड मॅनेजमेंट कॅम्पस, नांदेड, राजीव गांधी पॉलीटेक्निक, उदगीर, विश्वेश्वरैया अभियंत्रिकी पदविका महाविद्यालय, अलमला, दयानंद पॉलीटेक्निक, लातूर, पुरनमल लोहोटी गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक, लातूर, महाराष्ट्र फार्मसी, निलंगा आदी संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामन्यात गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक, नांदेड आणि राजीव गांधी पॉलीटेक्निक, उदगीर यांच्यात चुरशीची लढत झाली.

अत्यंत रोमांचकारी झालेल्या या सामन्यात गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक, नांदेड संघाने विजेतेपद मिळवले, तर राजीव गांधी पॉलीटेक्निक, उदगीर हा संघ उपविजेता ठरला.

या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र पॉलिटेक्निक डी. फार्मसी इन्स्टिट्यूट, निलंगा संस्थेने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले. संस्थेच्या प्राचार्य डॉ. बी.एन. पौळ यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा समन्वयक व स्पर्धा संयोजक डॉ. अमोल घोडके व त्यांच्या टीमने उत्कृष्ट व्यवस्थापन केले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विलास कारभारी, मुळदकर, डॉ. सी.व्ही. ठाकरे, तसेच एन.जी. माने, रमाकांत मादळे, गणेश पवार, गजानन माने, प्रेम मुळे विशाल गिरी, गणेश पवार रमाकांत मांदळे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

स्पर्धेचे संचालन डॉ. एस.एस. दुधमल यांनी केले. सामना निरीक्षक वाय.एस. कटके शासकीय तंत्रनिकेतन नांदेड, यांचा उपस्थित स्पर्धा यशस्वी झाल्या, तर रेफरी म्हणून शेख निजाम, हाश्मी सय्यद इमाम, शेख रहमत आणि सय्यद अलीम यांनी भूमिका निभावली.

## राजीव गांधी पॉलिटेक्निक महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३० जानेवारी -**
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या २०२४ चा निकाल जाहीर करण्यात करण्यात आला असून श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे.



यावर्षी शंभर टक्के निकाल लागला असुन उज्वल यशाची परंपरा कायम राखण्यात महाविद्यालय यशस्वी झाले आहे. यामध्ये ९० विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले असून महाविद्यालयातून श्रुती काळे प्रथम, मानसी आरबळे व्दितीय तर निखिल कटारे तृतीय क्रमांक पटकावला आहे. संगणक अभियांत्रिकी शाखा प्रथम वर्षातुन दानिश शेख ८६ टक्के प्रथम, गुंड्डे ८५ टक्के व्दितीय, वैष्णवी शिंदे ८४.८२ टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. तर व्दितीय वर्षातुन श्रुती काळे ९२.१२ प्रथम, मानसी आरबळे ९०.४१ व्दितीय, अक्षता धवन ८७.१८ घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकी शाखा प्रथम वर्षातुन घोडके यश ८४ टक्के प्रथम, आदित्य पाटील ७९.३५ टक्के व्दितीय, राम कृष्ण भोसले ७७.१२ तृतीय क्रमांक पटकावला आहे. व्दितीय वर्षातुन अथर्व देशपांडे ८८.८२ प्रथम, जिशान शेख ८१.८८ व्दितीय, रिहान सय्यद ७६.८८ तृतीय क्रमांक पटकावला आहे. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स शाखा प्रथम वर्षातुन समिक्षा सांगोले ८४.६ टक्के प्रथम, समृद्धी पवार ८२ टक्के व्दितीय, गौरवी बिराजदार ७८.५० टक्के तृतीय क्रमांक पटकावला आहे. विद्युत अभियांत्रिकी शाखा प्रथम वर्षातुन केदार मिटकरी ७० टक्के प्रथम, श्रेयस बिराजदार ६९ टक्के व्दितीय, अश्रुबा चव्हाण ६२ टक्के तृतीय क्रमांक पटकावला आहे. व्दितीय वर्षातुन वैष्णवी चिल्ले ८५.८८ टक्के प्रथम, निवृत्ती साठे ८४.५९ टक्के व्दितीय, कृष्णा चिल्ले ८०.५० टक्के तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच तृतीय वर्षातुन नागेश नागुरे ८५ टक्के प्रथम, पौर्णिमा भांगे ८२.१० टक्के व्दितीय, पल्लवी रणखांब ८२ टक्के तृतीय क्रमांक पटकावला आहे. स्थापत्य अभियांत्रिकी शाखा तृतीय वर्षातुन निखील कटारे ९०.८८ टक्के प्रथम, मयुरेश डिग्गीकर ८२.६६ टक्के व्दितीय, बळीराम निकम ७८.११ टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच व्दितीय वर्षातुन अभिषेक ढगे ७१.१२ टक्के प्रथम, दत्ता तोगरे ७०.५० व्दितीय क्रमांक मिळवला.

संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे प्राचार्य संतोष मेतगे, उपप्राचार्या योगिता बावगे-मेतगे, आय.एस. बावगे, एन.आर. कांबळे आदींनी अभिनंदन केले आहे.

## ग्रंथांची संगत ही संतांची संगत : धनंजय गुडसूरकर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३० जानेवारी -**
श्री हावगीस्वामी महाविद्यालय उदगीरचा एन. एस. एस. विभाग व बाल शिवाजी वाचनालय होनाळी यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन कट्टा' या उपक्रमांतर्गत 'लेखक आपल्या भेटीला' हा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन श्री शिवाजी बिरादार यांनी वाचनालय परिसरात कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. विठ्ठल गोरे यांच्या अध्यक्षतेखाली केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध लेखक धनंजय गुडसुरकर हे उपस्थित होते.

श्री धनंजय गुडसुरकर यांनी वाचता वाचता वाचे या विषयावर आपले विचार चर्चात्मक पद्धतीने व अनेक दाखले देत व्यक्त केले. विविध ग्रंथांचा उल्लेख करीत त्यांनी असे प्रतिपादन केले की, ग्रंथच आपल्या जीवनाला योग्य वळण देऊ शकतात.

ग्रंथांची संगत ही संतांची संगत असल्यासारखे आहे. चिमुकल्या बालकांसाठी त्यांनी बहारदार असे कथाकथन केले तर महाविद्यालयीन शिबिरार्थी साठी मोलाचे मार्गदर्शन केले.

## लातूर फार्मसीत नूतन विद्यार्थ्यांचे स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३० जानेवारी -**
श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम बी. फार्मसी प्रथम वर्ष, बी फार्मसी द्वितीय वर्ष व डी फार्मसी प्रथम वर्षाच्या नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आगाज २०२५ या नावाने कार्यक्रम नुकताच पार पडला.

अन्न व औषध प्रशासन छत्रपती संभाजीनगरचे सहआयुक्त राजगोपाल बजाज, संचालक ओम सेल्स अँड कॉर्पोरेशन पुणेचे संचालक कार्तिक पायमोडे, संचालक प्रकाश सर्जिकल लातूरचे संचालक प्रकाश रेड्डी यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य संतोष मेदगे, प्राचार्य वीरेंद्र मेश्राम उपस्थित होते. फार्मसीच्या विद्यार्थ्यांना सरकारी व खाजगी क्षेत्रामध्ये नौकरीसाठी मोठ्या संधी आहेत. त्यासाठी ध्येय व धोरण ठरवून अभ्यास केला तर हम खास यश मिळते, असा अनमोल सल्ला राजगोपाल बजाज यांनी विद्यार्थ्यांना दिला.

प्रा. शुभम वैरागकर, प्रा.एम. मुळे, प्रा. चैतन्य पवार, प्रा. सुप्रिया जाधव, प्रा. माधुरी पोळकर, प्रा. स्नेहज्या भालेराव, प्रा. मनकरना कराळे, प्रा. संस्कृती शिरुरे, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे, शेबीर शेख आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अक्षता लासुरे यांनी केले. तर आभार प्रा. अतुल कदम यांनी मानले.

## यल्लालिंग मूत्या महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.३० जानेवारी -**
महाराष्ट्र,आंध्र कर्नाटक, तेलंगणा राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कर्नाटकातील औराद बाराळी तालुक्यातील सीमभागातील खंडेकेरी येथे २६ व २७ जानेवारी दरम्यान शिवयोगी सिद्धरामेश्वर महाप्रभू मठात यल्लालिंग मूत्या यांच्या पुण्यतिथीनिमित, सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात महाभिषेक, कीर्तन, भजन, महापूजा, महाआरती करण्यात आली. २६ जानेवारी रोजी दुपारी एक ते पाच वेळेत शिव मल्हारी



येळकोट जयघोषात ढोल ताशाच्या गजरात खंडेकेरी गावातून गदगीची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर गदगीचा महाअभिषेक सोहळा, यज्ञपूजा सोहळा संपन्न झाला.

यावेळी शिवलिंग शिवाचार्य महाराज हेडगापूर, हानेगाव मठाचे शंकरलिंग, शिवाचार्य बसवलिंग, शिवाचार्य कवळास, गजानन हिरेमठ नंदकिशोर, स्वामी कपिल, स्वामी विरया, स्वामी ईश्वरसिंग ठाकूर, माजी सभापती बालाजी बिरादार यांचा खंडेकेरी मठाचे मठाधिपती शिवानंद स्वामी हिरेमठ खंडकेरी यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

## जि.प. शाळेस सीसीटीव्ही, साऊंड सिस्टिम व शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.३० जानेवारी**
शिरूर अनंतपाळ तालुक्यातील दैठणा येथील जिल्हा परिषद शाळस दैठणा येथील युवा उद्योजक विनोद बिरादार पाटील यांच्या वतीने उउढत कॅमेरे तसेच साऊंड सिस्टीम व शैक्षणिक साहित्य माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.



यावेळी मंचावर काँग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळुंके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे, ॲड. संभाजीराव पाटील, डी.एन. शेळके, पंडितराव धुमाळ, राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, सभापती निळकंठ मिरकले, गोविंद चिलकुरे, व्यंकटराव बिरादार, आबासाहेब पाटील, व्यंकट हांद्राळे, बाजीराव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विनायकराव पाटील यांनी बोलताना जि.प. शाळा ही चांगली असावी ही फक्त शासनाचीच जबाबदारी आहे असे नसून गावकरी यांनी सुध्दा शाळेसाठी सहकार्य करणे ही काळाची गरज आहे, असे मनोगत व्यक्त केले.

यावेळी सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी तसेच दैठणा गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी वर्ग, समस्त गावकरी उपस्थित होते.